
# महाभारत

## खंड १५ : वनपर्व ७

मराठी अनुवाद : श्री. अशोक कोठारे



# महाभारत

## महाभारत खंड पंधरावा (वनपर्व)

अशोक कोठारे

**ई साहित्य प्रतिष्ठान**

# महाभारत

## मराठी अनुवादक : श्री. अशोक कोठारे

ashokkothare@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

**ई साहित्य प्रतिष्ठान**

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604

**www.esahity.com**

**esahity@gmail.com**

©esahity Pratishthan®2018

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्या पूर्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**प्रकाशन : १० एप्रिल २०१९**

## – अनुवादकाचे दोन शब्द –

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळ्या परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बर्याच वेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, एक शैक्षणिक माध्यम म्हणून वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना तो गद्यात केला आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये. त्या शिवाय, सामान्य वाचकांना कथाभाग अधिक चांगल्या प्रकारे समजावा म्हणून कांहीं टीपा दिल्या आहेत.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना प्राचीनतेचा अनुभव यावा म्हणून मुद्दाम प्राचीन (Archaic) शब्दप्रयोग वापरतात परंतु, माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल. आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मुळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे. मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत चाळीसापेक्षां

जास्त खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे जाईल अशी अपेक्षा आहे. त्यातील हा पंधरावा खंड आपण आता वाचणार अहात, त्यात द्रौपदी सत्यभामा संवाद पर्व, घोष यात्रा पर्व आपण पहाणार आहोत.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणार्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्या आधीची असती तर त्याचा उल्लेख त्या काळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्या नंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, सम्राट अशोकाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका

करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे. कदाचित असें म्हणता येईल कीं, महाभारत हा एक दंतकथांचा संग्रह आहे व त्याद्वारा नैतिकमुल्ये शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो अप्रतिम आहे.

आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असतं. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राज्यांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. माझ्यामते, हांच उद्देश वाचकांनी डोळ्यासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ नाही असे माझे मत आहे. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता, व्याध गीता वगैरे. ते सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल. त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई–साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहेत म्हणून त्यांना शतशः

धन्यवाद.

अशोक कोठारे



माझा ई-मेल –

ashokkothare@gmail.com
ashokkothare@yahoo.co.in

ह्या वरून आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई–पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई–साहित्य करणार आहेत परंतु, हे ई–पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

**माझे ब्लॉग –**

Ashok Kothare, http://ashokkotharesblog.blogspot.com/ for stories
I reckon, http://kotharesviews.blogspot.com/ for philosophy
Ideas and tips on any subject, http://kotharay.blogspot.in/ for intelligent discussions.

Freedom of Expression, http://kothare-thinks.blogspot.in/

My Marathi Blog, http://kothare-marathi.blogspot.in/ मला असे वाटते

# - वनपर्व पुढे चालू -

# - महाभारत खंड पंधरावा –

ह्या पंधराव्या खंडात तुम्ही द्रौपदी सत्यभामा संवाद पर्व आणि घोष यात्रा पर्व वाचणार अहात.

## – द्रौपदी सत्यभामा संवाद पर्व सुरू –

### भाग अठ्ठ्याहत्तरावा

वैशंपायन सांगतात, सगळे पांडव आणि तेथे जमलेले ब्राह्मण आपापल्या आसनांवर बसल्यावर द्रौपदी आणि सत्यभामा त्या आश्रमात प्रवेश करतात. त्या दोघीही मोठ्या आनंदाने हसत हसत त्यांच्या आसनांवर जाऊन बसतात. अरे राजा, त्या दोघी बायका ज्या एकमेकींशी नेहमी प्रेमांने त्यांच्या जीवनाबद्दल बोलत असतात त्या आतासुद्धा कुरू आणि यदू घराण्यांच्या लोकांबद्दल गोष्टी सांगू लागतात. द्रौपदी विचारते, त्या सिंहकटी सत्यभामेला, जी कृष्णाची लाडकी भार्या व सत्यजिताची कन्या, "अग सत्यभामे, मला सांग तू पांडुच्या तेजस्वी पुत्रांचे संगोपन कसे करतेस? ते बलवान, सुंदर आणि साक्षात लोकपाल असावेत असे आहेत. ते तुझ्या आज्ञेत असणार व तुला जसे पाहिजे तसे वागत असणार, अशा स्थितीत तुला त्यांचे आकर्षण वाटत नाही कां? कशा प्रकारे तू तो मोह टळत असतेस ते मला ऐकावयाचे आहे. त्यानासुद्धा तुझे आकर्षण वाटते कां? असे काय कारण आहे कीं, तुमच्यात तसले नाते उत्पन्न होत नाही. कांहीं व्रतस्थतेचे बंधन, कां वैराग्य बुद्धी, कां औदासिन्याचे धोरण असे काय आहे ते मला ऐकावयाचे आहे. मला त्याची उत्सुकता आहे. कां कांहीं जादूटोणा कां जडीबुट्टी वापरून त्यांना तू दूर ठेवण्यात कामयाब होतेस? कांहीं यज्ञ होम, मंत्र, औषधी काय वापरले जाते कां आणखीन कांही त्या मागील कारण आहे ते सांग".

पांचाली तिला उत्तर देते, "ज्या पवित्र बंधनामुळे कृष्णाचे व माझ्या पतींचे नाते तयार झाले त्यांमुळें मी सदैव त्याच्याशीच प्रामाणिक आहे. त्यात दुसरा कोणताही असा प्रकार नाही ज्यांचा तू आता उल्लेख केला आहेस". द्रौपदी तिला आणखीन बोलते, "ज्या कांहीं तर्हा तू आता बोललीस, त्या विकृत मनस्थिती असलेल्या बायकांच्या असतात". ते ऐकून

सत्यभामा चपापली. द्रौपदी पुढे बोलते, "तू असें विचारणे अयोग्य आहे हे तुझ्या लक्षात येत नाहीं कां? माझ्या पावित्र्यावर तू संशय दाखवत आहेस, तू बुद्धीमान असूनही असें विचारतेस, ह्याचे मला आश्चर्य वाटते. मी कृष्णाच त्यांची पट्टराणी आहे". पुढे ती बोलते, "जेव्हां पतीला समजते कीं, त्याची बायको धुपधुपारा, दवादारू च्या फंदात पडली आहे, त्या क्षणापासून तो तिचा द्वेष करू लागतो. किंवा त्याला तिची भिती वाटू लागते जणूकाय त्याच्या शेजघरात साप घुसला आहे. त्याची झोप उडून जाते. अशा माणसाला अशांतता व संशय ह्यांने घेरलेले असते. त्याचे सगळे सुख संपते. धुपधुपार्याने अथवा मंत्रतंत्राने कोणताही नवरा त्याच्या बायकोच्या ताब्यात रहात नाही. आपण ऐकतो, एकाद्या व्याधीने शत्रू बेसावध माणसाला गारद करू शकतो. ज्यांना आपल्या वैर्याचा नाश करावयाचा आहे, ते त्याला कांहीं जहर कोठल्या तरी स्वरुपात भेट म्हणून पाठवत असतात आणि जर त्या बेसावध माणसाने त्या गोष्टीला स्पर्श केला किंवा ती चाखली तर तो त्वरित मरून जातो. अशा कांहीं महिलांमुळें माणसांना असें व्याधी होत असतात त्यात, गरमी परमा, किंवा नपुसकत्व प्राप्त होणे, आंघळेपण किंवा बहिरेपण, वेडसरपणा असें बरेच कांहीं होत असते, अशा वाईट बायका पापाच्या मार्गानेच जात असतात. अशा बायका कधी त्यांच्या पुरूषांना त्रास देऊ शकतात नुकसान करू शकतात. परंतु, पत्नी जी त्या पुरूषाची अर्धांगिनी म्हणवून घेते, तिने कदापीही अशी कृत्ये करू नयेत". आता मी काय सांगते ते नीट ऐक माझ्या प्रतिष्ठीत मैत्रीणी, "तुला सांगते, मी कसे पांडुच्या मुलांशी वागते. मी पोकळ रुबाब अथवा क्रोध तसेंच कांहीं मतलब असे कांहीं न धरता त्या पांडवांना व त्यांच्या इतर बायकांना माझ्या घरात सन्मानपूर्वक वागवत असते, त्यात मत्सर, द्वेष नसतो. शुद्ध मनाने कोणताही कमीपणा मनात न धरता त्यांना काय हवे नको ते पहात असते. ते करत असतांना मी माझ्या पतींची सुद्धा सेवा करत असते. वाईट वागणे, बोलणे, असभ्यपणे पहाणे, चालणे, बसणे, सुचकपणे नजरा वळवणे, असें कांहींही माझ्या कडून त्याच्यांबद्दल होत नाही. तसे करणे त्यांना सुद्धा चालणार नाही कारण, ते सूर्यासारखे तेजस्वी, पराक्रमी, तत्त्वनिष्ठ, धमक असलेले योद्धे आहेत. भलत्या सलत्या गोष्टी आमच्यात होणे केवळ अशक्य आहे. परपुरूष मग तो देव असो, मनुष्य असो, रत्नजडीत अलंकाराने सजलेला असो, गंधर्व असो अशा कोणासाठी माझ्या मनात

तिळमात्रसुद्धा जागा नाही. मी कधी नवर्याच्या आधी आंघोळ करत नाही, जेवत नाही, झोपत नाही, एवढेच नाही आमचे सेवकसुद्धा तसे करत नाहीत. ते लढाईवरून येत असतील, वनातून येत असतील, नगरातून येत असतील, शेतातून येत असतील, कसेही आले तरी मी त्वरीत उठून त्यांची सेवा करत असते. त्यांना पाणी पिण्यासाठी देणे, पाय धुण्यासाठी देणे ह्याकडे लक्ष देत असते. माझे लक्ष असते कीं, सगळ्या गोष्टी त्यांच्यासाठी जय्यत तयार आहेत. त्याच्या जेवणावर माझी नजर असते, कोणता भात त्यांना आवडतो, कोणती भाजी आवडते, कोणती सागुती त्यांना आवडते हे सगळे मला पहावयाला आवडते. तेंच माझे आयुष्य झाले आहे. आळस अजिबात न करता मी हे सगळे साध्य करत असते. ते करत असतांना मी रागवत नाही, आळस करत नाही, मी त्यांच्या कडे पाहून कधी गंम्मत करत नाही. किंवा कोणी चेष्टा केली तरी त्याला उत्तेजन देत नाही. त्याना तिष्ठत रहावे लागेल असे मी कधीही वागत नाही. त्यांनी विनोद केले तर मी त्यांना हसून दाद देते. हगण्यात मुतण्यात मी फार वेळ देत नाही. ते सगळे त्वरित उरकून मी त्यांच्या सेवेत उपस्थित होत असते. मी घरापासून फार दूर जात नाही. मी कधीही जोरांने हसत नाही किंवा मोठ्याने बोलत नाही. माझ्या वागण्यात वासनामयता अजिबात नसते. त्यांना दुःख होईल असें कांहींही मी करत नाही. अशारितीने मी सदैव त्यांच्या सेवेतच रहात असते आणि हे सगळे मी माझ्या मर्जीने आपखुषीने करत असते".

ते ऐकल्यावर सत्यभामा तिला बोलते, "अहो द्रौपदी मीसुद्धा तशीच आहे. माझ्या पतींच्या सेवेत रहाण्यात मला प्रमोद होत असतो. माझ्या पतींपासून मला वेगळे रहाणे आवडत नाही. जेव्हां माझे पती माझ्यापासून दूर कोठे जातात कांहीं कारणाने, तेव्हां मी तपस्या करण्यात माझा समय व्यतित करत असते. त्याकाळात मी साजश्रृंगार करत नाही. सुगंधी द्रव्यांचा वापर करत नाही, चंदनाची उटी अंगाला लावत नाही. जे माझे पती खात नाहीत, पित नाहीत ते मीसुद्धा खातपित नाही. माझ्या पतींच्या मनोरंजनाच्या गोष्टीत मी स्वताला रमवण्याचा प्रयत्न करते. ते असतात तेव्हां मात्र मी साजश्रृंगार करून स्वताला प्रसन्न करण्याचा प्रयत्न करत असते. माझ्या सासूने जे करण्यास मला सांगितले आहे ते सगळे मी मनापासून करत असते. मी नातेवाईकांशी कसे वागावे, काय करावे, दान कोणाला करावे, केव्हां करावे, कोणत्या देवाची पुजा करावी असें सगळे त्यांच्या सांगण्यानुसार मी

करत असते. आजार्याची सेवा कां करावी, कशी करावी, पितरांसाठी पिंड कसे तयार करावे, सन्माननीय पाहुण्यांची उठबस कशी करावी ते सगळे त्यांच्या कडून मी शिकत असते. ते सगळे मी न थकता रात्रंदिवस करत असते, त्यात मला आनंद मिळतो. पूर्ण आदरानें मी माझ्या गुणी धन्याची सेवा करत असते. त्यांना तक्रार करण्याची संधी मी देत नाही. एकादा विषारी साप जसा क्षुल्लक कारणावरून रागावला किं, डसतो तसे ते मला रागावून दोषरुपी दंश करणार नाहीत असें मी सतत पहात असते. माझ्या मते ह्या चांगल्या पत्नीच्या वागण्याच्या तर्हा असल्या पाहिजेत. स्त्रीला तिचा पति परमेश्वर असतो तोंच तिचा तारणकर्ता असतो, दुसरा कोणी तिचा रक्षणकर्ता असू शकत नाही वगैरे तसें आम्हाला लहानपणापासून सांगितले जाते ते खरे आहे असें समजून मी तसे करत असते. अशा समजूतीत जी बाई रहात असते ती कशी आपल्या तारणकर्त्याला दुखवेल बरे"?

द्रौपदी पुढे सत्यभामेला सांगत असते, "मी माझ्या जाणतेपणी, झोपेत, खाताना, पितांना, माझ्या नवर्याच्याशिवाय कशाचाच विचार करत नाही. माझे जे सगळे कार्य असते ते सारे त्याच्या आदेशानुसारच होत असते. मी माझ्या सासूबद्दल कधी उणे बोलत नाही. माझ्या ह्या अशा वर्तणूकींमुळें माझे पतीसुद्धा माझ्या प्रमाणे व मला आवडेल तसेंच करत असतात. मला काय हवे काय नको ते आदरपूर्वकपणे विचारतात. त्यामुळें आमचे सुत उत्तम जमत असते. आमच्यात प्रेमापेक्षा परस्पर सन्मानाची भावना जास्त प्रखर असते. प्रेमात स्वार्थभाव असतो तो सन्मानाच्या नात्यात नसतो, ते जास्त पवित्र असते. प्रेम कांहीं झाले तरी रजोगुणाचे लक्षण असते म्हणून आमची नाती सन्मानाच्या भावनेवरच आम्ही ठेवली आहेत, त्यात सात्त्विकता असते. त्यामुळें आम्ही सदैव एकत्र राहू शकतो. माझ्या सासरच्या लोकांचा मी सन्मान करते, मोठ्या आत्मियतेने व तत्परतेने मी त्यांचा मान राखत त्यांना मदत करत असते. मी स्वतः माझ्या सासुबाई कुंतीमाता , ह्यांची खाण्यापिण्याची व्यवस्था करत असते त्यात मला आनंद वाटतो. मी माझी व माझ्या सासुची तुलना करत नाही कारण तशात तमोगुण असतो. आमचे नातेसंबंध सदैव सात्त्विक रहावेत असें आमचे धोरण असते. मी एक राजकन्या आहे म्हणून तिला शोभेल असेंच माझे वागणे क्षमाशिल असते. एकेकाळी दररोज दहा हजार ब्राह्मण आमच्या येथे जेवणासाठी येत असतं, युधिष्ठीराच्या राजवाड्यात त्यांच्या पंगती उठत असत, पण

त्याचा आम्ही कधी गर्व केला नाही. आठ हजार स्नातक जेवत असतं, त्यांच्या सेवे साठी तितक्याच दास्या ठेवल्या होत्या. दहा हजार यती जे शुद्ध वीर्याचे होते ते सोन्याच्या ताटात जेवत असतं. ते सगळे ब्राह्मण वेदाचे स्मरण करत असत. मी दररोज अन्नाच्या गुदामातून ते सगळे जेवण करण्यासाठीचा शिधा (अग्रहार) काढत असें आणि जेवण बनवणार्यांना देत असे, त्या आधी त्यातील भाग विश्वदेवाला अर्पण करत असें. माझ्या सासुच्या सेवेसाठी एक लक्ष दास्या होत्या. त्यांच्या अंगावर वस्त्रालंकार असतं. त्या मनोरंजनाच्या कामात तरबेज होत्या".

"अग, सत्यभामे, मला त्या सगळ्या दास्यांची नांवे माहीत होती. त्या सगळ्या दास्यांची व्यक्तिगत माहीतीसुद्धा माझ्याकडे असें. माझ्या सगळ्या पतींच्या सेवेतसुद्धा तशाच असंख्य मुली सेविका म्हणून काम करत होत्या. आमच्या कडे येणार्या पाहुण्यासाठी जेवणाची व्यवस्था असें. ते सोन्याच्या ताटात जेवत असतं. युधिष्ठीर इंद्रप्रस्थात रहात असतं तेव्हां त्यांच्या दिमतीस हजारो अश्व आणि हत्ती तयार असत. ती सगळी त्याची मालमत्ता होती जेव्हां तो पृथ्वीचा नरेश होता. त्या सगळ्यांची मोजदाद मी ठेवत असें, त्यांसाठी कामाचे नियम मी तयार करत असें त्यामुळें सगळी कामं बिंदिक्कत होत होती. त्यांच्या कांहीं तक्रारी असतील त्यासुद्धा मींच पहात असें. त्यामुळें त्यांच्या सगळ्या बाबी मला माहीत असतं. कोणता दास व दासी कोठे काम करत आहेत ते मला चांगलेच ज्ञात असें. अगदी गोपालांची सुद्धा माझ्याकडे सर्व माहीती असें. लहान प्राणी पाळणारे धनगर सुद्धा माझ्या नजरेत असतं. अग, माझ्या सखी, तुला सांगते, त्या राज्याचे धनोत्पादन किती आहे त्याचा हिशोबसुद्धा माझ्याक़डे असे. ती माझी जबाबदारी होती त्या काळात. माझ्या नवर्यांचे जमाखर्च मींच पहात असें. ते माझ्यावर सगळे सोडून फक्त आपल्या कामावर लक्ष केंद्रीत ठेवून असतं. त्यांना कांहीं हवे नको ते मला ते सांगत व मी त्याची तजवीज करत असे. कोणत्याही माणसाला ते सगळे कार्य पेलेल कीं काय असें ते सगळे काम अवघड होते. मला क्षणाची फुरसत नसे, तरी मी कधी त्याबद्दल तक्रार केली नाही. मी त्या कामात पूर्णतया एकरुप झालेली होते. ते सगळे मी करत होते कारण मला माझ्या सासरबद्दल फार अभिमान आणि सन्मान वाटतो आहे. माझे पती त्यांच्या पुण्यप्रद कार्यात गुंतले असतांना मी मात्र त्यांच्या ऐहीक क्षेत्राची देखभाल करत होते. कारण त्यांची संपत्ती

वरुणदेवाच्या संपत्ती प्रमाणे अखंडपणे वाढत होती. तहान भूक न पहाता मी त्या पांडवांची अशा विविध प्रकारे सेवा करत होते. माझ्यासाठी रात्र काय आणि दिवस काय सारखेच होते. फक्त काम काम आणि काम असें माझे ते जीवन होते. तरी मला त्याचा त्रास कधी वाटला नाही. अग, सत्यभामे, माझ्या ह्या अशा सततच्या कामामुळें माझे पांचही पती माझ्या आज्ञेत रहात असतं. ही नवर्यांना बायकोचे आज्ञाधारक ठेवण्याची माझी पद्धत होती. मला कधी जादूटोणा त्यासाठी वापरावा लागला नाही. मी कधी तशा गोष्टी करणारसुद्धा नाही सांगून ठेवते तुला. कारण ती खरी शहाणी पद्धत नाही".

वैशंपायन पुढे सांगतात, कृष्णाचे ते पुण्यप्रद विवेचन ऐकल्यावर सत्यभामा जीला सुरूवातीपासून पांचाली बद्दल आदर होता तिला बोलते, "अग, पांचालच्या राजकन्ये, मी गमतीने बोलले असेन कांहीं त्याबद्दल मला माफ कर. त्यात कोणताही वाईट उद्देश नव्हता.

अशारितीने द्रौपदी सत्यभामा संवाद पर्व भाग अठ्ठ्याहत्तरावा संपला.

# द्रौपदी सत्यभामा संवाद पर्व

## भाग एकोण ऐंशीवा

द्रौपदी तिला बोलते, "आता तुला सांगते मी माझ्या नवर्यांचे लक्ष खेचण्यासाठी काय करत असते, त्यात कोणताही पाप मार्ग नाही अथवा फसवणूक नाही. त्या पद्धतीचा अवलंब करून तू किंवा कोणीही स्त्री तिच्या पतीला तिच्या आज्ञेत ठेवू शकेल. त्या पद्धतीचा अवलंब करणार्या स्त्रीला अशी भिती बाळगण्याचे कारण रहाणार नाही कीं, कधीतरी तिचा पती दुसर्या बाईकडे पाहील. सत्यभामे, एक गोष्ट लक्षात ठेव कीं जर तू तुझ्या पतीला संतुष्ट केलेस तर तो स्वर्गीय देवांपेक्षा जास्त चांगला असा आपल्याशी वागू लागतो. तो जर तुझ्यावर खूष असेल तर तू जे मांगशिल ते तो तुला देण्यास तयार असतो परंतु, जर तो नाराज किंवा रागावलेला असेल तर कांहींच मिळत नाही. आपल्याला मिळणारी अपत्ये त्याच्यामुळेंच होत असतात. ज्यात आपल्याला आनंद वाटतो ते सगळे त्याला खूष ठेवून तू मिळवू शकतेस. चांगले घर, चांगले बिछाने, हार, अत्तरं, चांगली आसनं, घराचे सामान, त्याच्या कर्तृत्वामुळें आपल्याला समाजात मान मरातब मिळत असतो. त्याची बायको म्हणून लोक आपल्याला मान देतात. त्यातून केवढे सुख मिळते ते तुला माहीत आहेच. आपल्या आत्मियतेच्या वागण्यामुळें तो समजतो कीं, त्याची भार्या त्याच्यावर संतुष्ट आहे. त्याचे त्याला समाधान मिळत असते. तो आला असें समजले कीं, तू त्वरित उठून त्याला दर्शन दिले पाहिजेस. त्या आधी कोणी दुसरी बाई त्याला स्वागत करण्यासाठी गेली तर तो मनातल्या मनात खट्ट होत असतो ते तुला समजले पाहिजे. अशा साध्या सोप्या क्लुप्त्या असतात पण त्यांचे परिणाम मोठे उपयोगाचे असतात. तो आला किं, त्याला पाणी देणे, पाय धुण्यासाठी व्यवस्था करणे असें साधे सोपे पण उपयुक्त वागणे त्याला धरून ठेवण्यात मदत करत असतात. त्यांने जरी आपल्या सेविकेला हांक मारली तरी तिला न जाऊ देऊन स्वतः त्याचे काम करण्याचा उत्साह दाखवला तर तो जरी तसे उघडपणे दाखवत नसला तरी मनातल्या मनात तुझ्यावर खूष झालेला असतो. त्याच्या मनाची स्थिती काय आहे ते पाहून मगच तू तुझे तोंड उघडशिल. उगाचच त्याच्यापुढे कटकटीचा तक्रारींचा पाढा वाचण्याची घोडचूक कधीही करू नकोस. त्याला

असें सतत वाटले पाहिजे कीं, तू त्याची मोठी चाहती आहेस. तुझ्या आधी जर तुझी सवत त्याच्या पुढे पुढे करत असेल तर समज तुझा पत्ता कापला गेला आहे. म्हणून अशी संधी त्या बायकांना तू कधीही देणार नाहीस. तुझ्या सवतींच्या विरोधात जास्त न बोलता आपला मनाचा मोठेपणा दाखवत जा, त्याने त्याच्या मनात तुझ्याबद्दल आदर व त्यातून आकर्षण उत्पन्न होईल. लक्षात ठेव आदरातून जे नाते तयार होते ते चिरकाल टिकते व केवळ वासनिक प्रेमातून, मतलबातून अशी जी नाती तयार होतात ती तात्पुरती असतात. पतिशी असलेले आपले नाते चिरकाल टिकणारे असावे लागते. जर तुझ्या बद्दल त्यांने कांहीं नाराजी दाखवली तर त्यावर उलटवार करण्याची चूक करू नकोस. थोडा वेळ गेल्यावर त्याच्या मनातील अढी काढून टाकण्याचा प्रयत्न कर. तुझ्या पतीला आवडते ते तुलासुद्धा आवडते असें दाखवण्याचे निदान नाटक करावे कारण त्यामुळें अर्धी लढाई त्यात तू जिंकत असतेस. तुझ्या पतिच्या विरोधात जे आहेत त्यांच्याशी संबंध ठेवू नकोस. जर पटत नसेल तर गपचुप रहा व योग्य संधीची वाट पहा. ती मिळतेच जर तू सावध असशिल. तुझे दोन पुत्र आहेत. प्रद्युम्न आणि शंम्व. त्यांच्याकडे त्यांच्या बापाविरुद्ध कागाळी करू नकोस. तसेंच असें पहा कीं, सज्जन, तत्त्वशिल, शांत प्रवृत्तीच्या अशा स्त्रियांच तुझ्या मैत्रीणी असतील व त्याच तुझ्या निमित्ताने तुझ्या पतिला भेटत असतील. दुर्व्यसनी, रागीट, भांडखोर, खादाड, चंचल मन असलेल्या बडबड्या अशा बायका तुझ्या निमित्ताने तुझ्या घरात मैत्रीणी म्हणून येणार नाहीत असे पहा. अशा संबंधामुळें तुझ्या घरात सात्त्विक वातावरण राहिल व त्यामुळें देव संतुष्ट रहातील. नेहमी तुझ्या नवर्यापुढे नटून थटून जात जा, तुझ्या अंगाला, वस्त्राला मादक सुगंध लावत जा. त्यामुळें त्याच्या मनात तुझ्या बद्दलचे वासनिक आकर्षण ताजे राहील, जे गृहस्थाश्रमासाठी आवश्यक असते.

अशारितीने द्रौपदी सत्यभामा संवाद पर्व भाग एकोण ऐंशीवा संपला.

# द्रौपदी सत्यभामा संवाद पर्व संपले

## भाग ऐंशीवा

वैशंपायन सांगतात, केशव ज्याला जनार्दन म्हणून सुद्धा जाणतात तो पांडवांशी महत्वाच्या मुद्द्यावर आवश्यकती चर्चा करत असतो. तो तेथे जमलेल्या ब्राह्मणांशीसुद्धा बातचीत करत असतो. त्यांत तेजस्वी ऋषी मार्कंडेय सुद्धा असतात. त्या नंतर तो त्याच्या रथात चढतो व आपल्या पत्नीला हाक मारतो. सत्यभामा द्रौपदीला मिठी मारते व बोलते, "ब्रह्माच्या कृपेने तुझ्या जीवनात कोणतीही चिंतेची भितीची बाब उत्पन्न होऊ नये अशी मी प्रार्थना करत आहे. तुला शांतपणे झोप घेता येईल असेच सगळे होईल अशी विधात्याकडे मी याचना करत आहे. यथावकाश तुझे पति पृथ्वी पुन्हा जिंकून घेणार आहेत असा माझा विश्वास आहे. कारण तुझे पति साक्षात देव आहेत. सर्व शुभ लक्षण अंगावर असलेली तू फार काळ दुःखात राहू शकत नाही. तुझे पति त्यांचे राज्य पुन्हा प्राप्त करणार आहेत असें माझे मन सांगते. ते धृतराष्ट्राच्या मुलांना पराजित करून त्यांच्यावर झालेल्या अपमानाचा बदला घेतील. तू वनवासात जातांना जे तुला हसत होते तेंच त्यावेळी दुःखाच्या महासागरात बुडलेले असतील. त्यातील सगळेंच यमाच्या घराकडे गेलेले असतील. तुझे पांच पुत्र जे तुझ्या पांच नवर्यांची निशाण आहेत ते युद्ध कलेत निष्णात झाले आहेत. ते सगळे, म्हणजे युधिष्ठीराचा प्रतिविध्य, भिमाचा सुतसोम, अर्जुनाचा श्रृतकर्मन, नकुलाचा शतनिक आणि सहदेवाचा श्रृतसेन तूर्त आमच्याकडे द्वारकेस मजेत आहेत. त्यांची काळजी करू नकोस. सुभद्रा त्यांची सगळी व्यवस्था चोख पहात आहे. जशी तू पाहीली असतीस तशीच ती करत आहे. ती त्यांच्या विवंचनासुद्धा चांगल्या समजून घेत आहे. प्रद्युम्नची मातासुद्धा त्यांची काळजी वाहत आहे".

केशव व त्याचा मुलगा भानु त्या दोघींकडे कौतुकाने पहात असतात. ते पांडवांना सांगतात, "द्वारकेत अंधक व वृश्नी त्या पांडवांच्या मुलांना आपले असें समजून घरच्या सारखे सांभाळत आहेत. त्यांना कांहीं कमी होत नव्हते. आपल्या मुलांसारखेच त्यांचे सगळे लाड पुरवले जात आहेत".

त्या सामोपचाराचे बोलणे झाल्यावर ते तेथून निघण्याची तयारी करतात. सत्यभामा रिवाजानुसार द्रौपदीला दोन प्रदक्षिणा घातले व तिच्या रथात चढते. कृष्ण पांचालीकडे प्रेमांने स्मित करतो व तिचा निरोप घेतो. पांडव त्या रथापाठून जात असतात. थोडे अंतर ते चालतात व नंतर रथाचे घोडे वेग घेतात व जनार्दनाचा रथ द्वारकेकडे वेगांने निघून जातो.

अशारितीने द्रौपदी सत्यभामा संवाद पर्वाचा ऐंशीवा भाग संपला.

# घोषा यात्रा पर्व (सुरू)
## भाग एक्याऐंशीवा

जनमेजय वैशंपायनांना विचारतो, मला सांगा ऋषीवर, माझे पूर्वज पृथाचे मुलगे, वनात थंडीवारा व पाऊस असें सगळे मोसम सहन करत रहात असतात, ते जेव्हां द्वैत सरोवर आणि त्याकडील अरण्यात जातात तेव्हां काय होते.

वैशंपायन सांगतात, पंडुची मुलं त्या द्वैत सरोवराकडे आल्यानंतर ते एक असा भाग रहाण्यासाठी निवडतात जो इतर मानव वस्तीपासून दूर आहे. ते झाल्यानंतर ते त्यांची नित्याची आयुध घेऊन त्या सरोवराच्या भोवतीच्या रमणीय अरण्यात, दर्या खोर्यात मजेने विहार करू लागतात. त्यांच्या येण्याची खबर समजल्यावर त्या भागात असलेले वैदिक ब्राह्मण त्यांच्याकडे येऊ लागतात. त्यांच्या बैठका होऊ लागतात. पांडव अशांचे चाहते असल्यामुळें त्यांचे सदैव स्वागत ते करत असतं. असाच एके दिवशी एक वाक्सिद्धी असलेला ख्यातनाम ब्राह्मण त्यांना भेटावयाला येतो. त्याच्या बरोबर पांडवांच्या गप्पागोष्टी होत असतांना तो कांहीं घटनांचे त्यांना सांगतो. तो सांगतो, कीं, तो एकदा विचित्रवीर्याच्या कुळातील राजांच्या दरबारात गेला होता व तेथे तो त्यांना ज्यात धृतराष्ट्र सुद्धा होते सांगतो कीं, "पंडुची मुलं जी यम, वायू, इंद्र आणि अश्विनीकुमार पासून झालेली, कशाप्रकारच्या हाल अपेष्टांतून जात आहेत. ते ऐकून तो अंध राजा दुःखाने व्याकूळ झाला होता. तो ब्राह्मण पुढे सांगतो त्या पांडवांना कीं कृष्ण कसा त्यांच्या अशा परिस्थितीमुळें त्रस्त झाला आहे. त्याची असमर्थता तो ब्राह्मण युधिष्ठीराला सांगतो. ते वर्णन ऐकून धृतराष्ट्र विशेष दुःखात जातो कारण त्याचे मन त्याला खात असतें किं, ह्या सगळ्या परिस्थितीला त्यांचा अहंकार व पुत्रप्रेमाचा अट्टाहास कारणीभूत आहे. धृतराष्ट्र विचार करतो, युधिष्ठीर त्याचा सर्वात मोठा वारसदार आहे, तो अशारितीने मातीत झोपतो व पहाटे पक्षांच्या किलबिलाटाने उठतो जो एकेकाळी त्याच्या सजवलेल्या आलिशान शयनगृहात निजत असें जेथे ऐंकू हरणाच्या कातड्याचे मुलायम बिछाने होते व सकाळी सुत आणि मगध गायक आपल्या सुमधूर गाण्यांने त्याला जागवत असत. त्यानंतर धृतराष्ट्राला त्याच्या दुसर्या पुतण्याची आठवण येते, तो वृकोदर, त्याचा क्रोधी स्वभाव त्याला आठवतो. उन्हा

वार्यात तो कसा रहात असेल त्यांचे त्याला दुःख होते. ते त्या राजकन्येसह कसें त्या रानावनात रहात असतील असें प्रश्न त्याला सतावत होते. त्याला अर्जुनाची आठवण येते. तो अजिंक्य तारा कसा अशा प्रकारे दिवस काढत असेल? केवळ आपल्या मोठ्या भावाच्या आज्ञेत रहाण्याच्या व्रतामुळें ते सगळे ह्या अवस्थेत गेले आहेत ह्याचे त्या अंध राजाला अपरिमित दुःख होते असें तो ब्राह्मण युधिष्ठीराला सांगतो. त्याला शेवटच्या जोडगोळीची आठवण येते ते सुकुमार आणि ती पांचाली हे कसे त्या जंगलात कोठल्याही सोयीसवलती शिवाय रहातात त्याचे त्याला खूप वाईट वाटत असते, कारण ते सगळे, त्यांचा कांहीं अपराध नसतांना ते सगळे भोगत होते. त्या सगळ्यांचा काय परिणाम त्याच्या मुलांवर, कौरवांवर होणार आहे त्याच्या नुसत्या कल्पनेने तो अतीव कष्टी झालेला होता. त्या कल्पनेने व्यथीत झालेला तो धृतराष्ट्र रात्रंरात्र न झोपता काढत होता. धृतराष्ट्राला चांगलेच माहीत असते कीं, ते चार योद्धे हे सगळे सहन करतात ते केवळ त्याच्या मोठ्या भावाच्या आज्ञेत रहाण्याच्या वचनामुळें परंतु, जर त्या मोठ्या भावांनी त्यांना त्या वचनातून मुक्त केले तर काय होईल ह्याच्या नुसत्या कल्पनेने तो हादरत होता. युद्धात महाबली असूनही केवळ शब्द पाळावयाचा, जो त्यां मुलांनी त्यांच्या आईला दिला कीं, ते त्यांच्या मोठ्या भावाच्या आज्ञेत रहातील, म्हणून ते आता ह्या अवस्थेत रहात आहेत. त्यांचे वचन पाळण्याचे धोरण किती त्याना तापदायक झाले आहे तरी सुद्धा मोठ्या आत्मियतेने ते तसे करत आहेत त्यातच त्यांच्या सहनशिलतेची कल्पना येत होती. तरी जर उद्या युद्ध सुरू झाले तर त्या प्रत्येकानी जी आव्हानं माझ्या मुलांना दिली आहेत ती ते खरी करतील ह्यात शंका नको. एक वेळ युधिष्ठीर आणि त्याचे ऐकणारा धनंजय माझ्या मूर्ख मुलांना माफ करतील पण वृकोदर कधीच माफ रणार नाही. माझा मुलगा, दुःशासनाने जे जिव्हारी लागतील असें उद्‌गार त्यावेळी काढले ते भिम कधीच विसरणार नाही. त्याची आग माझ्या मुलांचा नायनाट करणार ह्यात शंका नाही. ते रागाच्या भरात व पूर्ण द्वेषाने प्रेरीत असें माझा सगळा वंश नष्ट करतील अशी मला भिती वाटते आहे. असें धृतराष्ट्राचे मनन ते ब्राह्मण पांडवांना सांगत असतो. तो ब्राह्मण पुढे सागतो कीं, त्या कौरवांना चांगलेच ठाऊक आहे कीं, दुर्योधनाने व त्याच्या कपटी कारस्थानी मित्र आणि नातेवाईकांनी मिळून केवळ कपटांनी पांडवांना फसवून त्यांची संपत्ती हडप केली आहे.

त्यातील मधूर तेवढे त्यांनी पाहिले परंतु, त्यानंतर येणार्या वादळाची त्यांना कल्पना आलेली दिसत नाही. माणसाला त्याच्या कर्माची फळ भोगावीच लागतात. त्या संपत्तीरुपी फळाचा केवढा ते विचार करत आहेत त्याचे त्या अंध बापाला वाईट वाटते. आपल्या कर्मफळांची संबंध आपल्या भाग्याशी असतो व जसे कर्मफळ तसेंच भाग्य ठरत असते. शकूनी त्याच्या मुळ स्वभावानुसार कपटाने युधिष्ठीराशी वागला पण ते माझ्या मुलांसाठी हे मी विसरू शकत नाही असें तो अंध राजा ब्राह्मणाला सांगतो ते तो ब्राह्मण येथे पांडवांना सांगतो. ते पाप त्याने धृतराष्ट्राच्या पुत्रांसाठी केले म्हणून त्या पापाचा व त्यापासून निर्माण होणार्या कर्मफळांचा धनीसुद्धा धृतराष्ट्र व दुर्योधनच होणार हे स्पष्ट होते. त्या अंध राजाला ते सगळे त्याच्या मनःचक्षूंने दिसत होते. जे अटळ आहे ते कोणीही थांबवू शकत नाही. कर्म केले कीं, त्याची बरीवाईट जी फळ क्रमप्राप्त असतात ती ते करणार्याला भोगावीच लागतात. जसें वारा हलणारच त्याला कोणी थांबवू शकत नाही. संभोग घेतलेली बाई गरोदर होणारच, ते कोणी थांबवू शकत नाही. सूर्य उगवला कीं अंधार नाहीसा होणारच आणि सूर्य मावळला कीं अधार येणारच, हे जसें अटळ असते तसे माणसाचे भाग्य जे त्याच्याच कर्मफळामुळें त्याला प्राप्त होत असते ते कोणीही टाळण्याची स्वप्नं पाहू नये. त्यानुसार जे वाईट अनुभवास येणार ते येणारच. आपल्याशी जे घडते ते जर घडणारच तर ते टाळण्याची प्रयत्न कशाला करावा असें विचार माणसाच्या मनात येत असतात जे दैववादी असतात. परंतु, जे कर्मवादी असतात ते असा विचार करतात कि, त्या गत कर्माला काटशह देणारे नवीन कर्म करून आपले भाग्य आपण नव्याने घडवू शकतो. आधी होऊन गेलेल्या कर्माला सांप्रत केलेल्या कर्माने बदलण्याचा तो प्रयत्न असतो. भाग्य हे माझे कर्म व आता मी करतो तेसुद्धा माझेच कर्म अशाप्रकारे दोन कर्मांच्या द्वंद्वाने माणूस त्याचे नवीन जास्त योग्य फळ प्राप्त करू शकतो त्यालाच कर्मयोगी म्हणतात. जो कर्मयोगावर भरवसा करतो तो त्याच्या चुकीच्या कर्माचे परिणाम अशारितीने बदलू शकतो. म्हणजे माणसाला नेहमीच सुधारण्याची संधी असते परंतु, तेथे दैववादी दुर्लक्ष करतात. म्हणून ते त्यांच्या वाईट कर्माची फळं भोगत बसतात. आता पहा अर्जुनाचे उदाहरण, तो इंद्राकडे जाऊन शक्तीमान आयुध घेऊन आला कारण तो कर्मयोगी आहे व तो युधिष्ठीर दैवाच्या नांवाने तीर्थयात्रा करत आहे. असा कोणी माणूस आहे जो एकदा सदेह स्वर्गात

गेल्यानंतर पुन्हा पृथ्वीवर त्यांचे कर्म सुधारण्यासाठी आला आहे? अर्जुन जर फक्त स्वतःपुरता विचार करणारा असला तर ते झाले असते पण तो जबाबदार आहे असंख्य कुरुजनांचा, ज्यांचे जीवन नाशाच्या दिशेने सरकत आहे व ते थांबवण्यासाठी तो पृथ्वीवर परत आला. खरा क्षत्रिय असा असतो तो त्याची जबाबदारी कधीही टाळत नाही. आता अर्जुनाकडे त्याच्या गांडीवा बरोबर आणखीन चार आयुध आहेत. त्यामुळें त्याचा विजय सुनिश्चित आहे. हे ब्राह्मणांचे धृतराष्ट्रा बरोबर होत असलेले संभाषण सुवल पुत्र शकूनी चोरून ऐकत असतो. तो तेथे जातो जेथे दुर्योधन कर्णासह दुसर्या दालनात बसला होता. तेथे त्यांचे कांहीं गुप्त बैठक होत होती. दुर्योधनाला सुवल पुत्र ते सांगतो कीं, अर्जुन स्वर्गातून महाबली आयुध शिकून व ती घेऊन आला आहे. ते ऐकल्यावर तो कौरव चिंतेत पडला आहे असें तो ब्राह्मण युधिष्ठीराला सांगतो.

अशारितीने घोषयात्रा पर्व भाग एक्याऐंशीवा संपला.

# घोष यात्रा पर्व

## भाग ब्याऐंशीवा

वैशंपायन पुढे सांगत असतात, ते धृतराष्ट्राचे बोलणे ऐकून शकूनी संधी मिळताच कर्णाच्या मदतीने दुर्योधनाची स्तुती करावयास सुरूवात करतो, "तुझ्या चतुराईने तू त्या शूरवीर अशा पांडवांना वनात हकलवून लावल्यानंतर पृथ्वीचा राजा झाला आहेस. तुला कोणी प्रतिस्पर्धी उरलेला नाही. हे जसें इंद्राचे झाला आहे तसे झाले आहे. तू व तुझे बंधू श्रीमंत झाले अहात. जे राजे पांडवांना खंडणी देत होते ते आता तुम्हाला देत आहेत. सगळ्या चारही दिशांतील राजे तुला खंडणी देण्यासाठी येत आहेत. सगळे पृथ्वीचे बलशाली राजे तुझ्या आधीन झाले आहेत आणि ते सुद्धा कोणतीही लढाई न करता तू माझ्या अक्कल हुशारीमुळें साध्य केले आहेस. ही सगळी पृथ्वी तिच्यावरील समुद्र, पहाड, नद्या, वन, वस्तीचे प्रदेश अशा सह फक्त तुझ्या मालकीची झाली आहे. तुझ्या भोवती ते ब्राह्मण येऊन बसतात जे पूर्वी युधिष्ठीराच्या दरबारात बसत होते. तू सुर्यासारखा सगळ्या कुरू कुळात चमकत आहेस. जसें इंद्रा भोवती यम, रुद्र, मरुत, वसव, असतात. तुम्ही तार्यात जसा चंद्र तसे माणसांच्या राज्यात झाला अहात. म्हणून मला असें वाटते कीं, आपण त्या तुझ्या शत्रूंना, पांडवांना जाऊन झेडून त्यांना तुझे हे वैभव दाखवून चिडवू. ते कधी कोणाचा आदेश घेत नव्हते, जे कोणापुढे नमले नव्हते त्यांना खिजवू. मी असे ऐकले आहे किं, ते द्वैत वनाच्या परिसरात रहात आहेत. त्यांच्या भोवती बरेच ब्राह्मण सुद्धा रहात आहेत. तो एक जंगली प्रदेश आहे. तेथे तुझ्या थाटात जाऊन त्यांना जळवू. त्यांना दाखवू कीं, तू किती संपन्न आहेस आणि ते कसे भिकारी आहेत हे त्यांना दाखवून तू त्यांना त्यांची जागा दाखवावीस असें मला वाटते. त्यांना तू ययाति वाटला पाहिजेस. जसे ययातिच्या बरोबर असंख्य समर्थक होते तसे तू तुझे त्यांनां दाखवले पाहिजेस. अरे राजा, जो आपले वैभव त्याच्या मित्राला आणि शत्रूला दाखवतो तो खरा श्रीमंत समजला जातो. खरे सुख त्यात आहे जेव्हां माणूस त्याची संपन्नता अनुभवत असतांना त्याच्या मित्रांना व शत्रूंना ते गरीब असल्याचा अनुभव देतो. त्याची मजा वेगळीच असते. जसें उंच डोंगरावर उभा असलेला खाली तळाला असलेल्यांकडे पहातो तसे ते आहे. शत्रूला अडचणीत

पहाण्याचे जे सुख असते ते स्वतः मजेत असण्यापेक्षा जास्त असते. तू श्रीमंती वस्त्र नेसलेला जेव्हां त्या धनंजयाला व युधिष्ठीराला चिंध्या नेसलेल्या अवस्थेत पहाशिल ते सुख विलक्षण असते त्याचा अनुभव तू घेतलाच पाहीजे असें आम्हाला वाटते. तुझी पत्नी उत्तमोत्तम वस्त्र परिधान केलेली दागदागिन्यानी सजलेली त्या भिकारणी सारख्या कपड्यात असलेल्या द्रौपदीला भेटेल त्याची मजा कांहीं और असेल. अशा प्रसंगाने बायकांत द्वेष भाव वाढेल त्यामुळें ती तिच्या भिक्कारड्या नवर्यांना जे सुनवेल ते खरे ऐकण्यासारखे असेल. दुःशासनाने तिला अर्धवस्त्रात खेचत आणले त्यापेक्षा हे नाटक जास्त मजेदार होईल.

वैशंपायन, राजा जनमेजयाला पुढे सांगत असतात, अशारितीने बोलून त्यांने व कर्णाने दुर्योधनाचे कान भरले आणि आता काय होते ते पहात गुपचुप तेथे उभे राहिले.

अशारितीने घोष यात्रा पर्वाचा ब्यांऐशीवा भाग संपला.

# घोष यात्रा पर्व

## भाग त्र्याऐंशीवा

वैशंपायान त्याला पुढे सांगतात, कर्ण व शकूनीचे ते वक्तव्य ऐकल्यावर दुर्योधन भलताच खूष झाला. परंतु, ताबडतोबच तो राजपुत्र दुःखी झाला ते पाहून कर्ण व शकूनी थक्क झाले. तो त्यांना बोलला, "अरे मित्रा कर्णा, तू जे सुचवत आहेस ते माझ्यासुद्धा मनात करण्याचे घाटत आहे. परंतु, मला भिती वाटते कीं, त्यासाठी आपल्याला वरिष्ठांची परवानगी मिळणार नाही. कारण माझे बाबा, धृतराष्ट्र त्यां पांडवांना होणार्या त्रासामुळें सदैव विवंचनेत असतात. माझ्या बापाला सारखे वाटते कीं, त्याने पांडवांना वनवासात पाठवून मोठी अक्षम्य चूक केली आहे. त्याला वाटते किं, पांडवांच्या वैराग्यपूर्ण जीवनामुळें त्यांची अध्यात्मिक शक्ती भारी झाली आहे व त्या शक्तीमुळें जेव्हां कांहीं अतिप्रसंग त्यांच्यात व आपल्यात उद्भवेल भविष्यात, तेव्हां आपल्याला ती शक्ती महाग पडणार आहे. जर त्या म्हातार्याला आपला उद्देश समजला तर तो मला त्यासाठी अजिबात परवानगी देणार नाही. तेथे जाण्या मागे दुसरा कोणताही उद्देश आपण त्याला दाखवू शकणार नाही. विदूर काय बोलतात ते तुला माहित आहेच. त्या सगळ्यांना त्या पांडवांचेच कौतुक आहे. मला अजून समजत नाही कीं मी काय करावे, जावे कीं, जाऊ नये. जर आपल्याला जावयास मिळाले तर मला खूप आनंद होईल, मलासुद्धा त्या दोघा वीरांना पहावयाचे आहे ते त्या चिंध्यात कसे दिसतात. त्या कृष्णाची काय हालत असेल त्या अरण्यात तेसुद्धा मला पहावयाचे आहे. मी खरे सांगतो, ह्या सगळ्या पृथ्वीची मालकी मला मिळाली तर जो संतोष होईल त्यापेक्षा जास्त संतोष मला होईल, त्यांना त्या रानात तडफडतांना पहाण्याचा. त्यांना त्या कातड्यात गुंडळलेले पहाण्याचा मजा काही औरच असेल. त्याच्या पेक्षा मोठा आनंद कोणता. त्या द्रुपदाच्या मुलीला फाटक्या कपड्यात पहाण्याचा मजा विशेष आहे माझ्यासाठी. त्या युधिष्ठीराला व भिमाला जेव्हां मी वैभवात दिसेन तेव्हां त्यांच्या काळवंडलेल्या मुखाकडे पहाण्याचा आनंद मी कधी वर्णन करून सांगू शकणार नाही. परंतु, प्रश्न असा आहे कीं, तेथे जाण्यासाठी असें कोणतेही पटण्यासारखे कारण मला सापडत नाही. जे मी माझ्या बापाला व पर्यायाने त्या विदूर काकाला सांगू शकेन. जर

तुम्ही असें कारण शोधून काढाल तर बरे होईल. त्यात शकूनी, दुःशासन तू आणि मी तेथे जाऊ शकू. तसेंच मला माझे मन तयार करावे लागेल त्या प्रयोजनासाठी त्यासाठी मला थोडा अवधी पाहिजे. मी उद्या राजा धृतराष्ट्राला भेटणार आहे माझ्या कामानिमित्ताने त्या आधी जर तुम्ही कांहीं बेत बनवू शकलात तर चांगले होईल". "तेथे जेव्हां मी भिष्मदेवांच्या बरोबर बसलेलो असेन तेव्हां तुम्ही तुमचा बहाणा सांगावा जो त्यांना पटेल व ते आपल्याला जाण्याची परवानगी सुद्धा देतील. योग्य बहाणा जर तुम्ही सांगू शकलात तर बाकीचे मी सांभाळून घेईन. त्यांच्या कडून मी परवानगी मिळवीनच". तसे बोलणे झाल्यावर ते कौरव आपापल्या घरी निघून जातात. दुसर्या दिवशी सकाळीच कर्ण दुर्योधनाच्या घरी जातो व स्मित करत बोलतो कीं, त्यांने एक मस्त योजना आखली आहे जी त्या म्हातार्यांना सांगितली तर ते परवानगी खात्रीने देतील. कर्ण बोलतो, "जर माझी योजना ऐकून घेशिल तर बरे होईल. योजना अशी आहे कीं, आपली गुरं त्या द्वैत जंगलात बसलेली आहेत. त्यांची व्यवस्था कशी आहे ते पहाण्याच्या बहाण्याने आपण तेथे जाऊ शकतो. राजांने त्याची पशुसंपत्ती वेळोवेळी तपासावयाची असते असा दंडक आहे त्यानुसार ते त्यांना पटणारे ठरेल. असा उद्देश दाखवून आपण त्या परिसरात जाऊ शकतो, त्यात पांडवांचा बोलतांना साधा उल्लेखसुद्धा करावयाचा नाही. एवढेच नाही, तर तेथे पांडव आहेत हे आपल्याला माहित असल्याचे त्यांना दाखवावयाचे नाही. त्या करतां मला खात्री वाटते तुझे तात व इतर वडील माणसें आपल्याला परवानगी देतील". दुर्योधन व कर्ण मोठ्या खुषीत व हसत ते बोलत असतांना तेथे शकूनी येतो व त्यांच्यात सामील होतो. शकूनी त्यांना बोलतो, "ही योजना मलासुद्धा प्रथम सुचली होती परंतु, मला येण्यास थोडा उशीर झाला. त्यात नाकारण्यासारखे कांहीं नाही. अगदी बिनतोड असा बहाणा आहे. असें बोलून तो दुर्योधनाचा मामा आपली पसंती दाखवतो. तो बोलतो कीं राजा ह्यासाठी खात्रीने परवानगी देईल. कदाचित त्यासाठी अधिकृत फर्मानसुद्धा ते काढू शकतात. कारण ते कारण वैध आहे. अशारितीने त्या तिघांचे सहमत झाल्यावर ते राजाच्या भेटीसाठी निघतात.

अशारितीने घोष यात्रा पर्वाचा त्र्याऐंशीवा भाग संपला.

# घोष यात्रा पर्व
## भाग चौर्याऐंशीवा

वैशंपायन सांगत असतात, ते तिघे धृतराष्टाराला भेटतात. तेथे त्यांची औपचारीक वास्तपुस्त होते. एकमेकांच्या तब्यतीची चौकशी करण्याचे संपल्यावर त्यांनी आधीच ठरवल्या प्रमाणे एक गवळी तेथे येऊन राजाला सांगतो कीं, पशुंची पहाणी करण्याचा समय आला आहे व कांहीं नवीन जन्मलेले आहेत, त्यांच्यावर खुणा करावयाचे कामसुद्धा करण्याची वेळ आली आहे तरी त्यासाठी कोणी मातबर तेथे द्वैतवनात धाडले गेले तर त्यामुळें गवळ्यांना काम करणे सोपे होईल. ते ऐकल्यावर तेथे असलेला दुर्योधन, राजाला बोलतो कीं, त्याच्या कडे वेळ आहे तरी तो त्यासाठी जाण्यास तयार आहे. शकूनी मध्येच बोलतो कीं, आम्हाला मृगया करण्यास जाऊन बराच काळ झाला आहे तरी त्या निमित्ताने आम्हीसुद्धा त्यांच्या बरोबर जाऊ इच्छितो. म्हणून आम्हाला तेथे आपले पशुधन पहाण्यास जाण्याची परवानगी द्यावी. ते ऐकल्यावर धृतराष्ट्र सांगतात, "मृगया करण्याची इच्छा चांगली आहे. परंतु, माझ्या माहीती प्रमाणे त्याच परिसरात तुमचे चुलत भाऊ जंगलात रहात आहेत. त्यांची भेट तुम्ही घेणे शिष्टाचाराच्या विरुद्ध होईल. जर तुम्ही कांहीं आगळीक केली तर ते तुम्हाला ठार मारू शकतात. कारण ठरल्याप्रमाणे तुम्ही त्यांच्या वाटेत जाणे अयोग्य होईल. म्हणून मी तुम्हाला त्या कामावर पाठवणे अयोग्य समजतो". असें बोलून धृतराष्ट्र त्यांची तेथे जाण्याची परवानगी रद्द करतो. तो राजा पुढे सांगतो, कर्णाकडे पहात, "अरे राधेया, ते जबरदस्त लढवय्ये आहेत हे तू जाणतोस. ते हल्ली तपोश्चरणात मग्न असतात हे मला माहीत आहे. त्यातील मोठा युधिष्ठीर एकवेळ तुम्हाला पाहून शांत राहील पण भिम व इतर तीन तसे रहातील असें सांगता येत नाही. त्यांच्याशी तुमचा मुकाबला झाला तर त्यात तुम्ही फारकाळ टिकाव धरू शकणार नाही. विशेषकरून भिम लवकर चिडणारा आहे. समजा, त्यांने दुर्योधनाला तेथे अरण्यातच ठार मारले तर ते कोणालीही समजणार नाही. तसेंच त्यांची भार्यासुद्धा त्यांच्या बरोबर आहे. तिचा तुझ्यावर राग आहे. जर कांही खटका उडाला तर तुम्ही खतम व्हाल व ते मला व्हावयाला नको. तिच्यात जे तपस्येमुळें सामर्थ्य प्राप्त झाले आहे त्यापुढे तू उभा राहू शकणार नाहीस. ह्या

सगळ्या भानगडी मला आता नको आहेत. ते जरी वनात असले तरी त्यांच्याकडे शस्त्रांचा साठा आहे. त्यांची ताकद फार मोठी आहे. तो धनंजय स्वर्गात जाऊन आला आहे त्याच्यापुढे तुमच्यापैकी कोणीही उभे रहाणार नाही. सगळे जग तो हरवू शकेल त्याच्यापुढे तुमची काय गत. तेथे जर जावयाचे असेल तर फार काळजीपूर्वक ते गेले पाहिजे. जर समजा तुझ्या सैनिकानी कांहीं आगळीक केली तर ते तुम्हा सगळ्यांना ठार केल्याशिवाय रहाणार नाहीत. म्हणून तुमच्या पेक्षा कोणी प्रामाणिकपणे काम करणारे पाठवणे जास्त श्रेयस्कर वाटते. ते ऐकल्यावर शकूनी पुढे होतो व धृतराष्ट्राला आश्वासन देतो कीं, ते पांडवांच्या भागात जाणार नाहीत. त्यांना भेटणार नाहीत. त्यात युधिष्ठीर शांत प्रवृत्तीचा असल्यामुळें त्याच्या कडून कांहीं धोका होईल असें वाटत नाही. दुसरे भाऊ त्याच्या आज्ञेत असल्याने त्यांच्यापासून सुद्धा कांही धोका होईल असे संभवत नाही. कृपया आम्ही असें कांहींही करणार नाही किं त्यांची नजर आमच्या वर पडेल. आम्हाला कृपया मृगयेला जाण्याची परवानगी द्या. आपल्याला तक्रार ऐकावयाला येईल असें कांहीही होणार नाही. मी आपल्याला शब्द देत आहे.

वैशंपायन सांगतात, त्या शकूनीच्या आश्वासनामुळें धृतराष्ट्र स्वस्थ होतो व त्यांना जाण्याची मुभा देतो. तरी त्याला ते सगळे मान्य नसते असे तो त्यांना सांगितल्याशिवाय रहात नाही.

परवानगी मिळाल्यावर ते त्यांच्या जाण्याची तयारी करू लागतात. दुर्योधन त्याच्या इतर भावंडांना सुद्धा बरोबर घेऊन जाण्याची तयारी करतो. त्याच्या बरोबर तो त्याचे सैनिकसुद्धा घेतो. त्याशिवाय त्यांच्या बायकासुद्धा जाणार असें ठरते. सैनिकांबरोबर बाजारबुणगे सुद्धा जाण्यास निघतात. कांहीं हस्तिनापुरातील लोक त्यांच्याबरोबर जाण्यास निघतात. आठ हजार गाड्या भरून लोक जाण्यासाठी निघाले. त्याबरोबर तीस हजार हत्ती होते पायदळ होते. ते सगळे एका मोठ्या सरंजामासारखे द्वैत वनात निघाले. त्यामुळें जो आवाज होत होता ढगाच्या गर्जने सारखा. असें ते त्या द्वैत वनात पोहोचले. परंतु, दुर्योधन त्या छावणीपासून चार मैल दूर त्याचा डेरा घालतो.

अशारितीने घोष यात्रा पर्वाचा चौर्याऐंशीवा भाग संपला.

# घोष यात्रा पर्व

## भाग पंच्याऐंशीवा

वैशंपायन पुढे सांगतात, राजा दुर्योधन त्यानंतर त्या वनात फिरत रहातो व तेथील स्वाभाविक सौंदर्याचा आनंद घेत असतो. त्याच बरोबर तेथील एकंदर परिस्थितीची पहाणी करत असतो. असें करत ते त्यांचे पशुधन ज्या भागात बसवलेले होते त्या जागी ते येतात. तेथे आपल्या सैन्याची छावणी टाकतात. तेथे निसर्ग सुंदर होता. पाणी मुबलक होते. त्या जागी रहाण्याची व्यवस्था तयार करणे उचित असें समजून ते तेथे त्यांचा डेरा टाकतात. कौरवांच्या राजेशाही निवासाच्या पासून जवळच कर्ण आणि शकूनीसाठी निवासस्थानं तयार केली जातात. ते होत असतांना ते कौरव त्यांचे पशुधन पाहू लागतात. त्यांची तपासणी करण्याचे काम इतर धनगरांच्या मदतीने सुरू होते. नवीन उपजलेल्यांना खुणा लावण्याचे महत्वाचे काम ते करू लागतात. तसेंच कालांतराने जन्मणार्या वासरांच्या गाईची मोजदाद करण्याचे काम करण्यास सुरूवात होते. त्यातील शेतीसाठी योग्य जनावरं किती व त्यांची विविध पद्धतीने ते वर्गवारी करू लागतात. तीन वर्षापेक्षा मोठी जनावरे किती ते पाहिले जाते. अशारितीने दैनंदिनी कामं करून उरलेल्या वेळी ते आसपासच्या प्रदेशात फेरफटका मारण्यास सुरूवात करतात. त्यांच्या बरोबर आलेले सैनिक व हस्तिनापुरचे रहिवाशी त्यात सामील होतात. त्यांचे गुराखी त्यांची वाद्ये वाजवून इतरांचे मनोरंजन करू लागतात. त्यात नांचगाणी विशेष होती. त्या मनोरंजनाच्या कार्यक्रमात राजघराण्याचे लोकसुद्धा त्यांच्यापरीने उपस्थित होतात. त्या आनंदात वाढ व्हावी म्हणून त्या राजघराण्याच्या बायका खाद्य आणि धनदौलतीचे दान करण्यास सुरूवात करतात. त्यामुळें त्या लोकांचा आनंद द्विगुणीत होतो. ते झाल्यावर त्यांच्या पशुधनाच्या संरक्षणासाठी तेथील तरसासारख्या हिंस्त्र पशुंची ते शिकार करू लागतात. त्याशिवाय खाण्यासाठी रानडुक्करं, रानरेडे, गवा अशा प्राण्यांचीसुद्धा ते हत्या करू लागतात. असें करत ते त्या वनात आतल्या भागात जाऊ लागतात. कारण ते प्राणी त्यांचा जीव वाचवण्यासाठी तसे खोल गर्द झाडीत पळून जात होते, म्हणून त्यांचा पाठलाग करत ते कौरवसुद्धा तसे जात होते. ते त्या प्राण्यांची हजाराने हत्या करत होते. कारण, इतक्या

लोकांच्या जेवणाची सोय त्यांना त्या पद्धतीने करावयाची होती. तसे जात असतांना त्यांना त्या द्वैतवनातील आणखीन सुंदर असं प्रदेश पहावयास मिळत होते. ते तेथे पकडलेल्या हरणींचे दुध पित होते जे त्यांना त्यांच्या घरी मिळणे दुरापास्त होते. त्या घनदाट अरण्यात जेथे क्वचितच कोणी माणूस गेला असेल तेथे विविध पक्षांचे ओरडणे त्यांना ऐकू येत होते. त्यात मोराचे केकावणे त्यांना विशेष आवडत होते. मधमाशांचा त्रास त्याना झाला परंतु, त्यांचे मध ते खात होते. असे भटकत ते अखेरीस त्या द्वैत सरोवरापर्यंत पोहोचतात. तेथे सप्तछंद, बकुळी, पुनंग अशा सुवासिक फुलांच्या झाडाचे बन त्यांना आढळते. तो हस्तिनापुरचा राजपुत्र त्याच्या वैभवशाली जाम्यानिम्यासह त्या सरोवराच्या प्रदेशात फिरत असतो. त्याचा रुबाब त्या स्वर्गाच्या अधिपतिपेक्षा कांहीं कमी नव्हता. आणि अरे जनमेजया, तुझा पूर्वज महा बुद्धिमान युधिष्ठीर, त्या सरोवराच्या दुसर्या किनार्यावर रहात होता. तो तेथे त्याच्या पत्नीसह एक राजर्षी नांवाचा यज्ञ करत होता. जो एक दिवसाचाच (नित्यपुजा) असतो. असा यज्ञ राजाने जेव्हां तो वनात मृगया अथवा दुसर्या कारणांने जातो तेव्हां करावयाचा असतो.

दुर्योधन त्याच्या सेवकांना सांगतो कीं, ते त्या सरोवराच्या किनार्यावर विलासगृह उभे करतील. त्या आज्ञेनुसार त्याचे सेवक त्या सरोवराच्या किनार्यांने त्या प्रदेशांची पहाणी करू लागतात. तसे फिरत असतांना ते एका अशा ठिकाणी पोहोचतात जेथे कांहीं गंधर्व वस्ती करून होते. ते दुर्योधनाचे सैनिक त्या भागात प्रवेश करतात तेव्हां त्यांना ते गंधर्व अडवतात. ते गंधर्व थेट कुबेराच्या घरातून आलेले असतात. त्यांचा राजा चित्रगुप्त त्याच्या अप्सरांबरोबर आलेला असतो. त्याच्या बरोबर त्याचे स्वर्गीय मुलं सुद्धा असतात. तेसुद्धा तेथे मजा करण्यासाठीच आलेले असतात. त्यांनी जो भाग व्यापलेला असतो त्या भोवती ते एक कुंप्रण घालतात व त्याच्या आत कोणालाही येण्यास मनाई असते. दुर्योधनाचे सेवक त्यामुळें अडवले जातात व परिस्थिती पाहून ते माघारी फिरतात. ते दुर्योधनाला जाऊन तसें सांगतात. दुर्योधन त्याचे खास योद्धे पाठवतो. त्यांना तो हुकूम करतो कीं, ते त्याचे सैनिक गंधर्वांचा पराजय करून त्यांना तेथून हाकलून देतील. त्यांना तो सांगतो कीं त्या गंधर्वांना प्रथम ताकीद द्या कीं धृतराष्ट्राचा महाबली पुत्र दुर्योधन येत आहे तरी बर्या बोलाने ती जागा रिकामी करा नाहीतर नाशास तयार व्हा. त्याप्रमाणे ते सैनिक तेथे

जाऊन गंधर्वांपुढे आव्हान देतात. ते आव्हान ऐकून ते गंधर्व हसू लागतात. ते त्या संदेशकाला बोलतात कीं, त्यांचा राजा दुर्योधन अक्कलशून्य आहे. तसे नसते तर अशा प्रकारचे आव्हान आम्हा स्वर्गाच्या रहिवाशाना कसे करेल? त्याला कांहींच कळत नाही. त्यानंतर ते गंधर्व त्यांना ताकीद देतात किं, जर ते हटले नाहीत तर ते तात्काळ मारले जातील. तुम्हीसुद्धा एक नंबरचे मूर्ख अहात नाहीतर असा मूर्खासारखा आदेश घेऊन तुम्ही येथे आलाच नसता म्हणून चांगले अहात तोवर निघून जा. नाहीतर आम्ही तुम्हाला यमाच्या घरी ताबडतोब पाठवून देऊ. ते गंधर्वांचे ऐकल्यावर कौरवांचे सैनिक परत फिरतात व तो निरोप दुर्योधनाला देतात.

अशारितीने घोष यात्रा पर्वाचा पंच्याऐंशीवा भाग संपला.

# घोष यात्रा पर्व

## भाग श्याऐंशीवा

वैशंपायन सांगत असतात, ते सैनिक त्यानंतर दुर्योधनाला भेटून जे घडले ते इत्तंभूत सांगतात. ते ऐकून अहंकाराने फुललेली तो धृतराष्ट्राचा मुलगा ते ऐकून संतापला. तो ओरडून त्या सैनिकांना आदेश देतो कीं, माझ्या आदेशांची पायमल्ली करणार्याना शिक्षा झालीच पाहिजे. तो हुकूम देतो त्याच्या लष्कराला कीं, ते जाऊन त्या गंधर्वांचा बिमोड करतील. त्याच्या त्या आदेशाप्रमाणे त्याचे हजाराचे सैन्य युद्धाच्या तयारीला लागते. आणि पूर्ण तयारीने ते त्या गंधर्वांच्या जागेला असलेल्या द्वाराबाहेर त्यांना आव्हान देण्यासाठी उभे रहातात. मोठ्या संख्येने ते कुरुचे सैन्य त्या गंधर्वांच्या छावणीवर हल्ला करतात. गंधर्व त्याला विरोध करतात. ते कौरवांचे सैन्य व त्यांचा राजा नीटपणे सांगूनही ऐकत नाहीत असें पाहिल्यावर ते गंधर्व त्यांच्या राजाला चित्रसेनाला तसा निरोप धाडतात. त्याला सगळा वृतांत निवेदन करतात. दुर्योधनाचा उद्धटपणा पाहून त्याचा संताप अनावर झाला. तो त्याच्या फौजाना आदेश देतो कीं, ते त्या उद्धटाला शिक्षा करतील. ते झाल्यावर सगळे प्रभावी गंधर्व आपापली आयुध घेऊन कौरवांच्या सैन्यावर तुटून पडली. त्यांचा अशारितीने प्रतिहल्ला झाल्यावर कौरवांचे सैन्य त्यांची शस्त्रे तशीच टाकून त्यांच्या राजाच्या समक्ष सैरावैरा पळत सुटली. ते सगळे जरी पळाले कर्ण, राधेय मात्र तसाच कणखरपणे रणांगणात उभा होता. त्यानंतर त्याने त्याच्या शिताफीने अनेक गंधर्व घायाळ केले. त्याच्यापुढे गंधर्वांची आयुधे जी हाडांची बनवलेली होती त्यात बाण भाले असें होते टिकू शकले नाहीत. अनेक गंधर्वांची मुंडकी तेथे पडली. त्यामुळें गंधर्वांच्या सेनेत हाहाःकार माजला. जरी कांहीं शे गंधर्व अशारितीने मारले गेले त्यांची संख्या फार जास्त होती. ते आव्हान गंधर्वाना घ्यावे लागत होते कारण तो आता त्यांच्यासाठी प्रतिष्ठेचा प्रश्न झाला होता. सगळ्या बाजूनी त्यांनी दुर्योधनाच्या सगळ्या छावण्यांना घेरण्यास सुरूवात केली. ते युद्ध दोनही बाजूंसाठी अटीतटीचे ठरत होते. कर्णाला मदत करण्यासाठी दुर्योधन स्वतः, शकुनी, दुःशासन, विकर्ण आणि आणखीन त्यांच्या रथातून निघाले. त्यांच्या रथाचां आवाज त्या परिसरात घुमत होता. त्याशिवाय इतर गाडे घेऊन कौरवांची सेना

गंधर्वांवर चाल करून जात होती. कित्येक घोडेस्वार होते. युद्ध तुंबळ झाले. विनाकारण दोनही बाजूने पुष्कळ हत्या होत होती. त्यामुळें आता गंधर्व त्यांच्या पूर्ण ताकदीने त्या संग्रामात लढावयाला उतरले. तो संग्राम असा होता किं, तो पाहून कोणाचेही शहारे उभे झाले असते. कौरवांच्या बाणाच्या वर्षावापुढे गंधर्वांची बाजू कमी ठरू लागली. ते पाहिल्यावर त्यांचा राजा चित्रसेन त्याच्या आसनावरून उठला व कौरवांचा सर्वनाश करण्याचा आदेश दिला. गंधर्वांनी आता मोहीनी विद्येचा उपयोग करावयास सुरूवात केली. त्या मायावी क्लुप्त्यामुळें कौरव हवालदील झाले. त्यांना कळेना कोठे मारावयाचे. ते त्यांच्याच योद्ध्यांना मारू लागले. चित्रसेनाची ही चाल कमालीची यशस्वी ठरली. ते झाल्यामुळें नवीन उत्साहात गंधर्व कौरवांच्या तुकड्यांवर तुटून पडत होते. आता कौरव खरोखरच हादरून गेलेले होते. त्यांचा असा गोंधळ उडाला होता कीं, त्यांना माघार घेण्याशिवाय गत्यंतर उरले नव्हते. कौरवांतील प्रत्येकाला आता त्यांच्या जीवाची काळजी वाटू लागली होती. त्या जीवाच्या धास्तीने ते युद्धभूमी सोडून इतस्ततः पळू लागले. परंतु, कर्ण सूर्यासारखा तेथेच खडा लढत होता. त्याच्यावर त्या मायावी जादूचा प्रभाव पडत नव्हता. त्याच्या कडून प्रोत्साहन घेऊन दुर्योधन, शकूनी आणि विकर्ण लढत होते. ते सगळे असंख्य वारामुळें जखमी झाले होते. त्यानंतर ज्या कर्णामुळें कौरवांना जोर आला होता त्याचाच काटा काढला पाहिजे ह्या नियमांने ते कर्णाच्या रथाभोवती गराडा घालून त्याच्यावर अखंड बाणांचा, भाल्यांचा वर्षाव करत होते. कोणाच्या मारामुळें त्याच्या रथाचा मुख्य दांडा मोडून गेला, कोणाच्या मारामुळें त्याचा ध्वज कोसळून पडला, असे होत होते. कांहींनी त्याच्या घोड्यांनाच मारून टाकले व एकाने त्याच्या सारथ्याला निशाण केले होते. एकाच्या निशाणाने त्याच्या डोक्यावरील छत्री तुटून पडली होती. कोण्या एकाने त्याच्या रथाच्या बाजूचे कठडे तोडले होते. अशारितीने कर्णाच्या रथाचे असंख्य तुकडे त्या जमलेल्या गंधर्व सैनिकांनी करून टाकले. त्यानंतर कर्ण मोठ्या चपळाईने त्याची तलवार व ढाल घेऊन विकर्णाच्या रथात शिरला व त्या सारथ्याला जीव वाचवण्यासाठी सांगितले कीं, त्यांने रथ त्या गर्दीतून पळवून न्यावा.

अशारितीने घोष यात्रा पर्वाचा श्याऐंशीवा भाग संपला.

# घोष यात्रा पर्व
## भाग सत्याऐंशीवा

वैशंपायन ऋषी जनमेजयाला सांगत असतात, कर्णाचा अशारितीने गंधर्वांनी पराभव केल्यानंतर, सगळे कौरवांचे सैन्य दुर्योधनाच्या नजरेसमक्ष त्या भागातून पळून गेले. त्यांना पळून जातांना पहात असूनही दुर्योधन मात्र तेथे तसांच उभा राहिला होता. त्याच्या अंगावर ते सगळे गंधर्व चालून येत असतांना दुर्योधन त्यांच्यावर उरलेले बाण मारत रहातो पण त्याची पर्वा न करता ते गंधर्व त्याला ठार मारण्यसाठी त्याच्यावर चाल करून जातात. ते गंधर्व त्याच्या रथाला चारही बाजूनी गराडा घालून उभे होतात. त्यांच्या बाणांच्या वर्षावाने ते त्याच्या रथाचे एक एक करून भाग तोडावयाला लागतात. रथाचे घोडे वेगळे केले जातात, रथाचा दांडा उखडून काढला जातो, ध्वजाचा दांडा पाडला जातो, चाकांचे सांधे काढल्याने त्याचा रथ कोसळून पडतो. ते त्याच्या सारथ्याला ठार मारतात. अखेरीस तो कौरव त्याच्या रथातून खाली फेकला जातो. त्या बरोबर महाबली चित्रसेन त्याच्या कडे जातो व त्याला कैदी करतो. त्यानंतर ते गंधर्व दुःशासनाला ताब्यात घेतात जो त्याच्या रथात बसून होता. त्यानंतर ते गंधर्व इतर कौरवांना अटक करतात. त्यात प्रामुख्याने विविंसती, घृत्रसेन, विंद, अनुविंद होते. त्याशिवाय ते गंधर्व त्या राजघराण्याच्या सगळ्या तेथे उपस्थित असलेल्या महिलांना अटक करतात. ते होत असतांना कौरवांचे जे सैनिक तेथे होते ते त्यांची अटक टाळण्यासाठी आधी पळून गेलेल्या सैनिकांच्या मागोमाग पलायन करतात. ते सगळे पळून गेलेले सैनिक जवळच असलेल्या पांडवांच्या छावणीकडे धावत जातात. आणि पांडवांना जे घडले त्याचा सगळा वृतांत सांगतात. गंधर्व मात्र माणसांना अटक केल्यानंतर जे सामान, घोडे, हत्ती वगैरे तेथे कौरवांचे होते ते पांडवांच्या हवाली करतात. ते सैनिक युधिष्ठीराला सांगतात कीं, त्यांचा राजा दुर्योधन व त्याचे कुटूंबिय गंधर्वानी अटक करून ते त्यांना घेऊन जात आहेत. ते सैनिक सांगतात कीं सगळेच कौरव ज्यात दुर्येधन, दुःशासन, दुर्वीशस, दुर्मुख, दुर्जय असें सगळेच आहेत. त्यांना साखळ्यानी बांधून ते घेऊन जात आहेत. त्यात त्यांच्या कुरु घराण्याच्या स्त्रियासुद्धा कैदी झाल्या आहेत. ते दुर्योधनाचे सैनिक जोरजोरानी ओरडत

रडत असतात. त्याना पांडवानी मदत करावी असें ते त्यांना विनंती करत असतात. ते ऐकून भिम त्या प्रौढ सैनिकांचे ऐकतो व युधिष्ठीराकडे घेऊन जातो. तेथे युधिष्ठीर त्यांचे ऐकतो ते सांगत असतात, "आम्ही आमच्या सगळ्या सैन्यानीशी घोडे, हत्ती व अनुभवी योद्धे असूनही गंधर्वांनी त्यांच्या मायावी विद्येने आमच्या फौजांचा धुव्वा उडवला". ते मान्य करतात कीं, त्यांच्या राजाला खोट्या सल्लागारांचे ऐकण्याची सवय आहे त्याचा हा सगळा परिणाम आहे. पुढे ते सांगतात, "ते सल्ला देणारे पळून गेले व आमचा राजा गंधर्वांच्या अटकेत गेला. आता त्याचे व त्याच्या कुटूंबियांचे काय होणार समजत नाही, कारण गंधर्व राजा चित्रसेन त्याला आव्हान दिल्यामुळें फार संतापला आहे. तो सुड उगवणार आमच्या राजावर हे निश्चित, तरी आपण काय कराल ते पहा". ते पुढे बोलतात, "देवाच्या कृपेने अजूनही ह्या कपटी जगात कांहीं लोक आहेत जे आम्हाला मदत करू शकतात व ज्यांनी आमची जबाबदारी घेतली आहे". ते ऐकल्यावर भिम त्यांना ऐकवतो, "तो नीच माणूस येथे आला आम्हला पहाण्यासाठी, स्वताचे समृद्ध जीवन आम्हाला दाखवून खिजवण्याचा त्याचा उद्देश होता, आम्ही येथे उनवारा पाऊस ह्यात उघड्यावर बसलो आहोत ते पहाण्यासाठी तो व त्याचे बगलबच्चे आले होते ते आम्हाला समजते. त्या नराधमाला त्याच्या बायकांना दाखवायचे होते आमची द्रौपदी कशी हालअपेष्टा सहन करत जगत आहे. त्यांना नियतिने चांगलाच धडा शिकवला आहे. असें करण्याचा सल्ला देणारा खरा दुर्जन आहे. परंतु, आम्ही कुंतीची मुलं तशी पापकर्मी नाही हे तुम्ही पहात अहात". भिम त्याच्या स्वभावानुसार कुत्सितपणे त्या कौरवांच्या सैनिकांना सुनवत असतांना तेवढ्यात युधिष्ठीर तेथे येतो व भिमाला शांत होण्यास सांगतो व बोलतो कीं, ही वेळ क्रूर चेष्टा करावयाची नाही.

अशारितीने घोष यात्रा पर्वाचा सत्त्याऐंशीवा भाग संपला.

# घोष यात्रा पर्व
## भाग अठ्ठ्याऐंशीवा

युधिष्ठीर वृकोदराला बोलतो, अरे माझ्या प्रिय भावा, त्यांना अडचणीत असतांना का कठोर भाषा वापरून आणखीन दुखवत आहेस. केवळ आपले सैनिक आहेत. त्यांना आपल्या संरक्षणाची आता आवश्यकता आहे. तो पुढे त्याच्या भावाला सांगतो किं, नात्यात (मित्रत्वामुळे) एकत्र असणे व (भांडणामुळें) नसणे ही नित्याची बाब आहे. अशा गोष्टी होतच असतात. परंतु जेव्हां कुटूंबाच्या इभ्रतीचा विषय येतो तेव्हां सगळ्या नातेवाईकांनी एकत्रच असले पाहिजे. नंतर तो प्रेमळ राजा त्या हवालदिल सैनिकांना शांत करतो व बोलतो, जर कोणी परका कुटूंबाच्या इभ्रतीशी खेळू लागला तर ते कोणीही सहन करू नये. त्या गंधर्वांना माहीत आहे कीं आपण येथे रहात आहोत तरी त्याचा मुलाहिजा न ठेवता त्यांनी आपल्या चुलतभावांवर हात उगारला हे निश्चितच अग्राह्य आहे. आपण ते सहन केले नाही पाहिजे. त्यांने ज्या पद्धतीने आपल्या भावाला अटक केले व आपल्या घरातील बायकांना बंदी केले हे एकापरिने आपल्यालच आव्हान आहे असें आपण समजले पाहिजे. मी आज्ञा करतो कीं, सव्यसांची, नकुल, सहदेव व तू स्वतः जाऊन दुर्योधनाला व आपल्या महिलांना सोडवून आणाल. आपल्याकडे ह्या सगळ्या युद्ध सामुग्री आहेत त्यांचा उपयोग करून ते तुम्ही साध्य केले पाहिजे. पुढे तो भिमाला सांगतो किं, हे हात जोडून आपल्याकडे याचना करत आहेत, ते सगळे क्षत्रिय आहेत, ते आपल्या आश्रयाला आले आहेत हे समजून तू त्यांना मदत करण्यासाठी पुढे झाले पाहिजे. वर (आशिर्वाद) मिळणे, सत्ता मिळणे, आणि पुत्र जन्मणे हे मोठ्या संतोषाचे असतात पण आपल्या शत्रूला वाचवणे हे त्याहूनही जास्त मोलाचे असते. युधिष्ठीर पुढे भिमाला बोलतो, "दुर्योधनाने तुझ्याकडे मदतीची भिक मागावी ह्यापेक्षा काय जास्त मजेचे असेल तुझ्यासाठी. त्याची हि लाचारी हेंच आपले यश हे तुझ्या लक्षात कसे येत नाही, अरे वृकोदरा". "अरे वृकोदरा, जर माझे व्रत संपलेले असते तर मींच त्यांच्या मदतीला गेलो असतो परंतु, अजून ते पूर्ण झालेले नाही म्हणून मी तुम्हाला त्यांना मदत करणासाठी जाण्यास सांगत आहे. कसेही करून तुम्ही त्यांना मुक्त करा, प्रथम सामोपचार करा, त्याने नाही जमले तर थोडी

दंगामस्ती करून पहा पण तरीही ते मानत नसतील तर त्यांचा बिमोड करून कौरवांना मुक्त करा. मी तुला एवढेच सांगू शकतो. माझे व्रत संपल्यावर मी तुमच्यात सामील होईन". वैशंपायन पुढे सांगतात, ते अजातशत्रूचे ऐकून धनंजय भिमाला विनंती करू लागतो कीं, आपण आपल्या मोठ्या भावाचा मान राखला पाहिजे. तो आपला नायक आहे. कौरवाना गंधर्वांच्या ताब्यातून काढून प्रथम आपल्या ताब्यात घेऊ. पुढे काय करावयाचे ते नंतर ठरवू. त्यानंतर अर्जुन ऐलान करतो कीं, "जर बर्या बोलांने गंधर्व राजाने कौरवांना बंदीवासातून सोडले नाही तर ही पृथ्वीची माती गंधर्वांच्या रक्ताने बरबटून जाईल". अर्जुनाच्या त्या ललकारीमुळें कौरवांच्या सैन्यात हुरूप येतो व तो थोडे स्वस्थ होतात.
अशारितीने घोष यात्रा पर्वाचा अठ्ठ्याऐंशीवा भाग संपला.

# घोष यात्रा पर्व
## भाग एकोणनव्वदावा

वैशंपायन सांगत असतात, त्यांच्या राजाचे ते उद्‍गार ऐकून चारही पांडव खूष होतात कारण त्यांना आता बर्याच अवधीनंतर लढण्यास मिळणार होते. त्यांचे क्षात्रतेज त्यांच्या चेहर्यावर चमकू लागते. त्यानंतर तो महाबली योद्धे युद्धाच्या कामाची तयारी करू लागतात. अंगावर चिलखतं चढवतात. त्यांची दैवी शस्त्रं आणि आयुध गोळा करतात. पूर्ण तयारीने ते पांडव त्यांच्याकडे आलेल्या रथात चढतात व मोहिमेला निघतात. त्यांच्या रथावर त्यांचे ध्वज फडकू लागतात. ते साक्षात सूर्यासारखे तेजस्वी दिसत होते. अशा तयारीने ते गंधर्व जेथे होते तेथे जातात. पांडव युद्धासाठी निघाले हे समजतांच कौरवांच्या लष्करात तुफान जोर चढतो व ते मोठ्याने ललकार्या देऊ लागतात. ते स्वर्गीय योद्धे विजयाच्या दिमाखात असतांना त्यांच्यापुढे पांडव येऊन उभे राहिले. गंधर्व पहातात कीं, चार पांडव त्यांच्या रथातून त्यांच्याकडे वेगांने येत आहेत. ते गंधमादनाचे रहिवाशी पांडवांचा इरादा समजतात व उलटवार करण्याच्या तयारीत सज्ज होतात. युधिष्ठीराने जसे सांगितले होते तसेच तेथे एक चकमक झाली. परंतु, जेव्हां धनंजयाच्या लक्षात आले किं, त्या गंधर्वांना त्यांचा उद्देश समजत नाही तेव्हां तो शक्रपुत्र त्यांना उद्देशून मोठ्याना बोलतो, "आमच्या भावाला बर्या बोलाने आमच्या सावाधीन करा". ते ऐकून ते विजयाच्या मस्तीत असलेले गंधर्व त्यावर हसत सुटले. ते अर्जुनाला उलट सांगतात, "अरे बच्च्या, आम्ही फक्त आमच्या राजाची आज्ञा ऐकतो ज्याच्या राज्यात आम्ही सुखाने आमचे आयुष्य व्यतीत करत आहेत. त्याच्याशिवाय कोणी आम्हाला आज्ञा करू शकत नाही". अर्जुन त्यावर सांगतो त्यांना, दुसर्यांच्या बायकांना पकडणे आणि माणसांबरोबर विनाकारण लढणे हे तुमच्या राजाला शोभत नाही. जर बर्या बोलानी तुम्ही धृतराष्ट्राच्या परिवाराला मुक्त नाही केले तर आम्हाला तुमच्यावर जबरदस्ती करावी लागेल. आम्ही तुम्हाला थोडा अवधी देतो तेवढ्यात तुम्ही त्याना मुक्त करा. त्यानंतर सलामी म्हणून त्या काळातील युद्ध नितीप्रमाणे अर्जुन बाणांचा वर्षाव त्या गंधर्वांच्या सैन्यावर करतो. तसे झाल्यावर पलिकडून ते गंधर्वसुद्धा बाणांचा वर्षाव करू लागतात. त्यामुळें युद्ध सुरू होते.

त्या चलाख व आगाऊ गंधर्वांकडून जोराचा हल्ला होत रहातो पांडवांवर. तुंबळ युद्ध सुरू होते.

अशारितीने घोष यात्रा पर्वाचा एकोणनव्वदावा भाग संपला.

# घोष यात्रा पर्व

## भाग नव्वदावा

वैशंपायन सांगतात, सोन्याच्या जरीचे कपडे व हार अंगावर घातलेले ते गंधर्व त्यांच्या दैवी आयुधांनी पांडवांवर हल्ला करण्यास प्रारंभ केला. पांडव फक्त चार होते व ते गंधर्व हजाराने होते ती लढाई विलक्षण दिसत होती. ज्याप्रमाणे गंधर्वानी कर्ण आणि इतर कौरवांचे रथ मोडून टाकले होते तसेच पांडवांच्या रथाचे करण्याचे धोरण त्यांनी अवलंबिले होते. गंधर्व पांडवांच्या रथावर वार करत होते. पांडव मात्र त्या गंधर्वांवर बाणांचा वर्षाव करत होते. त्यामुळें असंख्य प्रमाणात गंधर्व मारले जात होते. गंधर्वांनी पांडवांच्या रथांना घेरण्यास सुरूवात केली. तसे करूनही ते पांडवांना पूर्णपणे घेरण्यात यशस्वी झाले नाहीत. अर्जुन त्या परिस्थितीत चिडत गेला व शेवटी ठरवतो कीं, त्याला ती स्वर्गीय आयुध वापरावी लागतील. त्याशिवाय गंधर्वांना आटोपणे सोपे नव्हते. तो आग्नेय आयुध वापरतो व त्यामुळें लाखोनी गंधर्व ठार मारले जातात. भिमानेसुद्धा त्याच्या लांबलचक बाणांनी एका बाणात चार चार असें गंधर्व मारण्यास सुरूवात केली. त्याशिवाय नकुल व सहदेव त्याच्या धनुष्याने असंख्य गंधर्व यमाच्या घरी पाठवले. आपण पांडवांना हरवू शकत नाही हे लक्षात आल्यावर ते गंधर्व त्यांच्या काबिज केलेल्या कैद्यांनी घेऊन उंच आकाशात उडतात. ते पाहून अर्जुन त्यांच्यावर असा बाणांचा हल्ला करतो किं, ते आकाशात त्या बाणांमुळें तयार झालेल्या जाळीत सगळे गंधर्व व कौरव अडकून पडतात. त्यांना आणखीन वर उडता येत नाही. चिडून ते गंधर्व त्यांच्या गदा, सोटे अर्जुनावर फेकू लागतात. परंतु, अर्जुनाला त्याची आधीच कल्पना असावी कारण ते फेकलेले सोटे व गदा उलट त्यांच्यावरच जातील असे मायावी शस्त्र तो वापरतो. त्यानंतर तो आकडे असलेले बाण फेकू लागतो. त्यामुळें त्यात गंधर्वांचे पाय अडकत जातात व ते धड उभेसुद्धा राहू शकेना. त्यात अडकलेले त्यांचे अवयव तुटून खाली पृथ्वीवर येऊ लागले. ते पावसासारखे वाटत होते. तसे झाल्यावर गंधर्वांचा आत्मविश्वास खतम झाला व ते घाबरले. त्यामुळें त्यांचा संहार करणे पांडवांना जास्त सोपे झाले. गंधर्वांची हत्यारे ते वेगांनी खाली फेकण्यास सुरूवात केली. अर्जुनानी ती सगळी परत उलट त्यांच्याकडे भिरकावण्यास सुरूवात

केली. त्यात असंख्य गंधर्व गारद झाले. त्यानंतर तो त्याचे खास आयुधं बाहेर काढण्यास प्रारंभ करतो, त्याची नांवं, स्थुनकर्ण, इंद्रजाल, सौर्ण, आग्नेय, सौम्य. त्यांच्या आगीत बहुतेक गंधर्व जळून नष्ट होतात. जेव्हां दितीच्या मुलांना शक्र वज्राने मारत होता तसे गंधर्वाचे होत होते. तरीही ते पांडवांवर चौफेर हल्ला करतच होते. त्यांना ते शूरवीर पांडव चोख उत्तर देत होते. गंधर्वांच्या सैन्यात भिती शिरली आहे हे जसे चित्ररथाला जाणवते तो पुढे होतो. त्यांने मायावी सिद्धी वापरावयाला सुरूवात केली. त्यामुळें तो पांडवांना अदृष्य होतो. त्याला अर्जुनाची शस्त्र चोख उत्तर देत होती. त्यानंतर चित्ररथाला समजले कीं केवळ अदृष्य होऊन कांहीं साध्य होत नाही तो पूर्णपणे त्या ठिकाणाहून गायब झाला. अर्जुनाला समजते कीं, चित्ररथ मायावी सिद्धी वापरत आहे तेव्हां तो त्याच्याकडील त्यावर उपाय असलेली आयुध काढतो. त्यात मंत्रविद्येचा उपयोग होत होता. त्याला शब्दवेधी असें नांव आहे. त्यामुळें त्या माणसाच्या श्वासाच्या दिशेने तो वार करू लागतो. त्या योजने पुढे चित्ररथाचे कांहींच चालत नाही. आता पुढे येण्याशिवाय दुसरा मार्ग नाही हे लक्षात आल्यावर तो गंधर्वांचा राजा जो अर्जुनाचा मित्रसुद्धा होता, आपले रुप घेऊन त्याच्या पुढे अवतरतो. चित्ररथ अर्जुनाला बोलतो, "मी तुझा मित्र असतांना तू माझ्याशी कोणासाठी युद्ध छेडत आहेस"? अर्जुन त्यांनी फेकलेली शस्त्रं मागे घेतो. ते पाहिल्यावर इतर पांडवसुद्धा तसेच करतात. त्यानंतर ते घनघोर युद्ध थांबते. त्यानंतर तो आणि पांडव एकत्र होतात व एकमेकांच्या ख्यालीखुषालीचे बोलतात. त्यानंतर ते आपापल्या रथात थोडावेळ आराम करत बसतात.

अशारितीने घोष यात्रा पर्वाचा नव्वदावा भाग संपला.

# घोष यात्रा पर्व

## भाग एक्याण्णव

वैशंपायन पुढे सांगतात, तो प्रश्न ऐकल्यावर तो महापराक्रमी धनुर्धारी धनंजय त्याच्याकडे स्मितहास्य करत त्या गंधर्वराजाला बोलतो, "मला सांगा अहो सामर्थ्यवान गंधर्व राजा, त्या कौरवांना शिक्षा करून तुम्हाला काय मिळवावयाचे होते"? त्यावर अर्जुनाचा तो सच्चा मित्र उत्तर देतो, "माझ्या घरात बसलो असतांना मला त्या हलकट दुर्योधनाचे व त्याच्या चांडाळचौकडीचे बेत समजत होते. ते येथे कोणत्या पाप बुद्धीने ह्या वळणावर आले त्या मागील उद्देश मला चांगलाच समजला होता. तुम्हाला त्रासात पहाण्याचा व त्यातून आसुरी आनंद घेण्याचा त्यांचा विचार मला आवडला नाही. ते येथे तुम्हाला व तुमच्या पत्नीला चिडवण्यासाठी आले होते. पशु व्यवस्था पहाण्याचा बहाणा होता". तेवढे बोलल्यानंतर तो गंधर्वराजा त्याच्या सेवकांना सांगतो किं, त्या साखळदंडाने कैदी केलेल्या दुर्योधनाला आणि त्याच्या सल्लागाराला त्याच्या समोर आणावे. त्यावर तो गंधर्व राजा त्याच्या गंधर्व सैनिकांस आदेश देतो कीं, हे पांडव आपले मित्र आहेत म्हणून त्यांचे संरक्षण करणे आपले मित्र म्हणून एक जबाबदारी आहे, ते ध्यानात ठेवा. पुढे चित्रसेन अर्जुनाला सांगतो, "त्यानंतर मी माझ्या सैन्या बरोबर येथे डेरा टाकला व कौरव कसे येतात त्या सरोवराकडे त्याची वाट पहात बसलो. मी आलो तेव्हां तो नीच दुर्योधन आधीच जेरबंद झाला होता. आता मी त्या सगळ्या हरामखोरांना घेऊन जात आहे. परंतु, तू कांही वेगळे सांगत असशिल तर ते सांग". अर्जुन त्याच्या मित्राला बोलतो, "अरे मित्रा चित्रसेना, जर तू मला पाहिजे तसे करण्यास राजी असशिल तर एक गोष्ट कर, ह्या दुर्योधनाला आमच्या सुपूर्द कर. त्याला माझ्या भावाच्या समोर उभे करावयाचे आहे. तो आमचा बंधू आहे तेव्हां त्याचा निवाडा आम्ही  करावा असें वाटते". ते अर्जुनाचे ऐकल्यावर गंधर्व राजा त्याला सावधगिरीच्या उद्देशाने सांगतो, "अरे हा एकदम नीच आहे. त्याच्या शब्दावर विश्वास कराल तर पुन्हा नव्या अडचणीत याल. त्याने युधिष्ठीराला व तुमच्या पत्नीला धोका केला आहे. तुझ्या मोठ्या भावाला ह्याचा येथे येण्यामागील उद्देश माहीत नाही. तो भोळसट आहे, हा त्याला पुन्हा फसवेल व तुम्ही त्याचेच ऐकता म्हणून पुन्हा तुम्ही संकटात जाल.

मला ते होऊ नये असें वाटते. म्हणून प्रथम त्याला ह्याचे इरादे समजू देत आणि मग त्याला काय करावयाचे ते करू दे".

वैशंपायन पुढे सांगत रहातात, त्यानंतर ते सगळे युधिष्ठीराकडे त्या कैद्याला व त्याच्या सल्लागाराला घेऊन जातात. तेथे गेल्यावर ते युधिष्ठीराला दुर्योधनाच्या सगळ्या उद्देशाचे कथन करतात. ते सगळे ऐकल्यावर युधिष्ठीर त्या सगळ्या कौरवांना व त्यांच्या बायकांना व नोकराना बंधनातून मुक्त करतो आणि गंधर्व राजाकडे पाहून त्याचे आभार मानतो कीं, त्याच्या सारखा हितदृष्टी असलेला स्नेही पांडवांकडे आहे त्याचा त्या सगळ्या पांडवांना अभिमान आहे. ह्या लोकांना न मारता आमच्या कडे सुपूर्द केले त्याबद्दल तो त्यांचे पुन्हा आभार मानतो. त्यानंतर कौरवांकडे व त्यांच्या बायकांकडे पहात युधिष्ठीर त्यांना बोलतो कीं, त्या सगळ्यांना जीवंत आहेत हे पाहून त्याला व सगळ्या पांडवाना समाधान वाटत आहे. जर माझे भाऊ तुम्हाला सोडवण्यासाठी गेले नसते तर गंधर्वांनी तुम्हाला मारून टाकले असते. आता तुम्ही सुरक्षित अहात तेव्हढ्यातच आपल्या घरी जा असें तो कौरवांना सांगतो. त्यानंतर गंधर्व आणि त्यांचा राजा निघून जातात, तेथे इंद्र येतो व अमृताचे थेंब त्या मेलेल्या गंधर्वांवर शिंपतो त्यामुळे ते मेलेले गंधर्व उठून बसतात. पांडव गंधर्वांशी यशस्वी लढत दिल्याच्या आनंदात सूर्या सारखे चमकू लागतात. काळवंडलेल्या चेहर्याने दुर्योधन युधिष्ठीरा पुढे हात जोडून उभा असतो, त्याला उद्देशून तो प्रेमळ राजा त्याला सांगतो कीं, तो पुन्हा अशी हरकत करणार नाही. अशा कृत्याने कधीही चिरकाल टिकेल असा संतोष मिळत नाही, आता तुझ्या परिवारासह तुझ्या घरी जा.

वैशंपायन पुढे सांगतात, अशारितीने दुर्योधनाला मुक्त केल्यावर दुर्योधन त्याला लवून नमस्कार करतो व त्याची रजा मांगतो. त्याच्या तोंडावर शरमिंदेपणा स्पष्ट दिसत होता. त्याच्या हृदयात कमालीची कालवाकालव होत होती. त्याचा अहंकार पूर्णतया चुरडला गेला होता. तो व त्याचे लोक अंगात त्राण नाही असें मृतवत आपल्या ठिकाणी निघतात. ते सगळे गेल्यावर युधिष्ठीराच्या ठिकाणी ब्राह्मण त्यांची स्तुती करत त्यांच्या औदार्याचे कौतुक करत रहातात. पांडव मोठ्या खूषीने उर्वरित जीवन जगत रहातात.

अशारितीने घोष यात्रा पर्वाचा एक्याण्णवावा भाग संपला.

# घोष यात्रा पर्व

## भाग ब्याण्णवावा

जनमेजय वैशंपायनाना विचारतो, दुर्योधनाचे गंधर्वांकडून हरणे व कैद होणे त्यानंतर पांडवांच्या कृपेमुळें त्याचे मुक्त होणे आणि ते सगळे त्याच्या नोकर चाकरां समक्ष होणे व त्यांच्या बायकांच्या समक्ष होणे हे सगळे त्या मानी व अहंकारी, उर्मट, गर्विष्ठ, हट्टी कौरवाला असहय्य झाले होते. त्याला तोंड दाखवायलासुद्धा जागा राहिली नसेल अशा परिस्थितीत तो हस्तिनापुराला कसा गेला ते सांगा.

वैशंपायन सांगू लागतात, युधिष्ठीराने मोठ्या मनाने त्याला गंधर्वांकडून जिंकल्यानंतरसुद्धा कांहीं अपेक्षा न ठेवता सोडून दिले त्यांमुळें त्याच्याच माणसांच्या पुढे त्याची प्रचंड नाचक्की झाली होती. तो खाली मान घालून त्याच्या राजधानीत प्रवेश करतो. घमेंड करावी असें कांहींच त्याच्याकडे उरलेले नव्हते. एकटा पूर्ण निराश असा तो त्याच्या राजधानीकडे निघाला होता. त्याच्या बरोबर त्याचे चौपदरी सैन्य सुद्धा त्याच मनस्थितीत होते. परंतु, त्या सैनिकांच्या व त्या बायकांच्या मनांत पांडवांबद्दल अतीव आदर सन्मान उत्पन्न झाला होता. वाटेत मोकळा प्रदेश होता तो पहात विष्णण मनाने तो प्रवास करत होता. एका जागी ते थांबतात तेव्हां सकाळच्या प्रहरी त्याचा दोस्त व सल्लागार कर्ण त्याच्या जवळ येतो. तो गांधारीच्या मुलांस बोलतो, "नशीबामुळें आपण सगळे जीवानिशी वाचलो. केवळ सुदैवामुळें आपण पुन्हा भेटत आहोत. तू तुझ्या सैन्यानिशी त्या मायावी गंधर्वांना हरवून जिंकून आलास. त्यां शत्रूचा फडशा पाडलास. तू व तुझा परिवार तुमच्या साधन सामुग्रीसह सुरक्षित अहात. माझ्याबाबत सांगावयाचे म्हणजे, गंधर्वांच्या मारामुळें मला तुझ्या नजरेसमोर पळून जावे लागले. त्यांच्या असंख्य बाणामुळें माझे शरीर छिन्नभिन्न झाले होते ते तू पाहिले असशील. शत्रूच्या मारापासून मला पळून जावे लागले. परंतु, मला आश्चर्य वाटते कीं, तुम्ही असें कसें सुटला त्यांच्या तावडीतून? तुमचे सामानसुमान, बायकापोर नोकर चाकर सगळें असें सुरक्षितपणे कसे आलात. मला मान्य केले पाहिजे कीं, ह्या जगात तुझ्यासारखा धैर्यधर दुसरा नसेल. ते ऐकून दुर्योधनाला

समजते कीं, कर्णाला खरी बात माहीत नाही. अशारितीने घोष यात्रा पर्व ब्याणणवावा भाग संपला.

# घोष यात्रा पर्व

## भाग त्र्याण्णवावा

दुर्योधन त्याच्या डोळ्यात अश्रू दाटलेले असा कर्णाला सांगतो, अरे राधेया, तुला तेथे काय झाले त्याची माहिती नाही कारण तू रणांगण सोडून पळून गेला होतास. तुला वाटते कीं, मी त्या गंधर्वांना हरवले, परंतु, वस्तुस्थिती तशी नाही. तरी मी तुझ्या बोलण्यात कुत्सितपणा पहात नाही. कारण तुझ्या मनात माझ्याबद्दल जे प्रेम आहे त्यामुळें तू तसा कयास केलास हे मी समजू शकतो. हे खरे कीं आम्ही कौरव बराच काळ त्या गंधर्वांशी लढलो. दोनही बाजू तुल्यबळ होत्या, दोनही बाजूंची जीवहानी मोठी झाली. परंतु, ते हरत आहेत असें पाहिल्यावर त्यांच्या राजाने मायावी तंत्र वापरावयास सुरूवात केली व आमचा गोंधळ उडाला. त्यामुळें आम्ही त्यांच्यापुढे कमी ठरू लागलो. त्यानंतर आमचा दारूण पराभव झाला. त्या गंधर्वांनी आम्हाला बायकामुलांसह कैदी केले व साखळदंडात बांधून ते आम्हाला घेऊन जाऊ लागले. ते होत असतांना आपल्या कांही अधिकार्यानी पांडवांची मदत घेण्याचे ठरवले व त्यांना आपली सामुग्री, रथ, घोडे, हत्ती इत्यादि अर्पण करून आम्हाला सोडवावे अशी विनंती करू लागले. तुला माहित आहे, ते पंडुचे पुत्र कसे दिलदार आहेत, ते त्यानंतर आमच्या सुटकेसाठी गंधर्वांशी बोलणी करू लागले पण यशामुळें उन्मत्त झालेले गंधर्व ते मानायला तयार नव्हते. मग धनंजयाने युध्द छेडले व त्यात त्यांचा पराभव केला. तरी ते गंधर्व आम्हाला आकाशात ओढून नेतच होते. तेव्हां अर्जुनाने बाणांची जाळी आकाशात अशी तयार केली कीं, त्यातून त्या गंधर्वांना निसटून जाणे अशक्य झाले. नाहीतर ते आम्हाला सगळ्यांना आकाशात नेऊन ठार मारणार होते. त्यानंतर गंधर्वांचा राजा चित्ररथ अर्जुनाशी गोड बोलू लागला व आपल्याला कां तो मारून टाकणार होता ते सांगतो. त्यात आपण पांडवांचा जो छळ केला ते कारण त्याने सांगितले. त्या दोघानी एकमेकांना आलिंगन दिले. त्यानंतर त्यांनी तो आमच्या सुटकेचा मामला त्यांच्या मोठ्या भावाकडे सुपूर्द केला. त्यानंतर ते गंधर्व आणि पांडव एकत्र मित्रासारखे मिसळून गेले.

अशारितीने घोष यात्रा पर्वाचा त्र्याण्णवावा भाग संपला.

# घोष यात्रा पर्व
## भाग चौर्याण्णवावा

दुर्योधन पुढे कर्णाला सांगतो, ते शूरवीर योद्धे चित्रसेनाला सांगतात कीं, त्यांच्या चुलत भावांना सोडून देणे चांगले कारण त्यात कुरु घराण्याच्या बायका आहेत. त्याने कुरु घराण्याची इभ्रत खराब होईल. त्या बरोबर त्या पुरूषांना, म्हणजे आम्हाला, सुद्धा त्याने बिनशर्त सोडावयास मित्रत्वाच्या नात्याने सांगितले. ते गंधर्वांच्या राजाला सांगतात कीं, जोवर ते आहेत, कुरु घराण्याचा कोणी अशारितीने कैदी केला जाणे त्यांच्या इभ्रतीचा प्रश्न आहे. त्यावर गंधर्व त्यांना सांगतो आपला येथे येण्याचा उद्देश. आपल्याला त्या पांडवांच्या केवलवाण्या जीवनाची कुचेष्टा करावयाची होती ते तो त्यांना सांगतो. अरे कर्णा, ते तो सांगत असतांना ते चार पांडव अशा रितीने माझ्याकडे पहात होते कीं, मला असें वाटले कीं, ही पृथ्वी मला गिळून टाकेल तर बरे होईल. त्यानंतर आम्हाला असेंच साखळदंडात बांधलेल्या अवस्थेत त्यांच्या वडील भावाच्या समोर आणण्यात आले. जरा कल्पना कर माझ्या मित्रा, माझी काय गत झाली असेल जेव्हां त्या गंधर्वांनी आम्हा कौरवांना त्याच्या पाया पडावयास भाग पाडले. माझ्या ह्या हातांनी मी माझ्या शत्रूचे पाय धरले होते पण मला त्याक्षणी मृत्यू आला नाही. ते मरणापेक्षा जास्त भयंकर होते. दुःशासनाला द्रौपदीच्या आणि भिमाच्या पाया पडावयाला लावले, आणखीन काय पाहिजे बेइज्जत होण्याचे. त्यानंतर गंधर्वांनी आम्हाला युधिष्ठीराकडे त्याची खंडणी म्हणून दान केले. ते दान त्यांने स्वीकारले. हे सगळे आमच्या कुटूंबाच्या समक्ष होत होते. म्हणजे आम्हाला आमच्याच घरात बेईज्जत केले होते. मी पूर्णतया माझ्या शत्रूच्या आधीन होतो. काय अवस्था माझी झाली असेल त्याची तू फक्त कल्पना करून पहा. अरे कर्णा, कल्पना कर ज्यांना मी शत्रूसारखे वागवले व ज्यांचा मी छळ केला त्या पांडवांनी मला बिनशर्त मोकळे केले व आमच्या मुलाबाळांसह हस्तिनापुराला जाण्याची परवानगी दिली. ते मला ठार मारू शकले असते. पण त्यांच्या व्रतस्थतेमुळें त्यांनी तसे केले नाही. जर मला युद्धात मरण आले असते तर ते परवडले असते पण हे सुटणे मला मृत्यूपेक्षा जास्त भयंकर होते. क्षत्रिय युद्धात मरतात ते स्वर्गाला जातात पण अशी सुटका मला नरकात ढकलत आहे असें

वाटत होते. अशा सुटकेमुळें माझी सगळ्या क्षत्रिय जगात नाचक्की झाली आहे, तुला काय सांगू. आता ऐक माझ्या जिवलग मित्रा, असें नाचक्कीचे जीवन जगणे माझ्या सारख्या मानी राजाला मानवणारे नाही. तुला काय सांगू, माझी बायको ज्या नजरेने माझ्याकडे पहाते आता, ते मला अजिबात सहन होत नाही. मी काय सांगतो ते नीट ऐक, मी ह्यापुढे अन्नत्याग करून माझे आयुष्य संपवणार आहे. तुम्ही सगळे हस्तिनापुराला जा. मी एकटा आता तेथे जाणार नाही, असें तोंड घेऊन तेथे आता जाणे, जेथे मी मोठ्या रुबाबात वावरलो ते आता शक्य नाही. ज्या माझ्या कार्यामुळें माझ्या मित्रांची शान वाढली व शत्रूंची बेईज्जती होत होती, तो मी आता त्याच्या नजरेत खुपत आहे. पराजित माणसाचे हेंच होते त्याचा मी आता अनुभव घेत आहे. हस्तिनापुराला जाऊन मी तेथे वरिष्ठांना काय सांगणार? ते वडीलधारे भिष्म, कृपाचार्य, द्रोण, विदूर, संजय, वहूक, सोमदत्त आणि माझे पिता ह्यांना मी काय सांगू? त्यांना माझ्या शौर्याचा गर्व होता ते काय समजतील ते पहा. सगळे वरिष्ठ तेथे माझी पहाणी करतील, मला अनेक प्रश्न विचारतील, त्यांना मी काय उत्तर देणार? माझ्या सारख्या खोट्या समृद्धतेच्या व खोट्या ईभ्रतीच्या माणसाची समाजात काहीं किंमत नसते. फार काळ ती टिकतसुद्धा नाही. मी तुमच्या बोलण्यात येऊन फार मोठी चूक केली त्याचा मला पश्चात्ताप वाटक आहे. मी धादांत मूर्ख ठरलो आहे तुमचे ऐकल्यामुळें. म्हणून त्यातून एकच मार्ग मला दिसतो व तो आहे अन्नत्याग करून मरून जाण्याचा. स्वाभिमानी माणूस असें पराजिताचे आयुष्य जास्त काळ जगू शकत नाही. पांडवांच्या हिम्मतीपुढे व दानशूरते पुढे माझी आणखीन जास्त नाचक्की झाली आहे. ते सगळे मला हसत आहेत मनातल्या मनात, हे मला सहन होत नाही.

वैशंपायन पुढे सांगतात, अशारितीने कर्णापुढे बोलल्यावर दुर्योधन दुःशासनाला जवळ बोलावतो व सांगतो, अरे माझ्या भावा दुःशासना, तू ह्यापुढे माझ्या जागी असशील. तू ह्या पृथ्वीवर राज्य करशील. तुला त्या कामात कर्ण आणि शकूनी मदत करतील. जसे इंद्राने स्वर्गावर राज्य केले तसे तू पृथ्वीवर राज्य करशील. त्यात तू न्यायाने वागशिल. आपल्या मित्र व परिवाराचे कल्याण करशील, तुझे सगळे भाऊ तुला मदत करतील व तुझ्याशी प्रामाणिक रहातील. तू ब्राह्मणांना दानं करशील जशी आपण नेहमी करत आहोत. तू मित्रांना खूष करशिल व शत्रूंचा नाश करशिल जसे चांगला राजा करत असतो. तू तुझ्या

सगळ्या वडीलधार्यांचा यथोचित आदर करशील. ते त्याचे भावूकपणें बोलणे ऐकून सगळे त्याचे भाऊ बेचैन झाले. दुःशासन त्याला हात जोडून विनती करतो कीं तो अशी निर्वाणीची भाषा न करेल तर बरे होईल. त्यांच्या डोळ्यात अश्रू दाटून आले होते. तो कंठ दाटून आलेल्या सारखा दुर्योधनाला बोलतो, अरें माझ्या ज्येष्ठ भावा, अशी निर्वाणीची भाषा नको. मी तुला मरू देणार नाही. जगात कांहींही होऊ शकते पण हे होणार नाही. एकवेळ पृथ्वी दुभंगेल, आकाश फाटेल, सूर्याचे तेज नाहीसे होईल, वारा थांबेल, हिमालय त्याच्या जागेतून हलेल, समुद्राचे पाणी नाहीसे होईल, अग्नीची उष्णता नाहीशी होईल पण तू अशाप्रकारे मरणार नाहीस, पृथ्वीचा राजा तूंच रहाशिल. असें बोलून तो त्याचा भाऊ दुर्योधनाच्या पायावर आपले डोके ठेवतो. ते त्यांचे बंधूप्रेम कर्ण पहात होता. त्यानंतर तो त्या दोघांना बोलतो, "अरे दुर्योधना ही वेळ रडण्याची नाही. तुला एक राजा म्हणून कांहीं गोष्टींचे भान ठेवणे अगत्याचे आहे. असे सामान्य लोक रडतात, राजे नाही. अरे अनेक पराजय पचवून राजा अखेरीस यशाच्या शिखरावर जात असतो त्यालाच राजा म्हणून सगळे लोक मानतात. अशा एका पराजयाने जर तुम्ही असें हवालदिल झालात तर कसे होईल"? हि वेळ हिम्मत वाढवण्याची आहे, रडत बसण्याची अथवा मरण्याच्या गोष्टी करण्याची नाही". पुढे कर्ण त्यांना बोलतो, "माझ्यामते जे पांडवांनी केले ते कोणीही प्रामाणिक नोकर करतो. राजाचे संरक्षण करणे हेसुद्धा प्रजेचे कार्य असते व ते तुझ्या राज्यात तुझे नागरिक आहेत ह्या नात्याने जे युधिष्ठीराने केले ते त्यांचे कर्तव्यच होते व ते त्यांनी प्रामाणिकपणे केले एवढेच ह्यातून दिसून येते त्यात विशेष काय आहे. तुझ्या राज्यात ते सुखाने रहात आहेत, कांहीं कर भरत नाहीत, त्यांना आपण त्रास देत नाही, ह्या सगळ्या गोष्टीची भरपाई त्यांनी केली असेच मी समजतो. त्याबद्दल पाहिजे तर तू त्यांना कांही इनाम देऊन मामला मिटवून टाक, कारण, राजा प्रजेकडून कांहींही विनामुल्य स्वीकारत नाही. ह्यापेक्षा जास्त विचार करू नकोस". कर्ण पुढे सांगतो, पांडवांनी त्यांचे कर्तव्य केले, तू तुझे राजा म्हणून जे कर्तव्य असते ते कर व त्यातून मोकळा हो, उगाचच रडत बसू नकोस. चल उठ व हस्तिनापुरी निघ".

अशारितीने घोष यात्रा पर्वाचा चौर्याण्णवावा भाग संपला.

# घोष यात्रा पर्व
## भाग पंच्याण्णवावा

कर्ण पुढे त्यांना सांगतो कीं, त्याचे असे वागणे त्याला बालीशपणाचे वाटते. "अरे मित्रा, तुला शत्रूने हरवले होते व पांडवांनी त्याला हरवून तुम्हाला ताब्यात घेतले, ह्यांने काय फरक पडतो"? कुरुवंशाच्या राजा, तुला माहीत आहे किं, राज्यातील कोणीही क्षत्रिय नेहमीच राजाला मदत करण्यासाठी तयार असला पाहिजे असें गृहीत धरलेले असते. ते जरी राजाला माहीत नसले अथवा असले तरी त्यांनी वेळीच राजाला मदत करणे त्यांचे कर्तव्य आहे असें मानले जाते त्या प्रमाणें पांडवांनी जे केले ते त्यांच्या क्षात्रधर्मानुसार उचित होते असें मला वाटते. त्याचा एवढा काय विचार करत आहेस. पांडवानी त्यांचे ह्या राज्याचे नागरिक म्हणून जे कर्तव्य होते ते त्यांनी पार पाडले आहे असे तू कां समजत नाहीस? त्यात तुला शरम वाटण्यासारखे काय आहे. ह्या आधी ते तुझे गुलाम झाले होते, त्यांची सगळी संपत्ती तुझी आहे त्यांनी तुला वाचवले ते त्यांनी त्यांचे काम केले असे समजून तू स्वस्थ कां होत नाहीस? अशारितीने त्या पराजयाचे एवढे मनाला लावून घेणे तुझ्या सारख्या मर्दाला शोभत नाही. खाणे सोडण्याचा हा अविचार तू सोडून दे. जर तू माझ्या सांगण्याचा मान राखला नाहीस तर मीसुद्धा तुझी सेवा करत येथे बसून राहीन तुझ्या पायाशी. अरे माझ्या राजा, मी तुझ्याशिवाय जगू शकणार नाही. जेथे तू जाशिल तेथे मी जाणार. अशारितीने जर तू अनशनाने मेलास तर सगळे राजे तुझ्यावर थुंकतील त्याचा विचार कर. तुझे सगळीकडे हंसे होईल व तुझे शत्रू जिंकल्यासारखे ते होईल, तुला ते चालेल कां ते सांग".

वैशंपायन पुढे सांगत असतात, कर्णाच्या त्या युक्तिवादाने दुर्योधनाचे अजिबात समाधान होत नाही तो दुर्योधन त्याला सांगतो कीं, त्याच्या युक्तीवादात तथ्य नाही. पांडवानी मला सोडवणे हे कोणी एका क्षत्रियांनी सोडवण्या इतके सामान्य नाही. दुसरे असें कीं, ते माझ्या राज्याचे नागरिक नाहीत व तो तसांच तेथे अनशनाचे निश्चित केल्याप्रमाणे बसून रहातो. कर्णाला त्याचा युक्तिवाद फसल्याचे समजते व तो गप्प होतो.

अशारितीने घोष यात्रा पर्वाचा पंच्याण्णावा भाग संपला.

# घोष यात्रा पर्व

## भाग श्याण्णवावा

वैशंपायन सांगतात, दुर्योधनाचा जो अपमान झाला होता तो जिव्हारी लागल्याप्रमाणे, तो त्याचे जीवन संपवण्याचा निर्धार करतो. शकूनी दुर्योधनाचे सांत्वन करण्यासाठी त्याचा युक्तिवाद वापरून पहातो. तो बोलतो, "अरे कुरु राजपुत्रा, आत्ता जे कर्ण सांगत होता त्यात बरेच शहाणपण आहे". पुढे तो सुवलाचा मुलगा त्याला ताकीद देतो कीं, जे वैभव आज दुर्योधन उपभोगत आहे ते त्याच्या अक्कल हुशारीचे फळ आहे व ते तो अशारितीने व्यर्थ घालवू शकत नाही. भावनेच्या भरात शहाणी माणसे आपले जीवनाचे निर्णय घेत नसतात. शकूनी दुर्योधनाला बोलतो की, "तू कधी कोणाचे ऐकत नाहीस, नेहमी स्वताच्या मर्जीचेच करतो ते योग्य नाही. ज्याला त्याच्या हर्षाचे आणि दुःखाचे आवेग आवरता येत नाहीत तो कितीही संपन्न असला तरी नष्ट होतो जसें न भाजलेले मडके पाणी भरल्याने कोसळून पडते. जो राजा कमजोर आहे, ज्याच्यात पुरूषार्थ उरलेला नाही, जो जबाबदार्या टाळतो, जो भावनेच्या आहारी जाऊन निर्णय घेतो, जो वासनांध झाला आहे अशा सदोष राजाला प्रजा धिक्कारते. अरे माझ्या भाच्या, तुला कोणतीही मेहनत न करता फुकट ते वैभव प्राप्त झाले आहे म्हणून त्याची तुला किंमत नाही. परंतु, ते वैभव जे तू तुझे सांगतोस, ते खरेतर माझ्या कमाईचे आहे म्हणून तुला माझे ऐकावेच लागेल. अशा प्रकारे दुःख करत बसणे तुला शोभत नाही. पृथाच्या मुलांने तुला जीवनदान केले ते असें व्यर्थ जाऊ देऊ नकोस. उलट, तू माझ्यामते, त्या पांडवांना तुझे शत्रू समजतोस त्यांच्या कृपेने आज स्वतंत्र आहेस म्हणून, कांहीं बक्षिस दिले पाहिजेस. तुझ्या ह्या वागण्यात कांहीं बुद्धीमत्ता मला दिसत नाही. तू सुटला आहेस, गंधर्व तुला मारणार होते, म्हणून तू जास्त खूष व्हावयाला पाहिजेस. त्या पांडवांना बक्षिस म्हणून त्यांचे घेतलेले राज्य व संपत्ती देऊन तुझ्या मनाचा मोठेपणा दाखव व त्यांच्या उपकाराची परत फेड करून सिद्ध कर कीं कौरव कोणाचे उपकार ठेवत नाहीत. असें केलेस तर तुझी किर्ती सगळ्या जगात होईल. लोक तुझा हा पराजय विसरून जातील. असे केल्याने तुझ्या आत्म्याला आराम वाटेल व तुझे दुःख पार निघून जाईल. पांडवांचा तू द्वेष करतोस ते

सरासर चुकीचे आहे हे आता सिद्ध झाले आहे तेव्हां ती चुक सुधारण्याची संधी नियतीने तुला दिली आहे त्याचा फायदा करून घे. जर तू व पांडव एकत्र झाले तर तुम्ही कितीतरी जास्त सुखी व्हाल हे मला दिसत आहे. त्यांना त्यांचे वारशाचे व त्यांचे स्वकमाईचे असें सगळे धनदौलत परत कर आणि त्या पापापासून मुक्त हो. कारण पांडव जरी माझे कोणी लागत नसले तरी त्यांचा आधार माझ्या बहिणीला सदैव वाटतो असें ती मला नेहमी सांगत असते. त्या नात्याने जे मला उचित वाटते ते सांगत आहे. माझ्या बहिणीचे सुख ते माझे सुख असे मी मानतो. मी तुला नेहमी मदत करतो त्यामागील उद्देश तोच असतो. तू जर माझे हे ऐकलेस तर आपण सगळेच सुखी होऊ".

वैशंपायन पुढे सांगतात, शकूनीचे ते सांगणे व त्याच्या पायाशी पडलेला दुःशासन ह्या दोनांचा त्याच्यावर परिणाम होऊ लागतो. दुर्योधन दुःशासनाला उठवते, त्याच्या कपाळाचे चुंबन घेतो. कर्णाचे आणि शकूनीचे ऐकल्यावर दुर्योधन आणखीनच हवालदिल होतो. तो आणखीनच शरमेने लाजिरवाणा होतो. त्याला समजत नाही नेमके काय करावे. कर्णाचा सल्ला व शकूनी मामाचा सल्ला ह्यात गुणात्मक भेद त्याला जाणवतो. त्यातील जास्त रास्त काय समजावे ते त्याच्या ध्यानात येत नाही. तो दुःखात त्यांना सांगतो, "तुम्ही जे समजावयाचे ते समजा, पण मला आता पुण्य, संपत्ती, दोस्ती, वैभव, सत्ता आणि सुख अशा कोणत्याही गोष्टीत रस उरलेला नाही. मी माझे जीवन संपवणार आहे हा माझा अंतिम निर्णय आहे. तुम्हाला जे वाटत असेल तो  वाटो, मला त्यामुळें कांहीं फरक पडत नाही. मी राजधानीत गेल्यावर अनशनास बसणार आहे. तेथे मी माझ्या वडीलधार्यांची सेवा करण्यात माझं उरलेले आयुष्य घालवणार आहे. माझ्या मृत्यूनंतर पांडवांची त्या वनवासाच्या अटीतून सुटका करावी.". ते त्याचे निर्वणीचे बोलणे ऐकल्यावर त्याचे संबंधी त्याला सांगतात किं, "जे तुमचे तेंच आमचेसुद्धा होईल. तुझ्या शिवाय आम्ही राज्यात कसें जाणार"?

वैशंपायन पुढे सांगतात, अशारितीने त्याच्या सगळ्या आप्त संबंधीनी परोपरीने सांगूनही दुर्योधन त्याच्या निश्चयापासून ढळत नाही. त्यानंतर ते त्याचे प्रियजन तेथे जमिनीवर कुस गवताची बिछाईत तयार करतात. स्वतःला पाण्याच्या अर्घ्याने पुनित करून तो कौरव त्या गवताच्या गादीवर जाऊन बसतो. अंगावरील उंची वस्त्र काढून टाकतो व चिंध्या परिधान

करतो, तसा तो गांधारीपुत्र तेथे ध्यानास बसतो. प्राणत्याग करून त्या द्वारा तो स्वर्गात जाण्याची इच्छा धरून ध्यान करत रहातो. तो सगळी इंद्रीय संयमित करून त्याचे तप करू लागतो. ते होत असतांना तेथे ते दैत्य आणि दानव येतात. ज्यांना देवांनी चारीमुंड्या चीत केले होते. ते समजतात जर हा त्यांचाच भाऊ अशारितीने देवांना शरण गेला तर आपली बाजू आणखीन कमजोर होईल. ते बरोबर होणार नाही. ते दिती व दानुचे वंशज एक यज्ञ आरंभ करतात. त्यांना दुर्योधनाला त्यांच्याकडे खेचावयाचे असते. ते दैत्य दानव बृहस्पती आणि उशनाने तयार केलेले मंत्र पुटपुटण्यास सुरूवात करतात. अथर्ववेदात व उपनिषदात दिलेले मंत्र आणि प्रार्थना ते उच्चारू लागतात. त्यांचे अघोरी ब्राह्मण त्या यज्ञाचे पौरोहित्य करत होते. ते साजूक तुपाची धार होमावर धरतात. तो विधी झाल्यावर एक विलक्षण अशी दिसणारी देवता तेथे उपस्थित होते. ती त्या यज्ञाच्या होमातून बाहेर येत असते. तिचे मुख सताड उघडे होते आणि विचारते, "माझ्याकडून कशाची अपेक्षा तुम्ही करत अहात"? ते दैत्या आनंदी होतात तिच्या येण्याने, ते तिला आज्ञा करतात कीं, ती धृतराष्ट्राच्या मुलाला जो आता मरणाची तपस्या करण्यासाठी बसला आहे त्याला उचलून आण. ती बोलते, तथास्तु, आणि त्या ध्यानाला बसलेल्या कौरवास उचलते. त्याला घेऊन ती पाताळात जाते जेथे ते दैत्य दानव होते. ती त्याला त्यांच्या हवाली करते. त्याला आलेले पाहून सगळे दैत्य दानव खूश होतात. तेथे आलेला दुर्योधन अचंबित असताना ते दैत्य व दानव त्याची स्तुती करत कांहीं सुनवतात.

अशारिताने घोष यात्रा पर्वाचा श्याण्णवावा भाग संपला.

# घोष यात्रा पर्व

## भाग सत्त्याण्णव

दानव त्याला सांगतात, "अहो सुयोधना, तू एक महान राजा आहेस, भरत वंशाचा वारस आहेस, तुझ्या भोवती नेहमीच मोठे शूरवीर आणि विद्वान ब्राह्मण असतात. असें असतांना तुला भूके मरण्याची दुर्बुद्धी कां झाली आहे ते सांग. आत्महत्या करण्याने तू नरकात जाशिल. अपयशाने निराश होण्यांने आत्महत्या करणे पाप समजले आहे. अपयश नसतांना केवळ मोक्षासाठी जो आत्महत्या करतो तो स्वर्गात जातो, ते तुला माहीत नाही असें दिसते, म्हणून तो तुझा निश्चय चुकीचा आहे तेव्हां तू हा आग्रह सोडून दे. असा आत्मघात सर्व दृष्टीने नुकसानकारक असतो. अशा चुकीच्या मृत्यूमुळें तुझा आनंद कमी होईल, प्रसिद्धी बिघडेल, हिम्मत नाहीशी होईल, तुझे सामर्थ्य नष्ट होईल, ते तुझ्या हिताचे नाही, आणि सर्वात जास्त खराब असें कीं, तुझ्या शत्रूंचा विजय होईल. ते तुला चालेल कां"?

त्यानंतर ते दानव त्याला सांगतात की, "तो दैवी कृपेचा प्रभाव आहे त्याचा जन्म व्हावा म्हणून दैत्य आणि दानवांनी मोठी तपस्या महेश्वराकडे केली होती फार प्राचीन काळी म्हणून तू त्या घराण्यात जन्मला आहेस. तुझा वरचा भाग वज्राचा आहे. म्हणून तो कोणत्याही आयुधाने अथवा शस्त्राने नष्ट होणारा नाही. तुझा खालचा भाग कामुक केलेला आहे व तो साक्षात उमाने तयार केलेला आहे. म्हणून तू एक स्वर्गीय व्यक्ती आहेस. तू माणूस नाहीस. तुझ्या शत्रूंचा संहार भागदत्ताचे सैन्य करणार आहे म्हणून तू त्याचा जास्त विचार करू नकोस. तुला भिण्याचे कारण नाही. तुला मदत करण्यासाठी दुसरे असुर सुद्धा जन्मले आहेत. भिष्म, कर्ण, द्रोण, कृप असें इतर तुझ्याकडे आहेत त्यांना असुरांनी भारावलेले आहे त्यामुळें ते तुझ्या बाजूने असतील. ते त्यांची विवेक बुद्धी हरवलेल्या अवस्थेत रहावेत असें आम्ही दानवांनी केले आहे. त्यामुळें ते तुला मदत करतील. एकदा आम्ही त्यांच्यात प्रवेश केला कीं, त्यांचा चांगुलपणा कोठल्या कोठे निघून जाईल. ते असुरांसारखेच वागू लागतील. ते त्यानंतर स्वताच्या बापाला, मित्राला, शिष्याला, मुलाला, नातेवाईकांना, लहान मुलांना, म्हातार्यांना, भावालासुद्धा तुझ्यासाठी ठार मारतील म्हणून तू एकटा आहेस असें अजिबात समजू नकोस. अज्ञानाच्या अंधाराने प्रेरीत

झालेले ते कुरुवंशी शूरवीर सगळी पृथ्वी सर्व प्रकारची शस्त्रे, आयुधे वापरून नरसंहाराने बरबाद करतील. ते एकमेकांशी घमेंडीत वागतील व एकमेकांचा अवमान करत आव्हानं देत असतील. त्यावेळी ते तेजस्वी शूर पांडव त्यांच्या प्रचंड ताकदीने आणि भाग्याच्या जोरावर तो नाश नियंत्रित करतील. आमच्यातील बरेच राक्षस आणि असुर क्षत्रिय कुळांत जन्म घेऊन आलेले आहेत ते तुझ्यासाठी त्या महायुद्धात भाग घेतील. ते त्यांच्या गदा, मशाली, बाण, भाले असें सगळे घेऊन तुझ्यासाठी लढणार आहेत. तुझ्या मनात धनंजयाबद्दल भिती आहे, म्हणून त्याला ठार मारण्याची खास व्यवस्था आम्ही तयार केलेली आहे. तुला माहीत नाही पण उमाने मारलेल्या नरकासुराने कर्णाला भारवले आहे. म्हणजे कर्ण हा नरकच झाला आहे. त्याप्रमाणे तो तुझ्या पाठीशी आहे. नरकाला त्याचे आधीच्या जन्माचे केशवाशी असलेले वैर चांगले आठवते त्यामुळें तो कृष्णाच्या मागे लागणार आहे, ह्या जन्मात कर्णाच्या रुपांने. इंद्र जो अर्जुनाचा जन्मदाता आहे त्यांने युक्तीने कर्णाचे कवच कुंडल काढू न घेतली असली तरी त्याला मदत करण्यासाठी असंख्य राक्षस त्याच्या दिमतीला आम्ही योजलेले आहेत. त्यांचा उल्लेख संसप्तलक म्हणून होईल. ते अर्जुनाचा नाश करतील तुझ्यासाठी. त्यानंतर तू ह्या जगाचा राजा होणार आहेस. तुला त्यानंतर कोणी प्रतिस्पर्धी नसतील. हे सगळे लक्षात घेऊन तू असा निराश मनाने स्वताचा मृत्यू ओढवून घेऊ नकोस. आत्ता जर तू मेलास तर आपली बाजू कमजोर होईल. तुझ्या मरण्याने त्या केशवाची बाजू मजबूत होईल ते चांगले नसेल आपल्यासाठी. कारण तू आमचा नियुक्त राजा आहेस, पृथ्वी वर राज्य करण्यासाठी हे समजून घे. जसे तुम्ही कौरव आमचे आधार  अहात तसेंच ते पांडव देवांचे आधार आहेत. खरे तर हे युद्ध देव आणि दानवांचे होणार आहे, फक्त माणसाच्या अवतारात".

वैशंपायन पुढे सांगतात, अशा प्रकारे त्याची समजूत ते काढतात. त्यानंतर ते दुर्योधनाला आलिंगन देतात. त्याच्या नावांचा जयजयकार करतात. त्याच्याशी प्रेमांनी बोलून त्यास खुष करतात व नंतर त्याला जाऊ देतात. तो जात असतांना ते सांगतात, "तुझा सदैव विजय होईल". त्यानंतर ती फताड्या तोंडाची दैवीशक्ती त्याला उचलते व जेथे मरण्यासाठी बसला होता त्याच ठिकाणी आणून ठेवते. त्यानंतर त्याचा अखेरचा निरोप घेऊन ती अदृष्य होते. ती यज्ञातील देवता निघून गेल्यावर दुर्योधनाला शुद्ध येते व काय

प्रकार झाला त्याचा तो अदाज घेऊ लागलो. ते स्वप्न तर नव्हते असें त्याला वाटू लागले. तो मनातल्या मनात विचार करतो जर सगळे दैत्य दानव माझ्यावर एवढा भरवसा करतात तर मी पांडवांना त्यांच्या कृपेने खचित हरवू शकेन. कर्ण अर्थात् नरकासुर आणि ते संसप्तलाकांचे सैन्य जे देवांचा नाश करण्यासाठी उद्युक्त आहेत त्यांच्या मदतीने मी पांडवांचा पुरता बिमोड करू शकेन. अशा विचारांमुळें त्याची पांडवांचा नाश करण्याची राक्षशी महत्वाकांक्षा वृद्धींगत होत जाते. त्याला आठवते कीं, कर्णाने अर्जुनाला ठार मारण्याची प्रतिज्ञा केली आहे. त्याशिवाय भिष्म, कृप, द्रोण हे सगळे त्याचे मिंधे आहेत ते त्याला आठवते. ते दानवांच्या मायावी प्रभावामुळें पांडवांबद्दल विशेष अनुकूल नाहीत तेसुद्धा त्याच्या निदर्शनास येते. हे सगळे लक्षात आले तरी तो त्या गोष्टी त्याच्या पुरत्या ठेवण्याचे ठरवतो. तशातच ती रात्र निघून जाते. दुसर्या दिवशी सकाळी कर्ण त्याला भेटण्यास येतो व बोलतो, "मृत माणूस कधी आपल्या शत्रूला हरवू शकत नाही. जोवर तो जीवंत आहे तोवरच ते शक्य असते. मेलेल्याला कोणी विचारत नाही. अरे कौरवा, तुझे पांडवांचे पारिपत्य करण्याच्या स्वप्नाचे काय होणार"? म्हणून हे वेळ दुःख करण्याची नाही. त्याच प्रमाणे भिण्याची किंवा मृत्यूची सुद्धा नाही. ते बोलत असतांना कर्ण दुर्योधनाला आलिंगन देतो. त्यानंतर त्याला आग्रह करतो कीं आता त्यांने उठावे व पुढच्या कारवाईचा विचार करावयाला प्रारंभ करावा. "त्या अर्जुनाच्या धाडसाची आठवण जरी झाली तरी तू कासावीस होतोस. परंतु मी तुला आश्वासन देतो कीं, तेरा वर्षे झाली कीं, मी त्या पांचही भांवांना तुझ्या पायाशी लोळण घ्यावयाला लावीन हा माझा वादा आहे". ते कर्णाचे शब्द आणि त्यांने जे दैत्यांचे संभाषण ऐकले होते त्या दोघांचा प्रभाव त्याच्या मनावर होऊ लागला होता. तो अखेरीस उठतो. तो नरकेसरी कर्णाच्या म्हणण्यानुसार हस्तिनापुराला जाण्यास तयार होतो. त्याचे सैन्य हत्ती, घोडे, पायदळ असें सगळे रथांबरोबर मोठ्या दिमाखात परतीचा प्रवास सुरू करतात. शुभ्र रंगाच्या छत्र्या, ध्वज घेऊन ते सैन्य पुढे सरकत असते जसे गंगेचे पाणी. त्यांचे भाट कौरवांचे स्तुतीगान करत होते. त्या सैन्याला सदैव विजय मिळावा असें गात होते. हस्तिनापुरात लोक त्याचे नमस्कार करून स्वागत करत होते. त्याच्या बाजूने कर्ण व शकूनी होते. त्यांच्या मागून दुःशासन, भुरिश्रव, सोमदत्त, वल्हीक, जात होते. त्या मिरवणूकीत अनेक विविध तर्हेच्या

रथांची रांग होती. सगळे पहाण्यासारखे होते. हत्ती, घोडे त्यावर बसलेल्या स्वारांसह पुढे सरकत होते. अशारितीने ते सगळे त्या राजधानीच्या शहरात प्रवेश करतात.

अशारितीने घोष यात्रा पर्वाचा सत्त्याण्णवावा भाग संपला.

# घोष यात्रा पर्व

## भाग अठ्ठ्याण्णवावा

जनमेजय राजा वैशंपायनाना विचारतो, "मला सांगा, पांडव त्या अरण्यात रहात असतांना धृतराष्ट्राची मुलं व त्यांचे सोबती काय करत होते. त्यात सूर्यपुत्र कर्ण, सुवलाचा मुलगा शकूनी, भिष्म, आणि द्रोण असें काय करत होते"?

वैशंपायन सांगतात, अरे राजा जनमेजया, दुर्योधनाला मुक्त केल्यानंतर पांडव त्यांच्या ठिकाणी जातात. दुर्योधन त्याच्या राजधानीला परततो. त्याला पाहिल्यावर भिष्म त्याला बोलतो, "अरे मुलां, मी तुला ताकीद दिली होती कीं, तू त्यांच्याकडे जाऊ नकोस तरी तू ते केलेस. असे तुझे वागणे मला आवडलेले नाही. तू तसे केले नाहीस त्याचे परिणाम तुला भोगावे लागले. त्या गंधर्वानी तुला नामुष्की व्हावी अशारितीने साखळदंडाने बांधून नेले ह्याचे मला फार वाईट वाटत आहे. अशामुळें आपल्या घराण्याची प्रतिष्ठा लयाला गेली असती परंतु, पांडवांच्या हिम्मतीमुळें थोडक्यात कुरु घराण्याची इज्जत शाबूत राहिली. तुला ह्याची लाज कशी वाटत नाही. तुम्ही कर्ण धरून सगळे, रणांगण सोडून गंधर्वांना घाबरून पळून गेले म्हणजे किती लाजिरवाणी बाब आहे आपल्याला. तुम्ही मोठे लढवय्ये शत्रूच्या मारामुळें असहाय झालेले होता तेव्हां पांडव तेथे आले. कर्णाकडे पहात रागाच्या भरात भिष्म बोलतात, "शस्त्रांच्या विद्येत, मर्दानकीच्या विषयात, आणि नैतिकतेच्या बाबतीत सुद्धा अरे सुतपुत्रा, तू कुचकामी ठरला आहेस. तू तुला सद्गुणी समजतोस पण पांडवाच्या तू एक चतुर्थांस सुद्धा नाहीस असे मला दिसत आहे. म्हणून कुरु घराण्याच्या स्वास्थ्यासाठी पांडवांशी समझौता करण्याची वेळ आली आहे". ते ऐकल्यावर त्यांच्या त्या बोलण्याची खिल्ली उडवत तो दुर्योधन त्याच्या मामाबरोबर त्या दालनातून निघून जातो. तो गेल्यावर त्यांच्या मागोमाग कर्ण व दुःशासन आणि इतर योद्धेसुद्धा भिष्माच्या कक्षातून निघून जातात. ते गेल्यावर असहायपणे भिष्म बसतो, त्याचा चेहरा पडलेला दिसतो, तो कपाळावर हात मारून घेत होता. त्यानंतर तो वृद्ध राजा त्याच्या कक्षात निघून जातो. दरबारातून भिष्म गेल्याचे पाहून तो धृतराष्टाराचा मुलगा पुन्हा तेथे येतो व त्याच्या खास मंत्र्यांबरोबर खलबतं करू लागतो. आपल्या भल्याचे काय आहे त्यावर ती

चर्चा होत होती. आता आपण पुढे काय करावे? असा सवाल होता. परिणामकारकपणे ते कसे साध्य करावयाचे हा प्रश्न ते पहात होते. कर्ण बोलतो, "अरे दुर्योधना, मी जे सांगणार आहे, ते तू गांभिर्याने घेणार असशिल तर बोलतो. तुझ्या आजोबांचे तुला दोष देणे व पांडवाचे कौतुक करणे तू मनाला लावून घेऊ नकोस. तो म्हातार तुझा व माझा द्वेष करत असतो हे लक्षात घेऊन त्याच्या बोलण्याकडे तू दुर्लक्ष करावेस असें मला सुचवावयाचे आहे. तुझ्या समक्ष तो नेहमीच माझा उपमर्द करत असतो. तुझ्या समक्ष त्यांने जे पांडवांचे कौतुक केले ते मला सहन झालेले नाही. मला सुचवावेसे वाटते कीं, जर तू मला सैन्य व इतर सामुग्री दिलीस तर मी पृथ्वी जिंकण्यासाठी निघतो व दाखवून देतो कीं आम्हीसुद्धा ते सगळे करू शकतो जे पांडवांनी केले आहे. सगळी मनुष्यवस्तीची ठिकाणं, रानं, डोंगर जिंकून मी तुला देतो, त्याशिवाय ह्या म्हातार्याचे तोंड बंद होणार नाही. तो तुला मला फालतु समजतो हे मला आवडलेले नाही. तो ज्यांची स्तुती केली पाहिजे त्यांना फटकारतो व ज्यांच्या कडे दुर्लक्ष केले पाहिजे त्यांची प्रशंसा करतो, एक अव्वल नीच माणूस आहे तुझा आजोबा. जे त्या चारांनी केले ते मी तुझ्यासाठी एकाहाती करून दाखवू इच्छितो. त्या कुरु घराण्याच्या नीच वृद्धाला दिसून दे कीं, त्याच्या आवडत्या पांडवांच्या पेक्षा जास्त हुशार माणसे कौरवांच्या हाताशी आहेत हे आपण त्याला दाखवून दिले पाहिजे. त्या म्हातार्याला माझी हिम्मत दिसावी असें मला वाटते. ते पाहिल्यानंतरच तो तुझ्यावर जी आगपाखड करतो ते थांबेल. अरे कौरवा, मी तुला आश्वासन देतो कीं, विजय तुझाच असेल". त्याचे ते उत्तेजन देणारे वक्तव्य ऐकल्यावर दुर्योधनाचा उत्साह येतो. कर्ण पुढे बोलतो, "अरे राजा मी तुझा ऋणी आहे. एवढे मी तुझ्यासाठी निश्चितच करू शकतो". "मी जो आज आहे तो तुमच्या कृपेमुळें तेव्हां, ते उपकार फेडण्यासाठी मला हे करावयाचे आहे. तरी मला मोहीमेवर जाण्यास परवानगी द्यावी व त्याची इतर तजवीज करावी. मला आज्ञा करावी महाराज". त्यानंतर त्या प्रमाणे कर्णाच्या मोहीमेसाठी तयारी करण्यास सुरूवात होते. त्यानंतर एक शुभ मुहूर्त पाहून तो त्याचे सैन्य घेऊन ब्राह्मणांचे आशिर्वाद घेऊन स्नान करून व पवित्र वस्तुंच्या पुजेने पवित्र होऊन सगळे सामान सामुग्री बरोबर घेऊन स्वारीला निघतो.

अशा रितीने घोष यात्रा पर्वाचा अट्ठ्याण्णावावा भाग संपला.

# घोष यात्रा पर्व

## भाग नव्याण्णवावा

वैशंपायन पुढे सांगत असतात, पूर्ण तयारीनीशी कर्ण त्याचे अवाढव्य लष्कर घेऊन द्रुपदाच्या राज्यावर चाल करून जातो. त्याच्या नगराला वेढा घालतो. तेथे भयंकर धमासांग युद्ध होते. सरते शेवटी द्रुपदाच्या सैन्याचा पराभव होतो. त्यानंतर कर्ण त्याच्या कडून भलीमोठी खंडणी वसुल करतो. त्याशिवाय त्याचे सैन्य जी लुट करते ते वेगळे. त्या यशानंतर तो इतर पांडवांच्या मित्र राजांवर हल्ले करू लागतो. त्याना हरवून त्यांच्याकडून सुद्धा खंडणी गोळा करण्याचा सपाटा सुरू करतो. त्या नंतर तो उत्तरेकडे सरकतो. तेथे भागादत्तचा पराजय करतो. त्या यशानंतर तो राधेय हिमालयाच्या पठारावर जाण्याचे ठरवतो. तेथे सतत लढाया करत व त्या भागातील राजांना काबिज करत ते मोठी रक्कम जमाकरून तो प्रदेश त्याच्या अमलाखाली आणतो. त्यानंतर तो हिमालयाचा उतार उतरून पूर्वेकडील देशांत जातो. तेथे अंग, बंग, मडीक आणि कलिंग ह्यांना पराजित करतो. त्यानंतर तो मगध, करकखंड, अविशिरस, योद्ध आणि अहिक्षत्र हे प्रांत ताब्यात घेऊन तेथून खंडणी गोळा करून पुढे जातो. तेथून तो बस्तभूमी कडे जातो. ती जिंकल्यावर तो केवली, मृत्तीकावती जिंकतो त्यांना खंडणी देण्यास भाग पाडतो. त्यानंतर मोहना, पत्रणा, त्रिपुरा, कोसल जिंकतो, त्यांच्याकडून खंडणी घेतो. तेथून तो दक्षिणेकडे जातो. तेथील महापराक्रमी दक्षिणात्य रुक्मी व कर्णाचा मुलगा ह्यांचात झगडा सुरू करतो. त्यांच्यात जंग होते त्यावेळी रुक्मी कर्णाच्या मुलाला सांगतो, अरे राजाधिराज, तुझे शौर्य आणि धाडस पाहून मला संतोष झाला. मी तुझे नुकसान करण्याच्या मनस्थितीत नाही. मी एक क्षत्रिय असण्याचे कर्तव्य निभावत आहे. तुला पाहिजे तेवढी सोन्याची नाणी मी द्यावयाला तयार आहे. ते झाल्यानंतर तो कर्ण पांड्य देशाकडे जातो. तेथील पहाड श्री पहातो. तेथे तो केरळ, नील राजा, वेनुदरीचा पुत्र, आणि इतर तेथील राजांचा पराभव करून त्यांच्या कडून खंडणी गोळा करतो. तेथून तो त्याच्या सैन्यानीशी शिशुपालाच्या मुलाच्या राज्यात जातो. त्या शिशुपालाच्या मुलांचा व इतर त्या भागातील राजांचा पराभव करून त्यांच्या कडून खंडणी घेतो. त्यानंतर तो अवंती घेतो व त्यांच्याशी समझौता

करतो. त्यानंतर वृश्नीकडे जातो. अशारितीने त्यांने पश्चिम जिंकलेली असते. त्यानंतर तो वरुणाच्या प्रदेशात येतो. तेथील यवन आणि बर्बर राजांचा पराभव करतो. अशारितीने त्याने उत्तर, पूर्व, दक्षिण आणि पश्चिम त्याच्या राज्यात जोडलेले होते. त्याशिवाय पश्चिमेकडे असलेली म्लेच्छ राज्ये त्यांनी त्याच्या अमलाखाली आणलेली होती. पहाडी भागातील भद्र, रोहीत, आग्नेय, मालव प्रदेश सुद्धा त्यांने पादाक्रांत केले होते. त्यानंतर महारथी नाग्नजित, कर्णाच्या आदेशांने शासक व यवन राजे जिंकतो. अशारितीने कर्णाने बोलल्याप्रमाणे त्या काळातील पृथ्वी संपादन केली होती. ती विजय यात्रा त्यानंतर हस्तिनापुरी निघते. त्याचे स्वागत करण्यासाठी राजा धृतराष्ट्र, त्याचा मुलगा दुर्योधन त्याची भावंडे त्या महारथीचे स्वागत करण्यासाठी नगराच्या सीमेवर आलेले असतात. कर्णाला सरसेनापतीचा बहुमान दिला जातो. त्या कौतुक सोहळ्यात दुर्योधन मोठ्या दिमाखाने सर्वांना सांगतो, जे भिष्म, द्रोण आणि कृप करू शकले नाहीत ते ह्या माझ्या परम मित्रांने केले आहे. कर्ण माझा मोठा आधार आहे असें तो जाहिर करतो. तो पुढे कर्णाची स्तुती करतांना सांगतो कीं, पांडव त्याच्या परम मित्राच्या, कर्णाच्या एक सोळावा भाग एवढेच आहेत. पुढे तो कर्णाला बोलतो कीं, जसे इंद्र आदितीला भेटला तसे तू माझ्या मातापित्यांचे आशिर्वाद घेण्यास जावे. त्यानंतर त्या सभेत लोकांचा आरडाओरड ऐकू येत होता. कांहीं कर्णाची स्तुती करत होते तर कांही कर्णाला दोष देत होते व कांही गुपचुप होते. फार कमी वेळांत कर्णाने ते यश संपादन केले होते. त्या भागातील सगळे डोंगर, दर्या, जंगलं, आकाश, शेतं, बेटं, गांव आता कौरवांच्या आधिपत्या खाली आली होती. त्यातून अगण्य संपत्ती त्यांने आणलेली होती. ठरल्या प्रमाणे, कर्ण राजा धृतराष्ट्र आणि महाराज्ञी गांधारी ह्यांची भेट घेतो. त्यासाठी तो त्यांच्या वाड्यात शिरतो. तेथे रिवाजानुसार तो त्या उभयतांचे पाय धरतो जसे, मुलगा त्याच्या मातापित्याचे धरतो. धृतराष्ट्र त्याला मिठी मारतो व त्यानंतर त्याला दूर करतो. त्या नंतर दुर्योधन आणि शकूनी असें गृहीत धरून चालतात कीं, पांडवांचा पराजय कर्णाने आधीच केला आहे व तो आमचा अंकित असल्यामुळे पांडवांचा पराजय कौरवांनी आधीच केला आहे. त्या समजुतीने ते संतुष्ट झालेले असतात.

अशारितीने घोष यात्रा पर्वाचा एक्याण्णवावा भाग संपला.

# घोष यात्रा पर्व

## भाग शंभरावा

वैशंपायन पुढे सांगत असतात, त्या विजयानंतर ते शत्रुघ्न पराक्रमी योद्धा कर्ण दुर्योधनाला सांगतो, अरे राजा, माझे तुला सांगणे आहे कीं, ह्यापुढे तू माझ्या सांगण्याप्रमाणेच काम करशिल असें आश्वासन मला तुझ्याकडून पाहिजे. कारण आता ह्या पृथ्वीतलावर तुझ्यासाठी कोणी शत्रू उरलेला नाही. जसे इंद्र स्वर्गावर राज्य करतो तसे, त्या जगावर तू राज्य करशिल अशी माझी अपेक्षा आहे. दुर्योधन त्याला उत्तर देतो कीं, ह्या जगात ज्याच्याकडे तुझ्या सारखा मित्र आहे त्याला कशाचीही कमी नसेल, म्हणून तू जसे सांगशिल तसेच होईल हे माझे तुला आश्वासन आहे. त्यानंतर कर्ण दुर्योधनाला बोलतो, "माझा एक उद्देश आहे. पांडवांनी तो राजसूय यज्ञ केला होता त्या प्रित्यर्थ पांडव सगळे जग जिंकून आले. मी तुझ्यासाठी आधीच सगळे जग जिंकून आलो आहे तेव्हां तू राजसूय यज्ञ करावास. म्हणजे तुझी पांडवांशी पद्धतशीरपणे बरोबरी होऊ शकेल. तू ब्राह्मणांना आमंत्रणं देऊन बोलवावे, जी सामुग्री पाहिजे ती जमा करावी, ऋग्वीजांनी रिवाजाप्रमाणे सर्व विधी करावा आणि तो यज्ञ संपन्न करावा. त्यात अरे राजा, खूप मजा आपण करावी ज्यात मांस, विविध पेये, मद्ये आपल्या आमंत्रितांना आपण खिलवून त्यांची कृपा मिळवावी असें मला वाटते". तो सोहळा शानदार झाला पाहिजे. कर्णाच्या बोलण्यानंतर दुर्योधन ब्राह्मणांना आमंत्रण देतो. त्यांना त्यांचा इरादा सांगतो, त्यांना सांगतो कीं, त्यांनी योग्यप्रकारे तो यज्ञ संपन्न करावा त्यासाठी जे लागेल ते सगळे त्यांना मिळेल. तो त्या ब्राह्मणांना आश्वासन देतो कीं, त्याबद्दल त्यांना अत्युत्तम दक्षिणा दिली जाईल. ते ऐकून सगळे ब्राह्मण आनंदी होतात. त्यानंतर जेव्हां त्या यज्ञाच्या तांत्रिक बाजूंचा विचार होतो तेव्हा त्या ब्राह्मणांना एक अडचण दिसून येते. ते कौरवाला सांगतात, "राजे, जोवर युधिष्ठीर हयात आहे तोवर त्या कुटूंबातील दुसर्याला असा यज्ञ करता येत नाही, असें संकेत प्राचीन ऋषींनी दिले आहेत. दुसरी अडचण अशी कीं, तुमचे पिता दीर्घायुषी आहेत. असा कारणांसाठी तो यज्ञ आपण करू शकत नाही. परंतु, तेथे आणखीन एक तितकांच श्रेष्ठ दर्जाचा यज्ञ सांगितलेला आहे. तो आपण संपन्न करू शकतो, हे आमचे बोलणे कृपया

ध्यानात घ्यावे". पुढे ते ब्राह्मण त्याला त्या दुसर्या यज्ञाची माहिती सांगतात. त्याप्रमाणे, ज्या राजांचा पराभव कर्णाने केला ते सगळे राजे चंदा जमवून एक सोन्याचा नांगर बनवून घेतील. त्या नांगराने राजा दुर्योधन यज्ञाची जागा नांगरेल व त्यानंतर तेथे यज्ञाची रचना उभी केली जाईल. त्या यज्ञाला वैश्नव यज्ञ असें म्हणतात. एक विष्णूदेव सोडला तर इतर कोण्याही राजकर्त्याने हा यज्ञ केलेला नाही. म्हणूनच त्याला वैश्नव यज्ञ असें नांव पडले आहे. हा यज्ञ राजसूय यज्ञाच्याच तोडीचा समजला जातो. त्या यज्ञाच्या संपन्न होण्याने तुझे कल्याण होईल. अशा यज्ञात राजसूय यज्ञाच्या अडचणी नसतात. त्यामुळें तो यज्ञ तुमच्यासाठी अगदी उत्तम ठरतो. असें ते तज्ज्ञ ब्राह्मण दुर्योधनाला सल्ला देतात. ते ऐकल्यावर दुर्योधन कर्णाशी त्याबद्दल बोलतो कर्णाचे मत घेतो. त्याच प्रमाणे तो त्याच्या भावंडांचा व इतर अधिकारी मंडळींचा विचार घेतो.

ते सगळे एकमतांने सांगतात कीं, ब्राह्मणांनी दिलेला सल्ला रास्त दिसतो. त्यानंतर त्या सगळ्या दुर्योधनाच्या हितचिंतकांच्या संमतीने ते ठरवतात कीं, कौरव वैश्नव यज्ञ करतील. त्यानंतर दुर्योधनाचे लोक त्या यज्ञाच्या कामाला लागतात. सोन्याचा नांगर बनवून घेतला जातो. इतर विविध कामं त्या प्रकारच्या कारागीरांकडून करून घेतली जातात. अशारितीने ब्राह्मण जे सांगतिल ते करण्याच्या आज्ञा दिल्या जातात.

अशारितीने घोष यात्रा पर्वाचा शंभरावा भाग संपला.

# घोष यात्रा पर्व

## भाग एकशेएकावा

वैशंपायन पुढे सांगतात, सगळें कारागीर, त्यांचे लोक आणि प्रधान मंत्री विदूर धृतराष्ट्राच्या मुलाला सांगतात कीं, यज्ञाची सर्व तयारी झालेली आहे. आता वेळ न दवडता वैश्नव यज्ञाला प्रारंभ करावा. तो सोन्याचा नांगर तेथे पहाण्यासाठी ठेवलेला होता. त्याप्रमाणे ब्राह्मण मंत्रोच्चार करण्यास प्रारंभ करतात. त्या सोन्याच्या नांगराची प्रथम पुजा केली जाते. सगळ्या आमंत्रितांच्या समक्ष तो नांगरणीचा विधी करावयाचा होता. जमलेल्यांना खाण्यापिण्याची उत्तम व्यवस्था केलेली होती. गांधारीचा पुत्र योग्य मंत्रानी शुचिर्भूत केला गेला. ते विधी सगळे जमलेले पहात होते. कुरु परिवारातील सगळे त्या निमित्ताने आनंदीत झालेले दिसत होते. दुर्योधन त्याच्या मांडलिक राजांना त्या यज्ञास हजर रहाण्यासाठी आमंत्रण देण्यासाठी संदेशक आणि ब्राह्मण पाठवण्याची व्यवस्था करतो. त्यानंतर दुःशासन एका संदेशकाला पांडवाना आमंत्रण देण्याची कामगीरी सोपवतो. तो त्या संदेशकाला सांगतो कीं, त्या द्वैत अरण्यात रहात असलेल्या त्या पांडवांना यज्ञाचे आमंत्रण दे. त्यात लिहीलेले असते किं, दुर्योधन त्याच्या स्वकमाईच्या प्रित्यर्थ वैश्नव यज्ञ करत आहे तरी त्याला उपस्थित रहावे. त्या संदेशकाचा निरोप वाचल्यावर युधिष्ठीर म्हणतो, "अरे वा, पूर्वजांची किर्ती वाढवणारा झाला आहे हा आमचा चुलत भाऊ, त्याचे भाग्य असेंच उजळत राहो. त्याच्या यज्ञाला आमच्या शुभेच्छा आहेत. आम्ही जरूर तेथे उपस्थित रहाण्याचे पाहू. परंतु, हल्ली ते शक्य नाही. आम्हाला तेरा वर्षे पूर्ण होईस्तोवर हस्तिनापुरात जाता येणार नाही. आम्ही वचनाने बांधलेले आहोत". युधिष्ठीराचे ते बोलून झाल्यावर भिम त्या संदेशकाला बोलतो, "तेरा वर्षानंतर आमचा भाऊ तेथे येईल व दुर्योधनाला युद्धाच्या आगीत ढकलून देईल. तुझ्या धन्याला सांग, तेरा वर्ष पूर्ण झाल्यावर हे पांडव युद्धाच्या खर्या यज्ञात कौरवांची आहुती देण्यासाठी येणार आहेत, त्याची वाट पहा. त्या यज्ञात पांडवाच्या क्रोधाचे तुप सोडले जाणार आहे". इतर पांडव कांहींच बोलत नाहीत. त्यानंतर तो संदेशक परत जातो. तो राजधानीत गेल्यावर धृतराष्ट्राच्या मुलास ते सांगतो. यज्ञासाठी अनेक प्रतिष्ठीत लोक आमंत्रित असतात ते उपस्थित होतात.

रिवाजाप्रमाणे सगळे विधी संपन्न होतात. त्या सगळ्या अभ्यागतांचे फार चांगले स्वागत होते, सगळे विधी उत्तमरित्या पार पडतात. आलेले पाहुणे फार खूष होतात. ब्राह्मणांना भरपूर दक्षिणा मिळाल्यामुळें तेसुद्धा फार खूष असतात. दुर्योधन त्याच्या भोवती त्याचे शेकडो भाऊ घेऊन तेथे त्या अतिथींचे स्वागत करत होते. जो तो त्या सोहळ्याचे तोंड भरून कौतुक करत होते. ते विदूराला बोलतात, आपण लक्ष द्या म्हणजे आपल्या सगळ्या पाहूण्यांचे चांगले स्वागत होईल व त्यांना उत्तम व्यवस्थेचा अनुभव येईल. कांहीं कमी पडू देऊ नका. तो नैतिकतेचा जाणकार त्या प्रमाणे सगळे व्यवस्थित करतो. त्याचा त्याला आनंद होत असतो. त्या जेवणात मांस, फळं, सुगंधी पेये, इतर शाकाहार जो मांसाबरोबर करावयाचा असतो तो असे सगळे आमंत्रितांना वाढले जात असते. पाहुण्यांचे स्वागत हार घालून केले जात होते. सुमधूर संगीताच्या वातावरणात तो सोहळा देखणा झाला होता. आलेल्या पाहुण्यांना उपरणी नेसवली जात होती व बायकांना शाली दिल्या जात होत्या. ते सगळे अविस्मरणीय असें होते. यज्ञासाठी उभारलेला शामियाना प्रशस्थ होता. त्यात अभ्यागत आरामात वावरत होते. आलेल्या ब्राह्मणांना दानं केली जात होती. सोहळा उरकून जाणार्यांचे निरोप देणे उत्तमरित्या होत होते. अशारितीने तो यज्ञ मनाप्रमाणे साजरा झाला. त्यानंतर दुर्योधन त्याच्या भावंडां बरोबर व कर्ण आणि शकूनी असें सगळे त्या शामियान्यातून निघून त्यांच्या घराकडे जातात.

अशारितीने घोष यात्रा पर्वाचा एकशे एकावा भाग संपला.

# घोष यात्रा पर्व

## भाग एकशे दोन

वैशंपायन सांगत असतात, जसा दुर्योधन त्याच्या वाड्यात प्रवेश करत असतो त्यांचे भाट त्याची स्तुती करत असतात. त्याच्या धाडसाचे, हिम्मतीचे, शौर्याचे, त्याच्या विविध खरे खोटे जयांचे कौतुक करत असतात. त्याच्या माथ्यावर तांदळाच्या अक्षता उधळल्या जात होत्या. चंदनाच्या अत्तराचे फवारे उडवले जात होते. त्याचे नागरिक त्याला शुभेच्छा देत असतात. ते राजाचे कौतुक करतात कीं, त्याच्या यज्ञात कशाचेही अरिष्ठ उपस्थित झाले नाही. त्यामुळें तो फार मोठा सुदैवी राजा आहे असें सगळे त्याची स्तुती करत असतात. कांहीं टिकाकार सुद्धा त्यात असतात ते मात्र कुत्सितपणे कांहीं बोलतात. ते बोलतात, पांडवांच्या राजसूय यज्ञाच्या तुलनेत हा यज्ञ फिक्का पडतो. ते बोलतात पांडवांच्या यज्ञाच्या तुलनेने हा वैश्नवी यज्ञ एक सोळावा हिस्सा वाटतो. त्यांच्या त्या उद्गाराचे काय परिणाम होणार त्याची ते पर्वा करत नव्हते. त्याच प्रमाणें कौरवांचे चाहते बोलत असतात कीं, त्यांनी इतका तेजस्वी यज्ञ आधी कधी पाहिलेला नाही. त्या स्तुतीमुळें प्रसंन्न झालेला दुर्योधन त्यांच्यावर विशेष कृपा दाखवत होता. ते स्तुती करणारे त्याला सांगतात, त्याचा यज्ञ ययाति, नहुष, मंधत्त आणि भरताच्या यज्ञाच्या तोडीचा झाला. ते ऐकून दुर्योधन व त्याचे भाऊ फार खूष होत होते. ते ब्राह्मण त्यांना सांगतात अशा यज्ञामुळे त्यांचे स्वर्गात जाणे निश्चित होते. असे सगळे कौतुक होत असतांना त्यात ते त्यांच्या निवासस्थानी पोहोचतात. तेथे तो त्याच्या मातापित्याचे पाय पकडतो. त्यानंतर ते भिष्म, विदूर, द्रोण आणि कृप ह्यांची पुजा करतो. त्याप्रमाणे त्याचे भाऊसुद्धा त्यांची पुजा करतात. सगळे फार आनंदात होते. त्यानंतर ते आपापल्या आसनांवर बसतात. त्यानंतर कर्ण उठून बोलतो, "सुदैवाने आपल्या सगळ्यांना फार चांगली साथ दिली आहे. अशा वातावरणात हा यज्ञ संपन्न झाला आहे. तरीसुद्धा अजून एक बाब उरलेली आहे व ती म्हणजे आपले खरे शत्रू अजून जीवंत आहेत. त्यांचा नाश केल्यानंतर तू अरे दुर्योधना, माझ्या मित्रा पुन्हा एकदा राजसुय यज्ञ करशिल असें मला वाटते. तेव्हांच मी तुझे खरे कौतुक करणार आहे. माझ्या मित्रा अजून आपले कार्य पूर्ण झालेले नाही म्हणून ह्या आनंदात तू ते विसरू

नकोस". ते ऐकल्यावर दुर्योधन उठून बोलतो, "मित्रा तू खरे तेंच बोलत आहेस. आपले काम अजून पूर्ण झालेले नाही. ते नीच पांडव मेल्यावरच खरे सुख मला मिळणार आहे. त्यानंतर जो राजसुय यज्ञ होईल तो खरा. हि नुसती सुरूवात आहे". असें बोलल्यानंतर कर्ण आणि दुर्योधन एकमेकांना आलिंगन देतात. त्यानंतर कर्ण बोलतो, "मी त्या सर्वश्रेष्ठ यज्ञाचाच सतत विचार करत असतो, जेव्हां त्या पांडवांचा नाश मी करीन तेव्हांच तो साध्य होणार माहे. ते जोवर आहेत तोवर तो यज्ञ आपण करू शकत नाही. म्हणून मी आज शपथ घेतो की, जोपर्यंत पांडवांचा नाश मी करत नाही तो पर्यंत मी मांसाहार करणार नाही, कोणाला माझे पाय धुण्यास देणार नाही, मद्य प्राशन करणार नाही. मी प्रथम अर्जुनाला मारणार आहे. कर्णाची प्रतिज्ञा असुरांच्या परंपरेतील होती त्यावरून दुर्योधनाला त्या दैत्य व दानवांचे बोलणे आठवते जेव्हां कर्ण तशी शपथ घेतो. ती शपथ ऐकल्यावर अति आनंदाने दुर्योधन मोठ्याने हसू लागतो. सगळे कौरव भावंड त्या शपथेमुळें आनंदाने जल्लोष करतात. त्यानंतर तो शूरवीर दुर्योधन ते सभागृह सोडून त्याच्या शयनकक्षाकडे निघतो. तो असा चालत असतो जसे कुबेर चित्ररथाच्या उपवनात चालत आहे. त्यानंतर ते सगळे शूरयोद्धे कौरव आपापल्या शयनकक्षाकडे जातात.
त्या सुमारास महापराक्रमी पांडव त्या दुर्योधनाच्या यज्ञाच्या खबरीने विलक्षणरित्या उत्तेजित झाले होते. त्या बातमीमुळें त्यांची सुख संपली होती. ते भयंकर प्रकारे त्या कौरवांचा विचार करत होते. त्याच वेळी त्यांचे दूत जे कौरवांच्या गुतावळ्यात बसून पांडवांसाठी खबरी जमा करत होते ते कळवतात अर्जुनाला ठार मारण्याची कर्णाची प्रतिज्ञा. ती प्रतिज्ञा समजल्यावर युधिष्ठीराचे स्वास्थ्य बिघडते. तो फार बेचैन होतो. त्याला माहित असते कीं, कर्ण एक महाबलशाली योद्धा आहे. त्याची शांती नष्ट होते. त्या विचारात तो द्वैत वन सोडून इतकत्र जाण्याचा मानस करतो. त्या सुमारास दुर्योधन कर्णाने कमावलेल्या पृथ्वीवर राज्य करू लागतो. त्याला मदत करण्यात त्याचे बंधू व भिष्म, द्रोण आणि कृप होते. त्याचा सरसेनापती होता कर्ण. दुर्योधन त्याच्या हाताखाली असलेल्या राजांना न्याय देण्याचे काम चोख करत असतो. तो उच्च दर्जाच्या विद्वान ब्राह्मणांचा वेळोवेळी आदर सत्कार करत असें त्यांना मोठी दानं करत असे. दुर्योधन त्याच्या

भावांच्या भल्याचासुद्धा प्रयत्न करत असतो. त्याची अशी कल्पना असते की, संपत्ती देणे व उपभोगणे म्हणजेच श्रीमंती.

अशारितीने घोष यात्रा पर्वाचा एकशेदोनावा भाग संपला.

# घोष यात्रा पर्व
## भाग एकशे तीन

जनमेजय वैशंपायनांना विचारतो, युधिष्टीरीला गंधर्वांच्या कैदेतून सोडवल्यानंतर पांडव त्या अरण्यात काय करत होते? वैशंपायन त्याला सांगतात, एकदा एका रात्री युधिष्टीर झोपला असतां त्याला एक स्वप्न पडते. त्या स्वप्नात तो पहातो कीं, काही हरीणं जी भितीने थरथर कांपत होती, त्याला हात जोडून रडत रडत सांगतात, अहो सामर्थ्यवान पंडु पुत्रा त्या शिकार्याना आवरा, ते आमच्या समुळ जातीचा नाश करत आहेत. असें चालू राहिले तर संपूर्ण हरण जाती नेस्तनाबूत होईल. कृपया आपले बस्तान येथून हलवले तरच आमचे जीवन संरक्षित होईल. तुमचे बंधू उत्तम शिकारी आहेत त्यांचा नेम चुकत नाही त्यामुळे मोठ्या संख्येने प्राण्यांची हत्त्या येथे ह्या द्वैतवनात होत आहे. आता आम्ही फार थोडे उरलो आहोत. त्याना जर तुम्ही जपले तर भविष्यात जास्त हरणं मिळतील नाहीतर आमची प्रजाती कायमची नष्ट होईल. ते पाहून युधिष्टीर दुःखी होतो. त्याला त्यांच्या बद्दल अनुकंपा होते. तो त्यांना सांगतो, तुम्ही जे बोलता त्यात तथ्य आहे म्हणून मी तुमच्या विनंतीचा मान राखून हे जंगल सोडून जातो. त्यानंतर तो जागा होतो. तो त्याच्या भांवांना ते स्वप्न सांगतो. त्याचे भाऊ सांगतात, ऐवढे ब्राह्मण पोसावयाचे तर त्या प्राण्याची हत्या करणे आवश्यक आहे. भिम बोलतो, "तुझे ब्राह्मण कसे खादाडा सारखे खातात ते तुला माहीत आहे". त्यावर युधिष्टीर कांही बोलत नाही. तो त्यांना सांगतो, आपण ह्या वनातील मुळ रहिवाशांच्या स्वाभाविक हक्कावर गदा आणत आहोत ते योग्य नाही. पाहुण्याने कसे रहावे तसे आपण राहिले पाहिजे. जनक राजाने केलेल्या नियमानुसार प्राणी मारले पाहिजेत. म्हणजे फक्त वयस्क प्राणी मारावयाचे, लहान, तरुण, गाभण असें मारावयाचे नाहीत. शिकार करतांना तुम्ही कसेही कोणतेही मारता ते थांबले पाहिजे. खाण्या व्यतिरीक्त प्राणी केवळ गंमत म्हणून मारावयाचे नसतात. कारण त्यांने पाप लागते, स्वर्गाचे दरवाजे बंद होतात. तसेंच आता आपण हे वन सोडून देणेच मला प्रशस्त वाटते. माझ्या मते आपण परत कामाक्य वनात जाऊ. तेथे शिकारी योग्य प्राणी भरपूर आहेत. तरी तेथे जनक राजाच्या नियमानुसारच शिकार करावयाची असें ते प्रेमळ स्वभावाचे पांडव

ठरवतात. कामाक्य वनाच्या एका बाजूस वाळवंट आहे व दुसर्या बाजूस तृनविंदू सरोवर आहे. तेथे आपला उरलेला काळ मजेत घालवू. ते ठरल्यावर ते त्यांच्या बरोबर असलेल्या ब्राह्मणांसह त्या कामाक्य वनात जाण्यासाठी निघतात. त्यांच्या बरोबर इंद्रसेन व इतर लोक सुद्धा असतात. चालत तो प्रवास करत असतात. ते ज्या रस्त्याने जात होते त्याच्या दुतर्फा मक्याची शेती होती. स्वच्छ पाण्याचे झरे अधून मधून लागत होते. अखेरीस त्यांना कामाक्य आश्रम दिसतो. त्या स्वर्गीय प्रदेशाच्या दर्शनाने त्यांना एक वेगळी प्रसन्नता प्राप्त होते. तेथून ते त्यांच्या सगळ्या लव्याजम्यासह त्या अरण्यात प्रवेश करतात.
अशारितीने घोष यात्रा पर्वाचा एकशे तिनावा भाग संपला.

# घोष यात्रा पर्व

## भाग एकशे चार

वैशंपायन पुढे सांगतात, त्या जंगलात रहात पांडव मोठ्या त्रासातून जीवन जगत असतात. अशी तब्बल अकरा वर्षे जातात. सुखाचा अभिलाषा असूनही त्याच्या शिवाय केवळ मनाचा त्रागा करत ते तेथे हालाखीच्या परिस्थितीत रहात असतात. बहुधा ते कंदमुळं आणि फळं खात असत कारण शिकारीला कांहीं बंधन आली होती. बरेच ब्राह्मण मांस खाण्यास मिळण्याचे बंद झाल्यामुळं व रानावनात ती कंदमुळं आणि फळ आणण्याचे काम त्यांनाच करावे लागत होते म्हणून ती काम करण्याची सवय हरवलेले ते ऐतखाऊ ब्राह्मण ह्या ना त्या कारणांनी त्यांची साथ सोडून जात होते. युधिष्ठीराला आपल्या द्युताच्या छंदाचा हा सगळा परिणाम आहे हे जाणवत होते व त्यामुळे तो फार कष्टी होत असें. त्या दुःखामुळें त्याला रात्र निद्रा येत नसे. जेव्हां जेव्हां त्याला ते सभागृहातील प्रसंग आठवत होते तेव्हां तेव्हां त्याला कर्णाची कठोर वाणी आठवत असें. त्यामुळें हृदयात खंजीर खुपसला जात आहे असें त्याला वाटत असें. युधिष्ठीराची ती केविलवाणी अवस्था पाहून त्याच्यावर प्रेम करणारे बाकीचे पांडव व त्यांची पत्नी कृष्णा फार भावूक होत होते. ते विचार करतात कीं, फार थोडा समय आता उरला आहे त्यानंतर त्यांची त्यातून सुटका होणार होती. सुटल्या नंतर जे काम करावयाचे आहे त्याच्या तयारीला ते लांगले होते. त्यासाठी जी मेहनत ते करत होते त्यामुळें त्यांच्या शरीरात अमुलाग्र बदल  झालेले होते. त्या सुमारास महाशक्तीमान महाऋषी व्यास, सत्यवतीचा मुलगा, त्यांना भेटावयास येतात. त्याला येत आहे हे पाहून स्वतः युधिष्ठीर त्यांचे स्वागत करण्यासाठी पुढे गेले. त्या महामुनीचे यथोचित स्वागत ते करतात. त्यांचे मनापासून ते आदरतिथ्य करतात, त्यामुळे व्यास मुनी संतुष्ट होतात. ते त्यांच्या आसनावर बसल्यानंतर, ऋषी आता काय सांगणार आहेत ते ऐकण्यासाठी ते सगळे उत्सुक होते. व्यास मात्र ते पहातात कीं, त्यांचे नातु त्या रानावनाच वनवाशाप्रमाणे आपले आयुष्य कंठत आहेत. ते पाहून त्यांना फार वाईट वाटते, ते बोलतात, "ही जी अरण्यात तुमच्या कडून अनाहूतपणे कां होईना, तपस्या होत आहे व ती होत असतांना तुमच्या मनात कधीही त्रागा आला नाही, त्यामुळें तुम्ही ह्या

ब्रह्माच्या परीक्षेत खरे उतरत अहात, ही एक चांगली बाब आहे. व्यास पुढे सांगत असतात, माणसाला जीवनात चांगले व वाईट दिवस अनुभवावे लागतात तो नियतीचा खेळ आहे. त्याबद्दल नाराज होऊनही कांहीं उपयोग नसतो. शहाणी माणसे ते समजून त्यानुसार बिनातक्रार आपले आयुष्य कंठत असतात. त्यामुळें त्यांना त्या अनुभवामुळें कांही त्रास होत नाही. दुःख आणि सुख ह्या माणसाच्या कल्पनांचा खेळ असतो. त्याला सत्यात स्थान नसते. त्यासाठी प्राचीन ऋषींनी औदासिन्याची शिफारस केलेली आहे. औदासिन्यात माणूस त्याच्या सुखाच्या व दुःखाच्या क्षणांकडे दुर्लक्ष करून आपले आयुष्य जगू शकतो. म्हणून असे म्हणतात ज्याला औदासिन्य आचरता येते तो त्यापरीने सुखी होत असतो जे सुख चिरंतन असते. म्हणून ज्या वैराग्य प्रवृत्तीतून औदासिन्य प्राप्त होते ते सर्वात श्रेष्ठ व्रत असें मानले जाते. खरे सुख जे निरंतन आहे ते निरीच्छतेतून प्राप्त होत असते. वैराग्य प्राप्त झालेला सत्य, प्रामाणिपणा, क्रोधापासून मुक्त, सचोटी, भावनांचे संयमन, वासनांपासून दूर रहाणे, पापभावापासून मुक्त, कावेबाजपणा नसणे, शुद्धता, वासनांचे संयमन अशा गुणांनी तयार होत असतो. त्याला कांहीं चिकटत नाही व तो कशाला चिकटू शकत नाही. तो खरा बैरागी समजला जातो. मूर्ख माणसं, त्या सगळ्या गोष्टीत अडकण्याला हुशारी समजतात व त्यामुळें ते त्यात अडकतात. अशा लोकांचे नंतरचे जीवन (मृत्यूनंतरचे) विस्कळीत होते. त्यांना कधीही चिरानंद मिळत नाही. ह्या जन्मात तपस्या केलेला माणूस पुढच्या जन्मात जन्मतः सुखं घेऊन येत असतो. तो सदैव संतुष्ट असतो कारण त्याला कांहींच नकोसे असते. त्यामुळें कांहीं मिळाल्याचा अथवा न मिळाल्याचा त्याला फरक नसतो. निरिच्छतेतून खरे औदासिन्य प्राप्त होत असते. अशा माणसाच्या जीवनात फक्त आनंद असतो. तो दैव संतुष्ट असतो. खरे बोलणारा सहसा अडचणीत जात नाही, जो राग नियंत्रित करतो तो मनःशांती मिळवतो. जो द्वेष मत्सरापासून मुक्त असतो त्याला समाधान मिळते. जो स्वताची तुलना दुसर्यांशी करत नाही त्याला त्याचे जीवन सुखमय होते. जो सत्पात्र कौतुक करतो त्याचे कौतुक होत रहाते ह्या आणि पुढच्या जन्मी. ज्याने आपल्या वासना काबूत ठेवल्या आहेत तो कधीच कोठल्याही अडचणीत येत नाही. योगक्षेम सांभाळून जो आपले जीवन संयमाने जगतो तो भाग्यवान होतो कारण सगळ्या देवता त्याच्यावर खूष असतात.

ते ऐकल्यावर युधिष्ठीर त्यांना विचारतो, "अहो महाज्ञानी, मला सांगा, औदासिन्य आणि दानं करणे ह्यात कोणते जास्त श्रेष्ठ असते"?
व्यास सांगतात, "दानासारखे श्रेष्ठ कांहीं नाही ह्या सृष्टीत. दान करण्याची क्षमता औदार्याच्या प्रवृत्तीतून येत असते. परंतु, जे दान सापेक्ष असते ते पापास कारण ठरू शकते. ज्या दानात कांही अपेक्षा नाही व जे सत्याच्या (परमेश्वराच्या) साठी केले जाते ते सर्वश्रेष्ठ आहे. कष्ट करून मिळविलेले कोणाला देण्याची इच्छा सहसा होत नाही कारण त्या धनात त्याचे कष्ट सामावलेले असतात. असे असूनही जेव्हां ते धन तो स्वखूषीने निरपेक्ष बुद्धीने दान करतो ते खरे सच्चे दान असते. तो ते दान केल्यानंतर ते विसरून जातो तो करा दानी. जो दिलेले दान आठवतो तो व्यापारी (वैश्य) असतो त्याला दानी म्हणत नाहीत. आशिर्वाद देणारासुद्धा मोठा दानी समजला पाहिजे कारण, तो आशिर्वाद त्याच्या पुण्याईतून तो देत असतो. जर दान निरपेक्ष असेल तर ब्रह्माकडून त्याची नोंद होत असते म्हणून जरी ते निरपेक्ष असले तरी जास्त कांही अंती देणारे असते. परंतु, पाप करून (फसवून, चोरी करून इत्यादि) मिळवलेले धन कश्याही प्रकारे दान केले तरी व्यर्थ असते. कारण अरे युधिष्ठीरा, तशा धनावर तक्षकाचा हक्क असतो व तो तक्षक त्या धना बरोबर ते जेथे जाईल तेथे जात असतो व अंती घेणार्याचा नाश करत असतो. त्याचप्रमाणे अपात्र दान केले तरी ते व्यर्थ जाते. म्हणून दान कधीही सत्पात्र असले पाहिजे. अरे राजा, पापाने मिळवलेले धन दानात घेणे हे त्यासाठी मोठे घातक असते. त्या संदर्भात एक प्राचीन कथा आहे ऋषी मुग्दलांची ती सांगतो.
अशारितीने घोष यात्रा पर्वाचा एकशेचारावा भाग संपला.

# घोष यात्रा पर्व

## भाग एकशे पांच

युधिष्ठीर विचारतात, "ऋषी मुग्दल एक द्रोण भर दाणे दान करतो ते कां ते सांगा. ते कोणाला ते देतात"? मला ती गोष्ट ऐकावयाची आहे, तरी ती सविस्तरपणे आम्हाला सांगा.

व्यास ती प्राचीन कथा सांगू लागतात, फार प्राचीन काळी एक पवित्र ब्राह्मण मुग्दल नांवाचा, कुरुक्षेत्री रहात होता. तो पूर्णतया निरपराध मनाचा होता. त्याच्या मनात कोणा बद्दल द्वेष, मत्सर असे कांही नव्हते. तो कोणाकडून कांही अपेक्षासुद्धा करत नव्हता. तो शेतात मातीवर पडलेले दाणे जमा करून व ते खाऊन त्याची गुजराण करत असें त्या प्रकारच्या व्रताला शील व उच्छ पद्धती असे म्हणत असतं. असे कपोताचे जीवन जगत असलेल्या त्या बैराग्याकडे कोणी पाहुणा येतो. तो पाहुणा ऋषी असतो. ते मिळून इष्टीकृत यज्ञ करतात. ते पाहुणे त्याच्याकडे पंधरा दिवस असतात, त्यानंतर आणखीन पंधरा दिवस ते रहाण्याचा मानस ठेवतात. पाहुणा ऋषी त्याची पत्नी व त्यांचा मुलगा असे सगळे त्या कपोल पद्धतीने (शील व उच्छ) सभोवारच्या शेतात पडलेले दाणे वेचण्याचे काम करू लागतात. एक द्रोणभर दाणे जमले कीं, दर्श आणि पौर्णामास्य यज्ञ ते करत असत. तो पुण्यावान ब्राह्मण त्याचे देवतांना आणि अतिथीना खाण्यासाठी दिल्यानंतर जे दाणे उरत ते तो भाजून ठेवत असें. एका शुभ दिवशी जगाचा राजा इंद्र त्याच्या स्वर्गीय सोबत्यां बरोबर तेथे त्या ब्राह्मणाकडे खाण्यासाठी जातो. तो मुनी त्यांचे स्वागत करतो. त्याच्याकडे मोजके धान्य असल्याने मुग्दल त्याचे दान फार कंजुषाने करत असें म्हणजे सगळ्यांना ते पुरावे. जेव्हां इंद्र त्याच्याकडे खाण्यासाठी येतो तेव्हां त्या ब्राह्मणाला असें आढळते कीं, कितीही दाणे दिले तरी त्याचा द्रोण भरलेलाच रहात होता. ते असें झाले होते कीं, त्या द्रोणातून मुग्दल शेकडो ब्राह्मणांना खाऊ घालतो तरी त्या द्रोणातील अन्न संपत नाही. ती वार्ता सगळीकडे पसरली. ऋषी दुर्वासांना ते समजते. ते दिगंबर ऋषी वेड्यासारखे दिसत होते, तेथे जातात. तेथे तो रागीट मुनी त्याला शिव्या देऊ लागतो. तो मुग्दलाला बोलतो कीं, तो जेवणासाठी आला आहे. मुग्दल त्याचे स्वागतच करतो. मुग्दल त्या वेड्यासारख्या

दिसणार्या दुर्वास ऋषीला पाय धुण्यासाठी व पिण्यासाठी पाणी देतो. त्यानंतर तो त्याला खाण्यास देतो. तो भुकेला मुनी त्याला वाढलेले सगळे अन्न खाऊन टाकतो एका दमात. पुन्हा त्याला जेवायला वाढतो तेसुद्धा तो खातो त्यानंतर त्याचे हात स्वताच्या अंगाला पुसून तो ऋषी निघून जातो. अशारितीने तो ऋषी पुन्हा येतो व मुग्दलाचे कडे जेवून जात असें. शील व उच्छल पद्धतीने किती धान्य जमा होणार, ते त्या ऋषीला दिल्यामुळे मुग्दल पुन्हा शेतात पडलेले दाणे गोळा करण्यास जातो, स्वतः तो जेवलेला नसतो. त्याला भूक लागत नाही. तो त्या दुर्वासाच्या सेवेत मग्न झालेला होता. त्याला दुर्वासाचा राग आला नाही किंवा त्याची मानसिकता बिघडली नव्हती. त्या कामात त्याची पत्नी व मुलगा दाणे गोळा करण्यात त्याला मदत करत होते. दुर्वास पुन्हा पुन्हा त्याच्याकडे जेवावयाला जात होता परंतु, मुग्दलाला त्याचा कधी राग आला नाही. असें सहा वेळा होते. दुर्वासाला समजते कीं, हा योगी रागावत नाही. त्याच्या मनातील शुद्धभाव त्याला जाणवतात. दुर्वास मुग्दलावर प्रसन्न होतात व त्याला बोलतात, "ह्या पृथ्वीवर तुझ्यासारखा निष्पाप माणूस मी पाहिलेला नाही". भुकेने माणूस अविवेकी होतो व वाईट प्रकारे वागू लागतो पण तू अजिबात ढळला नाहीस. माणसाचे मन चंचल असते ते भुकेमुळें विपन्नावस्थेत जाते. पण तुझे असें कांहीं झाले नाही. मनाचा एकाग्रपणा हे तपस्या करण्याचे मूख्य साधन आहे, ते तू मिळवले आहेस. कष्ट करून मिळवलेले अशारितीने निरपेक्षपणे दान करण्यात तुझा मोठेपणा दिसून येतो. तुझ्या केवळ सानिध्याने मला पुण्य प्राप्त झाले आहे. तुझी दयाबुद्धी, संयम, न्यायदृष्टी, इंद्रिय नियमन, पुण्यप्रभाव हे सगळे तुझ्या व्यक्तिमत्वाचे अंग आहेत. त्यामुळें तू तिनही जग जिंकली आहेस आणि चिरशांती मिळवली आहेस. देवलोकाचे सदस्य तुझी किर्ती गात आहेत. तू तुझ्या देहांनी स्वर्गात जाणार आहेस. दुर्वास ते सांगत असतांना स्वर्गातून एक संदेशक आला आणि मुग्दलाच्या पुढे उभा झाला. त्याच्या मागे एक रथ होता त्याला राजहंस खेचत होते. त्या रथाची सुंदर सजावट केलेली होती. त्याला दैवी सुगंध येत होता. कोठेही जाता येईल असा तो रथ होता. तो संदेशक मुग्दलाला विनंती करतो किं, आपण आपल्या औदासिन्याने सगळे जग जिंकलेले आहे. ते ऐकल्यावर तो महामुनी मुग्दल त्याला विचारतो, "मला सांग, त्या स्वर्गात असें काय विशेष आहे म्हणून मी तेथे जावे असें तुम्हाला वाटते"? स्वर्गातील लोकांत वैराग्य असते कां? त्यांना

वासना असतात कां? स्वर्गात असें कोणते विशेष सौख्य मिळते जे पृथ्वीवर मिळत नाही". मुग्दल पुढे बोलतो, "मी असें ऐकले आहे कीं, पुण्यवंताबरोबर सात पावले चालले तरी स्वर्गात जातो, त्या पुण्यवंताच्या मैत्रीत मी आपल्याला पहात आहे. मुग्दल त्याला विचारतात, "मला सांग चटकन, खरे सत्य कशात आहे? माझे हित कशात आहे? ते समजल्यावर मी माझे उर्वरित आयुष्य त्याप्रमाणें कंठण्याचा प्रयास करीन".

अशारितीने घोष यात्रा पर्वाचा एकशेपांचावा भाग संपला.

# घोष यात्रा पर्व

## भाग एकशे सहा

तो देवांचा संदेशक त्याला सांगतो, अहो महामुनी, तुमच्या समजण्याच्या तर्हा फारच साध्या आहेत. एवढे भाग्य तुम्हाला मिळाले तरी तुम्ही अशा प्रश्नात वेळ दवडता ह्याचे मला आश्चर्य वाटते. त्यानंतर तो देवांचा संदेशक सांगू लागतो, स्वर्गात स्थान मिळाल्यामुळें तुमचा मोठा सन्मान होतो सर्वकडे. ते स्थान पृथ्वीच्या वर आहे. त्या जगात रस्ते सुंदर आहेत, तेथे मोठे ऋषी रहातात, त्यालाच स्वर्ग असें म्हणतात. ज्यानी औदासिन्य आचरले नाही ते तेथे जाऊ शकत नाहीत. फक्त पुण्यवंत तेथे जाऊ शकतात. ज्यांनी अहंकार कायमचा सोडला आहे ते तेथे जाऊ शकतात. मत्सर, गर्व असें दोष असलेले तेथे जाऊ शकत नाहीत. तसेंच जे सत्यासाठी केल्या जाणार्या युद्धात वीरगती प्राप्त करतात त्यांना तेथे कांहींकाळ रहाता येते. जे ऋषी मोठे विख्यात यज्ञ करतात ते तेथे जातात. जे फक्त पुण्यकर्म करतात जे पापापासून दूर असतात ते तेथे जाऊ शकतात. त्या स्वर्गात निरनिराळ्या प्रकारच्या लोकांसाठी विविध सुख सोई असतात. तेथे तुला जे पाहिजे ते मिळते. अनेक देव, साध्य, वैश्वास, महान ऋषी, यमदेव, गंधर्व, अप्सरा तेथे वस्ती करतात. तेथे तो महान पहाड आहे ज्याला मेरु पर्वत म्हणून ओळखतात. त्याचा पसारा तेहतीस हजार योजने आहे. तेथे पवित्र उद्याने आहेत. तेथे कोणाला भूक लागत नाही, तहान लागत नाही. तेथे कोणी थकत नाही. तेथे भिती नाही. तेथे असे कांहीं नाही ज्यामुळें त्रास होईल. तेथे फक्त आनंद असतो. तेथून हवेत सुगंध असतो, तेथे सुमधूर संगीताचे धून ऐकू येतात. तेथील सगळे नश्वर असते. कांहीं करावे लागत नसल्यामुळें तेथे पश्चात्ताप ही भावना नसते. कर्तृत्वान लोक त्यांच्या उदात्त कार्यामुळें तेथे विश्राम करत असतात. त्यानंतर ते पुनः पृथ्वीवर त्यांचे उर्वरित कार्य करण्यासाठी जन्म घेतात. जितके मोठे पुण्यकर्म तेवढे जास्त काळ तो स्वर्गात रहातो. पुण्य संपले कीं, तो परत पृथ्वीवर जन्म घेतो योग्य अशा घराण्यात. त्याचे पुढचे काम करण्यासाठी. स्वर्गात रहाणारे तेजस्वी दिसतात. ते सगळे त्यांच्या सुकर्मामुळें त्याना एक बक्षिस असें मिळत असते. दुसर्या कोणाच्या पुण्याईने ते मिळवता येत नाही. तेथे घाम फुटत नाही. कपडे मळत नाहीत.

त्यांना गळ्यात सुगंधी फुलाच्या माळा घालावयाला मिळतात. त्या फुलांचा परिमळ कधीच जात नाही. ती फुल कधी कोमेजत नाहीत. तेथे मी आता तुम्हाला घेऊन जाण्यासाठी आलो आहे तसे रथ तेथे चालतात. तेथे गेलेले लोक आनंदात रहातात. तेथे उच्चाच उच्च योग्यतेचे साधू रहात असतात. ब्रह्माच्या जवळ ते असतात. तेथे रहाणार्या देवतांना सिद्धी असतात त्याच्या जोरावर त्या कांहींही करू शकतात. त्यांना जगण्यासाठी खाण्याची पिण्याची आवश्यकता नसते. ते अदृष्य सृष्टीत असतात म्हणून माणसाला ते दिसत नाहीत. त्यांच्यावर कल्पाचा परिणाम होत नाही. ते सर्व प्रकारच्या भावनांच्या आवेगापासून मुक्त असतात. त्यांना वासना नसतात. त्यांच्याकडे फक्त विवेकी बुद्धी असते. ज्यांच्यात भावना आहेत व जे वासनांत अडकलेले आहेत ते कधी तेथे जात नाहीत. एकंदर तेहतीस भाग आहेत त्यांना प्रत्येकी लोक असें समजतात, त्यात सूर्य लोक, चंद्र लोक, इंद्र लोक असें आहेत. त्यापैकी कोणातरी एकात तुमची व्यवस्था होणार आहे. तुझ्या दानशूरते मुळें तुला तेथे बोलावणे आले आहे. तेथे जाऊन तू तेथील सुखांचा अनुभव घ्या. असे असते स्वर्गाचे स्वरुप". एवढे बोलून तो संदेशक थांबतो. "आता सांगतो, स्वर्गात रहाण्याच्या कांही गैर सोयींबद्दल". "मोठी गैरसोय अशी की, स्वर्गात गेलेले त्यांनी जे पुण्य कमावले आहे ते उपभोगत रहातात. त्यांचे पुण्य संपले किं, त्याना पुन्हा पृथ्वीवर जन्म घ्यावा लागतो. स्वर्गात तुम्ही पुण्य अथवा पाप करू शकत नाही. ती कर्मभूमी नसते. स्वर्ग ही भोगभूमी आहे. जसे नरक ही पापी लोकांची भोगभूमी आहे. नरकात गेलेले पाप किंवा पुण्य करू शकत नाही. कर्मभूमी फक्त पृथ्वी आहे. ह्याचा अर्थ स्वर्गात असलेले केव्हातरी पुन्हा पृथ्वीवर जन्म घेणार असतात म्हणजे तो मोक्ष नाही. नरकात पापी लोक त्यांच्या पापाची शिक्षा भोगली कीं, पुन्हा ते पृथ्वीवर येतात. कोणीही आत्मा कायम स्वर्गात अथवा नरकात रहात नाही. त्यांचे ते भोग संपले कीं, त्यांना पृथ्वीवर यावे लागते. बर्याच वेळा, अरे मुग्दला, असें होते कीं, हा महत्वाचा मुद्दा ज्यांच्या लक्षात येत नाही ते स्वर्गाला मोक्ष समजतात व तेथे ते चुका करू लागतात व त्यामुळें त्यांचे पुण्य झपाट्याने संपते व ते पृथ्वीवर फेकले जातात. अशा कांहीं गैरसोयी स्वर्गात जाणार्यांना झेलाव्या लागतात. त्यामुळें बरेच ऋषी जेव्हां त्यांना समजते कीं, त्याचे पुण्य संपत आले आहे, ते स्वतःहून पृथ्वीवर अवतारी पुरूष म्हणून येतात व पृथ्वीवर लोक

कल्याण कार्य करत असतात. त्या कार्यामुळें ते पुनः पुण्य जमा करतात व ते त्यांना पुन्हा स्वर्गातील त्याचे स्थान निश्चित करण्यासाठी पुरेसे असते. अशारितीने स्वर्गवासी लोकोत्तर कार्य करण्यासाठी माणसांत येत असतात. त्यांच्या त्या कार्यामुळें ते लोकांकडून पुजले जातात. त्यामुळें त्या पुजणार्या भक्तांचे पुण्य त्यांना मिळते. अशारितीने ते पुन्हा स्वर्गात जातात. बर्याच वेळा कांहीं स्वर्गवासी त्यांच्या त्या यशामुळें फुलून जातात व त्यांचा अहंकार वाढत जातो. तसे झाले कीं, त्याचें पुण्य झपाट्याने कमी होते व ते पृथ्वीवर फेकले जातात. अशारितीने फेकले गेलेले त्या अनुभवामुळें बेचैन होतात व त्यांचा र्हास होतो, ते कदाचित राक्षस होतात आणि पाप कर्माचे समर्थन करू लागतात. हा सगळ्यात मोठा धोका स्वर्गवासी लोकांना असतो. अशा फेकलेल्या अहंकारी लोकांची बुद्धी भ्रष्ट होते, ते भावनाविवश होतात. त्यांचा विवेक संपतो व ते पापकर्मात रमू लागतात त्यांना आलेल्या भीषण अनुभवाला ते पचवू शकत नाहीत. त्यात त्यांना पापशक्ती ओढतात. हे ब्रह्माच्या स्थाना पर्यंत होऊ शकते. त्यांच्यातून दैत्य, दानव उत्पन्न होतात. म्हणजे प्रथम स्वर्गात गेलेले त्यांच्या चुकीमुळें देवत्वातून दानव, दैत्य आणि राक्षस अशा अवस्थेत जातात. जे आपले पुण्य सांभाळून असतात ते स्वर्गात देव म्हणून रहातात. देवांची नेमणूक सृष्टीची विविध कामे करण्यासाठी नियामक म्हणून केली जाते. जेव्हां असें देव माणसं पुजतात, आपली कामं व्हावी म्हणून, तेव्हां त्यामुळें त्या देवांचे पुण्य वाढत गेल्यामुळें त्यांचे देवत्व अबाधित होते. जितके जास्त भक्त तितकी त्या देवाची ताकद मोठी असे होत असते. अशा भक्ती करणार्या भक्ताचे पुण्यावर त्या देवतेचा अधिकार होतो व म्हणून असें भक्त त्यांच्या मृत्यूनंतर त्या देवतेचे गण बनतात. ज्या देवांची पुजा होत नाही, त्यांचा माणसांना विसर पडतो त्यांचे पुण्य कमी होत असते त्यामुळे यथावकाश तो पृथ्वीवर फेकला जातो. प्राचीन काळापासून अनेक देव आले व गेले. कालमानाने नवीन देव उत्पन्न होणे ही प्रक्रिया सतत चालू आहे. अरे मुग्दला, हे देव आणि परब्रह्म हे एकच नाहीत. परब्रह्म त्या पलिकडे असते त्याचा व ह्या स्वर्गीय देवांचा कांहींच संबंध नसतो. देवांची पुजा व परब्रह्माची पुजा ह्यात फार फरक आहे. तू अरे मुग्दला, सुरूवाती पासून परब्रह्माची पुजा करत आहेस. तू कधी स्वर्गाचा विचारच केला नाहीस. त्यामुळे तुझा दर्जा मोठा आहे. ह्या जगात कर्म आणि फल असें दोन आहेत. जे कर्माचा विचार करतात परंतु, त्यापासून

उत्पन्न होणार्या फलाचा विचार करत नाहीत ते स्वर्गात जातात. जे कर्म करतात व त्याच्या फलाची अपेक्षा करतात ते कधीच स्वर्गात जाऊ शकत नाहीत. अशा सगळ्या गोष्टी आहेत स्वर्गा बद्दलच्या. एवढे सांगितल्यानंतर तो देवांचा संदेशक मुग्दलाला म्हणतो चला आता आपण चटकन ह्या रथात बसा व स्वर्गात निघ".

व्यास पुढे सांगतात, ते विवेचन ऐकल्यावर मुग्दल विचार करू लागतो. पूर्ण विवेकानंतर तो महान ऋषी त्या स्वर्गीय संदेशकाला बोलतो, "अहो देवांचे संदेशक, मी आपल्याला नमन करतो. आपण आपले विमान घेऊन परत जावे कारण मला स्वर्गात जाण्याची इच्छा नाही. त्याचे असे आहे, पृथ्वीवर जमवलेले पुण्य तेथे खर्च करावे लागते. त्यानंतर पुन्हा पृथ्वीवर ते संपल्यावर यावे लागते. त्यात काय अर्थ आहे"? "त्यापेक्षा पृथ्वीवरच रहावे व जे सुख दुःख पदरी येईल ते भोगावे म्हणजे माझ्यामते येथेच स्वर्ग निर्माण करावा. ते जास्त चांगले असें मला वाटते. स्वर्गात जाऊन सुख भोगणारा जेव्हां परत ते पुण्य संपल्यावर येतो तेव्हां त्याचे काय हाल होतात ते तुम्ही मला सांगितले ते मला विशेष विचार करावयाला लावत आहेत. मला सांगा असा कांही लोक आहे कां, जेथे असें दोष नाहीत"? दैवी संदेशक सांगतो, "तुझ्या प्रश्नाचे उत्तर मी देतो कारण, मला ते माहीत आहे. तुला मी आधीच ब्रह्माचे सांगितले जे स्वर्गाच्या पलिकडे अध्यांत्मिक दर्जाच्या योग्यतेने पहाता खूप उंच आहे. त्याला विष्णूलोक म्हणतात. तेथे परमब्रह्म आहे. तेथे अशा कोणत्याही गैरसोयी नाहीत, त्या स्थानाला मोक्ष म्हणतात. त्या अवस्थेला पोहोचलेला पृथ्वीवर कधीच फेकला जात नाही पण तो ब्रह्माच्या कार्यासाठी पृथ्वीवर अवतार घेत असतो. तेथे जाणारा माणूस तो असतो, ज्याला इच्छा उरलेली नाही. ज्याला वस्तुमात्रांशी काही स्वारस्य उरलेले नसते. त्याला अहंकार व त्यातून उत्पन्न होणारे दोष अजिबात नसतात. तो कधी भावूक होत नाही. अरे मुग्दला, तू जर येथेच राहून तुझे असें वैरागी जीवन जगत असशिल तर स्वर्ग तुझ्या भोवती तयार होईल, तुला स्वर्गात जाण्याची गरज नसेल".

ते स्पष्टीकरण ऐकल्यावर मुग्दल त्या संदेशकाला जाण्यास सांगतो, त्यानंतर तो शील व उच्छ जीवन जगू लागतो पूर्ण समाधानाने. त्यानंतर स्तुती आणि टीका त्याला समसमान होते. त्यांने स्वर्गाचा मोह जे त्याला कधीच नव्हता तो सोडून दिला. त्याला फक्त मोक्षाचा विचार योग्य वाटू लागला. त्यासाठी जे ज्ञान संदेशकाने दिले ते तो नेहमी लक्षात ठेवून

आपले उर्वरित जीवन जगू लागतो. त्या दृढ निश्चयामुळें तो ब्रह्माच्या लोकाकडे जातो. त्याच्या दृष्टीने स्वर्गाचा विचार करणे केवळ निरर्थक होते. एवढे सांगितल्यावर व्यास मुद्यावर येतात व युधिष्ठीराला बोलतात. "तू तुझ्या परिस्थिती बद्दल दुःख करत राहू नकोस. जरी तुझे राज्य गेले असले तरी जी औदासिन्यता आचरून तू जे पुण्य गोळा केले आहेस ते तुला नंतरच्या जगात मोठे स्थान मिळवून देईल. पुण्य खपवून पुन्हा दुःखात जाण्यापेक्षा जे आहे ते चांगले आहे हे लक्षात घे. तेरा वर्षे पूर्ण झाल्यावर तू बलाढ्य होणार आहेस. तुझ्या पित्याचे राज्य पुन्हा संपादन करावयाचे आहे. म्हणून दुःख करण्याचे सोडून दे व उद्याचा विचार करायला लाग".

वैशंपायन पुढे सांगतात, ते बोलून व्यास त्यांच्या पुढच्या प्रवासा निघतात.

अशारितीने धोष यात्रा पर्वाचा एकशे सहावा भाग संपला.

# घोष यात्रा पर्व (संपले)

## भाग एकशे सात

जनमेजय विचारतो, ते पवित्र पांडव वनात रहात असतांना त्या मुनीच्या संभाषणाने प्रभावित आणि आनंदीत झाले होते, त्यानंतर त्यांनी केलेल्या कृषीने मिळालेले धान्य ते दान करू लागतात ब्राह्मणांना व जे खाण्यासाठी येतील त्याना. ते होत असतांना ते नीच कौरव कर्ण, दुःशासन, शकून ह्यांच्या सल्ल्याने पांडवांशी कसे वागत होते ते सांगा.

वैशंपायन सांगतात, जसें दुर्योधनाला समजते कीं, पांडव त्यांच्या वनात तितकेच सुखी आहेत जसे ते राजधानीत होते, तो चिडतो कारण पांडव सुखात आहेत हे त्याला मानवणारे नव्हते. त्यांना दुःखी करण्यासाठी काय करावे ह्यावर तो त्याचे मित्र व सल्लागार कर्ण, शकूनी आणि बंधू दुःशासन ह्यांच्याशी खलबतं करू लागतो. त्यांची त्या उद्देशाने कारस्थानं होत असतांना दुर्वास ऋषी जे त्यांच्या क्रोधी स्वभावासाठी ख्यातनाम होते कुरु राजधानीत येतात. त्यांच्या बरोबर त्यांचे दहा हजार शिष्य होते. दुर्योधन आणि त्याचे बंधू त्या रागीट स्वभावाच्या ऋषीचे स्वागत करतात. ते त्या विलक्षण स्वभाव असलेल्या ऋषीची सेवा करू लागतात. तो तेजस्वी साधू त्यांचा पाहूणचार कांहीं दिवस स्वीकारतो. ते कौरव त्याची रात्रंदिवस सेवा करत असतात. कधी तो विचित्र स्वभावाचा ऋषी त्यांना सांगे कीं त्याला भूक लागली आहे. लवकर कांही खाण्यासाठी आणा. तसे झाले कीं, तो न खाता बाहेर कोठेतरी जात असें व बर्याच वेळानंतर येत असें, ते खाणे तसेंच पडलेले असें. तो तेव्हां सांगे, त्याला आता भूक नाही. असें त्याचे वागणे विक्षिप्ततेचे होते. कधी तो मध्यरात्री उठे व खाण्यासाठी मागत असें. त्याच्या ह्या वागण्यामुळें कोणीही वैतागला असता परंतु, दुर्योधन त्यामुळें अजिबात रागावत अथवा थकत नव्हता. त्याच्या त्या संयमित वागण्याने तो ऋषी अखेरीस त्याच्यावर प्रसन्न होतो. तो विचित्र स्वभाव असलेला ऋषी दुर्योधनाला बोलतो, "मी तुला आशिर्वाद देऊ इच्छितो, म्हणून तुझ्या मनात खोल आतमध्ये जी इच्छा आहे ती बोल". "जी इच्छा, अनैतिक व धर्मबाह्य नाही अशी कोणतीही तू माझ्यापुढे बोल ती मी पुरी करीन".

वैशंपायन पुढे सांगत असतात, दुर्वास ऋषींचे ते ऐकल्यावर दुर्योधनाला नवीन उत्साह होतो. कर्ण आणि दुःशासन ह्यांच्यात आधीच ठरले होते कीं, जर ऋषी असें बोलला तर त्याच्याकडे काय मागावयाचे. तो पापमय बुद्धी असलेला राजा त्या ऋषीला बोलतो, "अहो महामुनी, माझी इच्छा आहे कीं, हल्ली आमचे चुलत भाऊ जंगलात रहात आहेत, त्यांच्याकडे तुमच्या सगळ्या शिष्यांसह जाऊन त्यांचा पाहूणचार आपण घ्यावा. आपण अशावेळी जाल जेव्हां, त्यांनी व त्यांच्या नाजूक पत्नीने त्यांच्या सगळ्या ब्राह्मणांना खाऊ घातले असेल व ते आराम करत असतील".

दुर्वास त्याला सांगतात, "तसे होईल. जर त्यामुळें तुझे समाधान होत असेल".

त्यानंतर तो विचित्र स्वभावाचा ऋषी जसा होता तसाच तडक पांडवांकडे निघतो. दुर्योधन समजतो कीं, त्याचा पांडवांना जास्तीत जास्त त्रास देण्याचा उद्देश आता साध्य होईल. कर्णाचा हात हातात घेऊन त्याचे समाधान तो व्यक्त करतो. दोघे फार खूष झालेले असतात. आपले शत्रू त्या भयंकर संकटात पडणार आहेत त्याच्या नुसत्या कल्पनेने ते फार आनंदीत झाले होते. आपले शत्रू दुर्वासाचे समाधान करू शकणार नाहीत व त्याच्या क्रोधाचे बळी ठरतील त्या विचारांने ते सगळे कौरव मजेत असतात.

वैशंपायन पुढे सांगतात, दुर्योधन व त्याचे साथीदार त्यांच्या पुढच्या, पांडवांना त्रास देण्याच्या कारवायांची योजना आखू लागतात. त्यानंतर त्या खूषीत ते आपापल्या घरी जातात.

## घोष यात्रा पर्व संपले.

## भाषांतरकाराचा परिचय -

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७६ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे २५ खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळ्या नितीशास्त्र शिकवणार्या कथा जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कांही कंसात दिल्या आहेत, कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल लिहीत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी

तयार होत नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षे मी निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबर्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकर्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चाने शेतकर्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे,

माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॅलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा

मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळिराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विवेचनामुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बर्याच गटांना आवडत नाही. बर्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा ठरवता आलेला नाही. जाता जाता,

जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकार्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३- २ -२०१८

ashokkothare@gmail.com ,

ashokkothare@yahoo.co.in

## ई साहित्य प्रतिष्ठान -

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणार्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून देऊ.

ई साहित्यची पुस्तके www.esahity.com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मांगवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून ठेवा, या नंबरला तुमचे नांवाने Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

लिंक ई साहित्यचे app.https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks ह्या लिंकवर उपलब्ध आहेत. ते download करा. हे सर्व मोफत आहेत.

धन्यवाद